
# आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 10 JULY 2022

adhunikkesari.com Adhunik Kesari



## उगवतीचे रंग


विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# एक सोहळा : आगळावेगळा...

आधुनिक केसरी

त्यांचा झालेला छळ सगळे सगळे आठवले. ही गोष्ट तेराव्या शतकातली आणि आज आपण आहोत एकविसाव्या शतकात. काळाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. समाजात अनेक वाईट प्रथा काळाच्या ओघात निर्माण झाल्या. माणूस महत्वाचा राहिला नाही. जात, भाषा, धर्म, पंथ इ सारखे भेद माणसाला माणसापासून तोडू लागले. ज्ञानेश्वर माउली पासून अनेक संतांनी समाजप्रबोधन केले. अनेक समाजसुधारकांच्या पिढ्या यात खर्ची पडल्या. पण समाजमन हळूहळू बदलते आहे.

जातीपातींची बंधने काहीशी सैल होताहेत. २८ मे रोजी पुण्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध अभिनेते शरद पोंक्षे यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. या वेळी बोलताना त्यांनी ब्राह्मणेतर समाजातील काही मुलांच्या नुकत्याच झालेल्या उपनयन विधीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. स्वा सावरकरांना देखील अशाच प्रकारचे बदल समाजात अपेक्षित होते असे प्रतिपादन त्यांनी केले.
आणखी एक उदाहरण आपल्यासमोर मांडतो. १७ एप्रिल २०१६ रोजी औरंगाबाद येथे ३० मुली आणि सात मुलांवर उपनयन संस्कार करण्यात आला. महाराष्ट्राच्या इतिहासात शेकडो वर्षानंतर प्रथमच मुलींवर उपनयन संस्कार करण्यात आल्याचे हे उदाहरण असावे. आश्चर्याची आणि समस्त महिला वर्गाच्या दृष्टीने अभिमानाची ठरावी अशी आणखी एक गोष्ट घडली. या उपनयन सोहळ्याचे पौरोहित्य एका महिला विदुषीने केले. त्यांचे नाव आचार्या नंदिता शास्त्री चतुर्वेदी. या सोहळ्यासाठी त्या खास वाराणसी येथून आल्या होत्या. मुलींना उपनयन संस्कारांचा अधिकार आहे याचे दाखले प्रत्येक वेदात आढळून येतात असे प्रतिपादन त्यांनी केले. नंदिता शास्त्री या वाराणसी येथील वेद विद्यालयाच्या प्रमुख अध्यापिका असून त्यांना चारही वेद मुखोद्गत आहेत.आपल्या हिंदू संस्कृतीतील सोळा संस्कारातील हा अत्यंत महत्वाचा संस्कार आहे. प्रत्येक व्यक्तीवर आपल्या मातापित्यांचे, गुरूंचे आणि समाजाचे ऋण असते. उपनयन संस्कारानंतर प्रत्येक व्यक्तीला माता-पिता, गुरु आणि समाज ऋण फेडण्याचा अधिकार प्राप्त होतो असे समजण्यात येते.



## आनंदी पहाट

# ध्येये जीवनाला आकार देऊ शकतात

आधुनिक केसरी

मूलतः आनंदाशिवाय, आपल्या जीवनात रंग किंवा हेतू नसतो. त्यामुळे जीवनाचा आस्वाद घेण्यासाठी प्रत्येकाला आनंदाची गरज असते. आयुष्यात, अशा अनेक गोष्टी घडतात ज्या आपल्याला खाली खेचण्याचा, आणण्याचा प्रयत्न करत असतात. तथापि, आपण आपल्या अंतरंगातील आनंद टिकवून ठेवल्यास, आपण त्यांच्यापेक्षा वर जाऊ शकतो, एक विशिष्ट उच्च पातळी आपण गाठू शकतो. प्रत्येकजण जगभर आनंदाच्या शोधात वेडा झालेला असतो. पण अनेकांना, अनेकदा त्याची जाणीव देखील होत नाही, ते कशाचा शोध घेत आहेत ह्याचा त्यांना साधा बोधही होत नाही, त्यामुळेच त्यांचा क्रोध वाढत जात असतो. मानसिक आरोग्यामध्ये आनंद, मनःशांती, जीवनातील आपल्या नातेसंबंधातील सदस्यांचा सहभाग आणि त्यामुळे आपल्यात निर्माण झालेला उत्साह यासारख्या सकारात्मक भावनांचा समावेश होत असतो. उत्पन्न, वैवाहिक स्थिती, शिक्षणाची पातळी, नोकरीतील समाधान, आरोग्य हे शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि ज्ञान वाढवणे ह्या दृष्टीने मानवी आनंदाचे प्रमुख प्रभावी घटक आहेत. आपण आपल्या महत्त्वाच्या, जवळच्या व्यक्तीशी खोटे बोलण्याचा निर्णय घेऊन, आपापसातील भांडण झाल्यानंतर आपण त्यांना नाराज नाही आहोत, असे सांगण्याचा प्रयत्न केला, तरीही तो खोटेपणा फार काळ लपून रहात नाही. रोजच नवीन दिवस नव्या उद्दिष्टांनी सुरु करण्याचा आपल्या प्रत्येकाचा विचार आणि प्रयत्न असतो. आपले उद्देश आपापल्या जीवनाच्या निर्णयांना मार्गदर्शन करू शकतात, आपल्या वर्तनावर प्रभाव टाकू शकतात, ध्येये जीवनाला आकार देऊ शकतात, योग्य दिशा देण्याची भावना निर्माण करू शकतात आणि आपल्या जीवनाला एक विशिष्ट अर्थ निर्माण करू शकतात. काही व्यक्तींसाठी, उद्देश हा त्यांच्या व्यवसायाशी जोडलेला असतो अर्थपूर्ण, समाधानकारक काम करण्याशी तो संबंधित असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-29

# शिस्त हवीच ....

आधुनिक केसरी

आयुष्य सुखी व आनंदी घालवायचे असेल तर जीवनाला शिस्त हवीच. शिस्त कोणालाच आवडत नाही. पण शिस्तबद्ध जीवन असणारे लोक खरंच खूप सुखी असतात. खूप कडक शिस्तही नको.आई-बाबांना जी शिस्त स्वतःला असते, ती मुलांना आपोआप लागते. बूट, चप्पल जागेवर ठेवणे, आंघोळीचा टॉवेल वाळत टाकणे, चावी जागेवर लटकवणे, सॉक्स रोज धुणे, पुस्तक वाचताना खूण म्हणून पुस्तकाचे पान न दुमडणे किंवा पुस्तक पालथे टाकणे अशा कितीतरी गोष्टी आहेत ज्या शिस्तबद्धपणे केल्या जातात. शिस्त असावी पण, नसावी पण ! उदाहरणार्थ मैदानावर खेळताना मोकळं खेळावं. तिथं शिस्त नको आहे. हसताना पण मोकळ हसावं ज्यावेळी जेवढं हसू येईल तेवढं. कडक शिस्तीमुळे मुलांवर वाईट परिणाम व्हायला नको. शिस्त लावताना आपल्याला जी चांगली शिस्त आहे तीच मुलांना लावा. नाहीतर थ्री-फोर्थ घालून तोंडाचा चंबू करून घेतलेला सेल्फी जर आई फेसबुकवर टाकत असेल तर मुलींना हे काहीच नाही असं वाटतं. आणि मग त्याही आणखी पुढचे फोटो टाकतात. इथेच शिस्त हवी. बाबांच्या हातात जर घरी नेहमीच थोडा वेगळ्या रंगाचा ग्लास दिसला तर त्याचेही महत्त्व मुलांना काहीच वाटत नाही किंवा तंबाखूची पुडी, सिगारेट मुलांनाच आणायला पाठवले तर कोणती शिस्त तुम्ही लावणार आहात? घरचा पौष्टिक आहार घेतलाच पाहिजे. हिरव्या भाज्या, फळे सॅलड खाल्ल्याच पाहिजे ही शिस्त मुलांना लावा. नक्की लागेल ! पण तुम्हाला सुद्धा सवय हवी. आई-वडिलांनीच पिझ्झा-बर्गर सारखं ऑर्डर करू नका. मुलांसाठी ते अतिशय घातक आहे. सप्ताहात अमुक पदार्थ घरी बनवलेले आपणच खाल्ले पाहिजे ही शिस्त मात्र असायलाच हवी.

# वारकरी संप्रदायाचा आचारधर्म


आधुनिक केसरी

आषाढी एकादशीसाठी पंढरपूर येथे जाणारी वारकरी पदयात्रा होय. वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर पर्यंत केलेली पदयात्रा होय. वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूर येथील विठ्ठलाच्या वारीला जाणाऱ्या लोकांचा संप्रदाय होय. या संप्रदायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आषाढी वारी. या वारीमध्ये अनेक जाति-धर्मांचे लोक मराठा, सोनार, कुंभार, चांभार, माळी, महार, कुणबी, न्हावी, लिंगायत व इतर जातींचे भाविक भक्त सुद्धा जास्तीत जास्त संख्येने सहभागी होतात. वारी हा एक आनंद सोहळा असतो.
वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक एक पदयात्रा होय. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळी होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम महाराजांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत. वारकरी संप्रदायात लहान मोठा हा भेद नाही. संतोक्ती साक्ष देते-

**“पंढरीच्या लोका नाही अभिमान!**
**पाया पडती एकमेका होऊनी लहान!!”**

वारी करणाऱ्या व्यक्तीस वारकरी म्हणतात. भगवान विष्णूंचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे- विठ्ठलाचे हे भक्त असतात. आपले कर्तव्यकर्म निष्ठेने करीत असता ते भगवंताचे विस्मरण होऊ देऊ नये यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालतात. या माळेच्या जपमाळ म्हणून उपयोगाशिवाय, ती गळ्यात घातल्याविना वारकरी होता येत नाही, असे वारकरी पंथ सांगतो. स्नान करून भाळी गोपीचंदनाचा टिळा लावावा. नित्यनेमाने हरिपाठ म्हणावा. संतांचे ग्रंथ वाचावेत. देवाच्या मूर्तीचे दर्शन घ्यावे. भजन-कीर्तनात सहभाग घ्यावा. पंढरपूरवारी करावी तसेच एकादशीव्रत करावे. वारकऱ्याने पंढरपूरमध्ये सात्त्विक आहार व सत्त्वाचरण करावे. रोपकार आणि परमार्थही करावा. जीवनातील बंधनातून, मोहातून हळूहळू बाजूस होऊन पांडुरंगाशी एकरूप व्हावे, नामस्मरण करावे, असा साधा आणि उघड परमार्थ वारकरी संप्रदायाने सांगितला आहे. नामजपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी असतो. वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात.

## ।। दासबोध स्तवन ।।



# ब्रह्मनिरूपण

आधुनिक केसरी

तर कोणी म्हणतो या सर्वाहून आदिशक्ति सर्व श्रेष्ठ आहे. आपण या तिनही वंदनीय दैवतांना वंदन करूयाकारण सर्व सामान्य अभ्यासकांना हा विषय गहन आहे ऐवढे मात्र खरे. खरेपण सर्वातचं आहे आपण त्रिदेवांना मनापासून वंदन करूयात.
जो जी जी उपासना करतो त्या देवतेचा त्याला अभिमान असतो.साधूंचा असा द्रुढ निश्चय असतो की,एक आत्मा तेवढा सर्वत्र व्यापून आहे, तोच खरा दिले व आहे. अभ्यासु व ज्ञानी पुरूष खरा कोण? खोटा कोण? लहानमोठा कोण हे बरोबर ओळखु शकतात. जो जन्माला आला तो मरण पावतो या विनाशी तत्वांचा व जन्ममरण्याच्या तत्वात अडकलेला आहे. देहबुध्दीच्या जोरावर देहांचें मोठेपण असे जो समजतो तो देह जिवंत असूनही मेल्यासारखाच असतो. जन्माला येउन जो आत्मज्ञान करून घेतो तो मरत नाही, तो अमर असतो. खरोखरचं विचाराने श्रेष्ठ आहेत त्यांची या जन्ममरणाची बोळवण केली पाहिजे हे सत्य आहे. वेद, शास्त्रे, पुराणे असें की ज्यांना आत्मज्ञान झाले आहे ते खरे पुरूष असतात त्यांनाच आपण "महाजन"असे आपण म्हणतो. एक परमेश्वर फक्त निर्गुण निराकार आहे. नाम, रूप, काल, स्थल, आकार या सगळ्या माणसाच्या बुद्धीच्या कल्पना आहेत. ब्रम्हप्रलयाच्या वेळीहे सर्व गौण ठरते. सर्व गोष्टी नाश पावतात. परब्रम्हाला प्रलय स्पर्श करू शकत नाहीत ते नामरूपांच्या पलीकडे आहे. कोणत्याही काळी ब्रम्ह अगदी जसेच्या तसे रहाते. त्यात कणभरही बदल होत नाही. मित्रांनो हा समास अभ्यासत असताना एक गोष्ट लक्षात येते की एक विचार मनामध्ये येतो की, आपल्याला मिळालेले हे मानवी जीवन अल्प आहे. अदवंत व परिमित आहे त्याला काळ मर्यादा आहेत. त्या लयकारी आहेत. त्याच्या उलट परमात्मा सर्व व्यापक आहे, अनंत, अपरिमित आहे. परिमित जीवाने अपरिमित परमात्वस्वरूपाची कितीही कल्पना केली तरी ती कमी पडते. माझे मानवी मन तल असे म्हणते की काळ अनंत आहे तो मागे किती गेला व आता पुढे किती जाईल?व येणारा काळ कसा असेल हे कोणीही सांगू शकत नाही!अनंत काळाच्या द्रुष्टीने या जगातील मानवी जीवन एखाद्या स्वप्नाप्रमाणे अल्प आहे . पण परब्रह्म काळाच्याही पलीकडे आहे. त्याची शिकवण आचरणात आणणारा व सकल जनता जनार्दनाला सन्मार्गाच्या पत्यापर्यन्त पोहचवण्याचा मार्ग दाखवणारा आत्मज्ञानी पुरूष तोच खरा थोर होय. चला तर मग आपणही त्या पत्यापर्यन्त पोहचण्यास पात्र होऊया!ही तर खरी समर्थाची शिकवण आहे




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# रंग वारीचे

आधुनिक केसरी

डॉ नयना ही एक नास्तिक, देव नैसर्गिक शक्ती आहे मानणारी डोळसपणे विचार, वैज्ञानिक दृष्टीकोन असणारी मुलगी ! पण तिचे आई-बाबा, आजी-आजोबा, पांडुरंगाची वारी करणारे. दोन वर्षांपूर्वी आजोबा कालवश झाले होते. घरातले बाकी सगळे धार्मिक, परंपरा, रितीरिवाज, देवाला मानणारी फॅमिली! नयनाच्या वडीलांच्या पुण्याजवळील छोट्या गावात एक कारखाना. रोज सकाळी पुण्यातून निघून संध्याकाळी सात साडेसात दरम्यान घरी परतत. एके दिवशी आईपण त्यांच्या सोबत गेली. येताना त्यांच्या गाडीला अपघात झाला. बाबांना खूप लागले, कसं काय पण आई किरकोळ जखमी झाली. तिनेच बाबांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. घरी फोन लावला त्या बातमीने आजी चक्कर येवून पडली. नयना मोठ्या धीराची. परिस्थिती लक्षात घेऊन तिने आजीकडे लक्ष ठेवायला, काय हवे नको ते बघ म्हणून धाकट्या भावाला सांगितले आणि तडक हॉस्पिटलमध्ये निघाली. आईला जाऊन भेटली. एवढा वेळ धिरगंभीर, जखमी झालेली आई नयनाला बघताच एखाद्या लहान मुलाप्रमाणे ओक्साबोक्शी रडायला लागली. घरातल्या कर्त्याप्रमाणे तिने आईला धीर दिला. पण मनोमन खूप घाबरली होती. डॉक्टरनी आईवर प्राथमिक उपचार करून विश्रांती घ्या, असं सांगितलं होतं. बाबांची तब्येत बिघडली होती.पण नयनाचा डॉक्टरवर विश्वास होता ते बाबांना यातून



बाहेर काढणार याबद्दल खात्री होती.
आषाढाचे दिवस होते. यंदा तर दोन वर्षांनी वारी भरणार होती. आजीची खुप इच्छा होती वारीला जायची. तसं तिचं आणि बाबांचं ठरलं पण होतं. पण ह्या अचानक झालेल्या प्रसंगाने आजी मनातून कोलमडली होती. पांडुरंगाशिवाय कोणीच तारणहार नाही. असं तिला सारखं वाटायचं, पण कसं सांगायचं? लेकाचा अपघात झालेला, त्याला बघण्यासाठी सुनबाई, घरी नातवाच्या सोबत आणि कोणीतरी सगळं बघायला हवं म्हणून ती स्वतः !
नयना घरी आल्यावर आजीनं हळूच तिच्यापुढे आपल्या भावना व्यक्त केल्या आणि खूप रडायला लागली. तिला समजावत, नाही हो करीत तयार झाली फक्त तिच्या बाबा आणि आजीसाठीच!
आजी आणि आईच्या मदतीसाठी तिनं आत्याला बोलावून घेतलं. ती वारीला नाखुशीनेच निघाली. आजोबांच्या नेहमीच्या दिंडीत सामील न होता डॉक्टरच्या पथकात सहभागी झाली. पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांच्या गर्दीत सामील झाल्यामुळे तेही मनापासून नसताना ! ती स्वतःवरच चिडली होती. पण हळूहळू अनुभव घेत घेत तिची चिडचिड कमी व्हायला लागली.
कोणत्याही निमंत्रणाशिवाय दरवर्षी जमणारा तो लाखोंचा जनसमुदाय. "ज्ञानोबा माऊली तुकाराम" हा एकच जयघोष करत दिंडी पुढे पुढे सरकत होती. अफाट जनसागर लोटला असताना कोठेही आरडाओरड धक्काबुक्की होतं नव्हती. कुणाचीही कसलीच तक्रार नव्हती. प्रत्येकजण एकमेकांना सांभाळून घेण्याचा प्रयत्नात होता. 'चला माऊली' हे दोनच शब्द ऐकू येत होते. 'वारी' हे महाराष्ट्राचे गेली अनेक वर्षे अव्याहतपणे काम करणारे चालते बोलते मुक्त विद्यापीठच आहे ही वस्तुस्थिती कोणालाही पटणारीच होती. मायबाप पांडुरंगच्या दर्शनाची दरवर्षीची पण प्रत्येक वेळी तशीच आणि तेवढीच तीव्र असणारी ओढ, ही तिच्या मनाला भावत गेली. वारकरी श्रद्धाळू आहे पण तो अंधश्रद्धाळू मुळीच नाही. हे तिच्या मनाला पटत गेलं. पंढरपूरपर्यंत पायी चालत आलेल्या प्रत्येकाला एवढी भेटीची ओढ असूनही कित्येकजण फक्त कळसाचे दर्शन घेऊन परत निघत होते ह्याचं तिला आश्चर्य वाटत होते. नेमकी तिच्या डॉ पथकाची नेमणूक अगदी देवळा शेजारी झाली. इतर सहकाऱ्यांबरोबर नाखुशीनेच दर्शनाने गेली. सावळ्या परब्रह्म सच्चिदानंद रूपाची तिला इतकी भुरळ पडली की मुर्ती बघताक्षणी डोळ्यातून धारा कधी सुरू झाला ते तिला पण कळलेच नाही. आपोआप तिचे कान वाजत होते.
राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशीकळा लोपलीया ॥
ती एका वेगळ्याच विश्वात जाऊन पोहचली होती. मनात सारखं देवाचं रूप आठवत, साठवत होती. दर्शन घेऊन बाहेर पडताना मागे वळून वळून सगुण रुपातील आस्तिक भावनेने पांडुरंगच्या रूपाला परत परत हात जोडत होती. देवळातून बाहेर पडल्यानंतर लगेचच आईचा फोन आला, 'बाबांवरील धोका टळला आहे, तुझी काळजी घे असा त्याचा निरोप आहे'
।। रामकृष्ण हरि... ।।

**-सौ आरती राजाराम परिचारक, पंढरपूर**

रविवार, 10 जुलै 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 305
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 10 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-305 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-14 ● PRICE-5

## भेटी लागी जीवा... भाग : 6



## बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल...

आधुनिक केसरी

सर्वांनाच ओढ लागली आहे विठ्ठल भेटीची, वारकऱ्यांची पावले निघालीत पंढरीच्या वाटेने, मुखी विठ्ठल नामाचा गजर चाललाय " बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल करावा विठ्ठल प्रेमभाव " विठ्ठल भक्तीचे वेड सर्व वारकऱ्यांना लागलेले आहे. याठिकाणी पांढरी टोपी, पांढरा सदरा, धोतर, कपाळी टिळा, हातात टाळ, गळ्यात माळ म्हणजे वारकरी असं नव्हे, आषाढी एकादशी जवळ आली की ज्यांची पावलं आपोआपच पंढरीच्या दिशेने पांडुरंगाच्या भेटीसाठी चालू लागतात आणि मुखात फक्त एकच नाव "विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल" ते वारकरी असतात.. चिन्हाने वारकरी होण्यापेक्षा आचरणाने वारकरी व्हा.



शेखर निरंजन भाकरे

सावळ्या रंगाचा माझा विठ्ठल त्याचे हात कमरेवर का आहेत? आणि एकाच विटेवर का उभा आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधताना खूप सुंदर उत्तर मिळतं.

एकेकाळी बायकोच्या प्रेमात गुरफटून गेलेला पुंडलिक अचानक ठेच लागल्यानंतर शहाणा होतो. पृथ्वीतलावर माणूसच असा प्राणी आहे की ठेच लागल्याशिवाय शहाणाच होत नाही ती पहिली ठेच पुंडलिकाला लागली आणि तिथून आई वडिलांची अशी सेवा सुरू झाली की प्रत्यक्ष पांडुरंग दर्शन द्यायला आले. मात्र आई-वडिलांच्या सेवेत व्यस्त असलेल्या पुंडलिकाने एक वीट फेकली आणि पांडुरंगाला त्या विटेवर उभा करून वेटिंग वर ठेवले ही ताकत असते आई-वडिलांच्या सेवेमध्ये. पांडुरंग अजूनही त्या विटेवर उभा आहे.

पांडुरंगाचे हात कटेवर का आहेत- विठ्ठल म्हणजे - वि म्हणजे विसरू नको, ठ म्हणजे ठेसुन घे आणि ल म्हणजे लक्षात ठेव की भवसागराचे पाणी कमरे इतकेच आहे. मात्र आई-वडिलांचा छळ करशील तर या कमरेइतक्या पाण्यात सुद्धा बुडून जाशील आणि आई-वडिलांची सेवा करशील तर भवसागरात सुद्धा तरुण जाशील.

पांडुरंगाचे दोन्ही पाय एकाच विटेवर का आहेत तर " कितीही पळालो भराभर तरी दोन्ही पाय बराबर" हे पटवून देताना आपण सुद्धा आपल्या आयुष्यामध्ये धावत असताना जरा वेळ विश्रांती घ्यावी ही शिकवण त्यातून मिळते.

वारकऱ्यांची पावले ज्यावेळी पंढरीच्या दिशेने धावू लागतात त्यावेळी समोर फक्त विठ्ठलच दिसू लागतो. सतत चिंतेने ग्रासलेला शेतकरीसुद्धा चिंतामुक्त होऊन फक्त चालत असतो त्या वेळी त्याने सर्व विठ्ठलावर सोडून दिलेले असते, जे होईल ते विठ्ठलाच्याच मर्जीने होईल. अगदी म्हातारी झालेली पावलं सुद्धा विठ्ठलाचा जयघोष करत न थकता भरभर चालत असतात तेव्हा त्यांच्या रक्तात सुद्धा विठ्ठल वाहत असतो.

अगदी चिमुकल्या पासून ते 90, 95 वर्षांच्या वृद्धांपर्यंत सर्वच वारीचा आनंद घेत असतात. त्या वारकऱ्यांच्या अंतर्मनामध्ये एकच भावना असते- "जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले तेव्हा या विठ्ठल कृपा केली", त्या कृपेची परतफेड व्हावी म्हणून दरवर्षीची वारी असते. ती जीवनात कितीतरी पराकोटीचा आनंद तरंग निर्माण करून जाते.

वारीमध्ये चालणाऱ्या टाळकऱ्यांच्या टाळातून, पखवाजाच्या बोलातून, गायकाच्या मुखातून आणि विणेकऱ्यांच्या विण्यातून फक्त एकच नाद निघत असतो तो म्हणजे विठ्ठल. अशा माझ्या लेकुरवाळ्या विठ्ठलाच्या भेटीसाठी आतुर होऊन निघालेला वारकरी ज्यावेळी विश्रांती घेण्यासाठी थांबतो त्यावेळी तो म्हणतो....

**भेटी लागी जीवा, लागलीसे आस**
**पाहे रात्रंदिवस वाट तुझी**

**शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद**

## नयनरम्य विद्युत रोषणाई




श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने आषाढी यात्रा २०२२ निमित्त श्री.विठ्ठल रूक्मिणीमातेच्या मंदिरावर, श्री. संत नामदेव पायरीवर, श्री. संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, श्री. संत तुकाराम भवनवर श्री. विठ्ठल सभामंडप, श्री. रूक्मिणीमाता सभामंडप तसेच पश्चिमव्दार येथे आकर्षक व नयनरम्य अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# पंढरपुरात भरला वैष्णवांचा मेळा !

## दिंड्या पंढरपुरात दाखल; वारकऱ्यांना विठुरायाच्या भेटीची आस

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**पंढरपुर : टाळ-मृदंगाचा गजर, मुखी-माउलीचा जयघोष, भगवे ध्वज घेतलेले वारकरी भक्त आणि डोक्यावर तुळशी वृंदावन अशा उत्साही वातावरणात देहु ते पंढरपूरात दाखल होत आहेत. शनेश्वर पायी दिंडी सोहळा गेल्या 21 वर्षांपासून पायी दिंडीची ही अखंडपणे परंपरा जपलेली आहे. यावर्षीच्या पायी दिंडी सोहळ्याचे नेतृत्व ह.भ.प.मच्छिंद्र टुपके महाराज मोरे महाराज हे करीत आहे. मराठवाडा विदर्भासह विविध भागातील वारकऱ्यांचा भक्तिमेळा पंढरपूर तालुक्यातील वाखरी येथे फुलला होता.**

दरवर्षीप्रमाणे यंदाही वारकऱ्यांच्या उपस्थितीत रिगंण सोहळा पार पडला त्यानंतर भजन झाले. टाळ-मृदंगाचा गजर, मुखी माउलीच्या जयघोषात पायी दिंडी सोहळ्याला सुरुवात झाली. भगवे ध्वज घेऊन आणि पांढरे कपडे परिधान केलेले वारकरी पंढरपूरकडे रवाना झाले. शहरातील प्रमुख मार्गांवरून पंढरपूरकडे ह्या पायी दिंड्या रवाना झाल्या होत्या आषाढी यात्रेआधी दोन दिवस या दिंड्या पंढरपुरात दाखल झाल्या आसुन वैठुरायाच्या दर्शनाची आस या भक्ताना लागली असून औरंगाबाद, नाशिक, नगर, आकोला, सातारा, पुण्यासह राज्यभरातून दिंड्या पंढरपुरात दाखल झाल्या आहे.

वैजापुर तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने हजर होते येशील शेकडो भक्तांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित झालेला दिसत होता. या दिंडीत ह.भ.प.मच्छिद्र महाराज मोरे महाराज, गणेश महाराज हिरोळकर, प्रमोद महाराज रहाणे, समाधान महाराज पगार, सोमनाथ महाराज मोरे, निलेश महाराज गिरी, वैभव महाराज मोरे, शुभम महाराज कोटमे, भारत- भुषण महाराज गोसावी, योगेश महाराज वाढवणे, हर्षद महाराज नमायते, नागेश महाराज आगलावे, चैतन्य महाराज क्षीरसागर आदिसह महिला पुरुष या दिंडीत मोठ्यात प्रमाणात सहभागी आहे. या दिंडीस पंढरपूर येथे शांताराम मगर राधाकृष्ण सोनावणे भाऊसाहेब जाधव गोरख सोनवणे अर्जुन जाधव यांच्याकडून पंढरपूर वाखारी येथे वारकर्याना भोजन देण्यात आले. यावेळी बोलताना टुपके महाराज म्हणाले, महाराष्ट्रात, महाराष्ट्राच्याबाहेर अनेक यात्रा भरतात पण ही पंढरीची वारी ही एक अनोखी वारी आहे. पंढरीच्या या वारीमध्ये अनेक राज्यातील भाविक भक्त सामील होतात. अनेक जाती धर्माचे वारकरी, सामील होतात. या वारीमध्ये जात-पात-धर्म मानला जात नाही. लहान-थोर स्त्री-पुरूष भेद भाव केला जात नाही. उच्च नीच समजला जात नाही. सारेजण विठुरायाची लेकरेच आहेत असे मानले जाते. भारतीय संस्कृतीचा मान वाढविण्यामध्ये वारकरी संतांचे मोठे योगदान आहे. मानवी जीवन सुसंस्कारीत करण्यासाठी संतांनी विविध मार्ग सांगितले त्यांतील महत्त्व पुर्ण मार्ग म्हणजे संतांनी निर्माण केलेले ग्रंथ. त्यातील विचार सामान्य समाजापर्यंत पोहचवण्याची सोपी पध्दती म्हणजे दिंडी सोहळा होय. नैतिक आचरण, त्याग, ईश्वराविषयी प्रेम या तत्वावर संतांनी जीवन समर्पित केले. शिक्षण, संस्कार, संस्कृती व धर्म या संत परंपरा टिकविण्याकरिता तरुणांनी एकत्रित येऊन संतविचार, आचरणात आणावे. सुंदर जीवन जगण्यासाठी नैतिकता, स्वच्छता, निष्ठता व संवेदनशीलता या मुल्याचे पालन करावे, आशा विविध विषयांवर प्रकाश टाकला.

## मंत्रिमंडळ विस्तार आषाढी एकादशीनंतर !

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** महाविकास आघाडीचे सरकार कोसळल्यानंतर राज्यात शिंदे गट आणि भाजपा युतीचे सरकार स्थापन झाले आहे. एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्रीपदाची तर देवेंद्र फडणवीसांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र, या दोन पदांशिवाय मंत्रीमंडळातील इतर कोणतेही नाव अद्याप निश्चित झालेले नाही. त्यामुळे नेमके राज्याच्या नव्या मंत्रिमंडळात कोण असणार? शिंदे गट आणि भाजपा यांच्यात मंत्रीपदांची वाटणी कशी होणार? या मुद्द्यांवर जोरदार चर्चा आणि तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. कालपासून दिल्ली दौऱ्यावर असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत यासंदर्भात सूतोवाच दिले आहेत.

येत्या पावसाळी अधिवेशनापूर्वी मंत्र्यांचे शपथविधी झाले असतील, असे एकनाथ शिंदे यासंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले आहेत. आषाढी एकादशी झाल्यानंतर मुंबईत भेटून यावर चर्चा करू आणि मंत्रिमंडळ विस्ताराविषयी निर्णय घेऊ. १८ तारखेला राष्ट्रपतीपदाची निवडणूक होईल. पण पावसाळी अधिवेशनाच्या आधी शपथविधी होणार आहेत, असे ते म्हणाले. आम्ही शिवसेना आहोत. विधानसभेच्या अध्यक्षांनी आमच्या गटाला मान्यता दिली आहे. पण न्यायव्यवस्थेवर आमचा विश्वास आहे. आम्ही काहीही चुकीचं केलेलं नाही, असे ते म्हणाले.



# पंढरीसी जारे आल्याने संसारा



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**टाळ, मृदंगाच्या गजरात आणि रामकृष्णहरीच्या जयघोषात वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरपुराकडे रवाना झाल्या की, अवघ्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन उत्फुल्लपणे बहरास येते. संसार आणि सांसारिक कटकटी, शेती आणि शेतीचे प्रश्न, गाव आणि गावातील भानगडी या सर्वांच्या अतीत जाऊन विठ्ठल दर्शनाची आस मनी बाळगून हा वारकरी घर सोडतो आणि भागवतधर्माची पताका खांद्यावर घेतो. आपल्यासारख्या काठावरच्या लोकांना हा वेडाचार वाटेलही पण हाच वेडेपणा त्यांना वर्षभर जगण्याचे बळ देतो.**

पंढरीच्या ह्या वारीत हरतर्हेचे लोक पाहायला मिळतात. हवसे, गवसे, नवसे यात बेमालूमपणे मिसळून जातात. विठ्ठलाच्या भेटीची ओढ ज्याच्या अंतःकरणात असते ते अशा कोणाकडेही लक्ष देत नाहीत. वारकरी संप्रदायाने प्रपंच करून परमार्थ करता येतो, हे पहिल्यांदा सांगितले. आपले नित्य कर्म करत करत फक्त नामस्मरण करून भक्ती करता येते हा संदेश फार महत्त्वाचा होता. कोणत्याही संतांचे अभंग काढून पाहिले तरी त्यांचा मथितार्थ एकच आहे. तो म्हणजे उच्चारण्यास सोपा असलेला आणि सर्वपरिचित असा षडाक्षरी मंत्र. तो म्हणजे रामकृष्णहरी हा होय. या नामस्मरणाच्या योगे भौतिक जगातील दुःखाचे परिमार्जन व्हावे, तीव्रता कमी व्हावी हा भाव यामागे होता. जो जीव जन्माला आला तो त्याच्या गुणकर्मानुसार सुख-दुःख भोगत असतो. सर्वांचेच प्रारब्ध सारखेच असत नाही; परंतु एकसमयावच्छेदेकरून सर्वांना लागू पडेल आणि असमानता असणार नाही असे काहीतरी निर्माण होणे किंवा करणे गरजेचे असल्यामुळे भागवत धर्माने राम कृष्ण हरी हा षडाक्षरी मंत्र सर्व जनसामान्यांना दिला. ज्यावेळेस आपण समाज म्हणून विचार करतो त्यावेळेस समूहासाठी काहीतरी एक कृती कार्यक्रम देणे गरजेचे ठरते त्याशिवाय समाज एकत्र येणार नाही हे पूर्वसुरींना पक्के माहीत होते. वैयक्तिक जीवनधारणेसाठी सत्संग आणि नाममहात्म्य या गोष्टी पुरेशा असल्या तरी समूह म्हणून एकत्र येणे, समूहात विचार विनिमय होणे आणि संघशक्ती सतप्रवृत्त दिशेने गतिमान होणे यासाठी म्हणून दिंडीचे प्रयोजन केले गेले. दिंडी हे एकोप्याचे, सहिष्णुतेचे, संघशक्तीचे विराट दर्शन घडवते. वारकरी संप्रदायात लोक एकमेकांना माऊली म्हणून हाक मारतात. माऊली म्हणजे आई, माऊली या शब्दांमध्ये आदर आहे, वात्सल्य आहे, ममत्व आहे, आपुलकी आहे आणि सर्वात महत्त्वाचे क्षमाशीलत्व आहे. एखाद्याने आपले अहित जरी साधले तरी त्याला क्षमा करण्याचे औदार्य हे वारकऱ्यांमध्ये असले पाहिजे. किमान इतरांच्या बद्दलचा दुष्टावा त्याच्या मनाला स्पर्श करू नये म्हणून त्या पद्धतीचे संस्कार या संप्रदायात देण्यात येतात. जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत असे म्हणण्यामागे प्रत्येकात ईश्वरी अंश आहे आणि त्या ईश्वरी




अंशाच्या असण्यामुळे त्या व्यक्तीस आपण त्रास देत नाही तर प्रत्यक्ष ईश्वरास आपल्याकडून त्रास होतो, असा एक लोकोत्तर भाव या पाठीमागे आहे. व्यक्तिशः कोणताही माणूस एकांतात वाईट नसतो तो अतिशय चांगला वर्तन व्यवहार करत असतो, परंतु तोच माणूस ज्या वेळेस सामूहिक आंतरक्रियेमध्ये सहभागी होतो आणि क्रिया प्रतिक्रियेस्वरूप बदलत जातो त्यावेळेस तो स्थिर राहावा, शांत राहावा, संतुलित, संयमी आणि विवेकी राहावा यासाठीचे जणू प्रशिक्षणच नित्य आणि नैमित्तिक घटना प्रसंगांच्या माध्यमातून दिले जाते. त्याचा आपण कितपत लाभ घेतो हा भाग वेगळा असला तरी ज्या थोर पुण्यवंतांनी या संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली त्यांचा असा उदात्त आणि व्यापक तसेच सखोल हेतू होता. वस्तुतः आपण अगदी प्राचीन काळापासून ते आजतागायत समाजात बळी तो कानपिळी अशा प्रकारची व्यवस्था पाहत आलो आहोत या पार्श्वभूमीवर सर्वजण समान आहेत, कोणी उच्च किंवा नीच नाही हा भाव जर प्रत्येकाच्या मनात बिंबला तर समाजातील असमानता कमी जरी झाली नाही तरी आपल्यापेक्षा कनिष्ठांकडे पाहण्याचा दृष्टिकोन निषेधात्मक किंवा नकारात्मक असता कामा नये, याची तजवीज समाज म्हणून आपण घेतली पाहिजे. जात, धर्म, लिंग, प्रदेश, पैसा-अडका या सर्वांपेक्षा भक्ती प्रधानता हे मुख्य सूत्र ठेवून या संप्रदायाने सर्वांना आपलेसे केले. भागवत धर्माच्या झेंड्याखाली आणले. हे फार मोठे यश म्हणावे लागेल. आज आपण चार लोक एकत्र आलो की, परस्परांचे हेवेदावे, शत्रुत्व, स्वार्थीवृत्ती, आपमतलबीपणा, दुसऱ्यांना घालून पाडून बोलणे अशा प्रकारचा व्यवहार नाही म्हटला तरी होत असतो, परंतु दिंडीच्या निमित्ताने लाखो वारकरी एकत्र जमतात, एकमेकांच्या पाया पडतात, परस्परांना माऊली संबोधतात, एकमेकांविषयी उदारता बाळगतात. हा समूह संस्कार या ठिकाणी महत्त्वाचा वाटतो. आज समाजमाध्यमी वातावरणात याचे महत्त्व कदाचित आपणास पटणार नाही, परंतु ज्या काळामध्ये पंचक्रोशी व्यतिरिक्त कोणताच व्यवहार होत नव्हता त्या काळात महाराष्ट्रच नव्हे तर परराज्यातूनही भक्त पंढरपुरात जमायचे, परस्परांचे सुखदुःख सांगायचे, सामाजिक आदान प्रदानता वाढायची आणि त्यातून जगण्याचे बळ मिळायचे, हे विसरून चालणार नाही. भारत नामक देशात पंढरपूरला आषाढी आणि कार्तिकीला लाखो लोक एकत्र येतात, गुण्या गोविंदाने राहतात, परस्परांची आस्थेवाईक विचारपूस करतात, पांडुरंगाचे दर्शन घेतात आणि आपापल्या स्वस्थानी परत जातात. हे कसे काय होऊ शकते? याचे जगाला कोडे पडले आहे. या दिंडीचा अभ्यास करण्यासाठी देश विदेशातून अनेक सामाजिक विचारांचे शास्त्रज्ञ या दिंडीमध्ये येत असतात, त्यातील बारकावे शोधतात, अभ्यास करतात आणि आपापल्या परीने निष्कर्ष काढतात. संत नामदेवांनी ज्ञानेश्वरीच्या बाबतीत एक तरी ओवी अनुभवावी असे म्हटले होते. त्याच रीतीने आपणास एक तरी वारी अनुभवावी असे म्हणता येते.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

### बोंबाबोंब कशासाठी?

**वारीत जाणाऱ्यांना काही काम नसते, घराची शेताची कामे सोडून हे लोक पंढरपूरला जातात, अशी नवशिक्षितांमध्ये भावना असते. पण वस्तुतः तसे नाही. पेरणीची कामे आटोपून, घराची व्यवस्था लावून हे वारकरी विठ्ठल भक्तीने पंढरीला प्रस्थान करतात. या चालण्याने ते थकत नाहीत, श्रम होत नाहीत तर नव्या ऊर्जेचा संचार त्यांच्यामध्ये होतो. समूहासोबत व्यक्तिगत श्रम क्षुल्लक भासतात. हीच ऊर्जा वर्षभर त्यांना प्रेरणा देत असते. त्यामुळे पंढरीसी जारे आल्याने संसारा...**

# खेळ मांडीयेला वाळवंटी घाई...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जगाच्या इतिहासातील एक अलौकिक सोहळा म्हणजे पंढरीची वारी ! महाराष्ट्राची माती आणि पंढरीच्या वारीसोबतची नाती म्हणजे अभ्येद्य, अखंड, चीरानंदी प्रवास ! पंढरीची वारी म्हणजे जगातील असा एकमेवाद्वितीय आनंददायी सोहळा, जिथे एकाच दिवशी, कोणत्याही निमंत्रण आणि जाहिरातीशिवाय उन-वारा-पाऊस-तहान-भूक-वय आणि कोणत्याही सुख-दुःखाची तमा न बाळगता लाखो भाविक एकत्र येतात, एकादशी करतात, चंद्रभागेचं स्नान करतात, वय विसरून एकमेकांच्या पाया पडतात ! जगातील सात आश्चर्यांचा अभ्यास करतांना तत्कालीन तज्ज्ञ संशोधकांनी पंढरीच्या वारीचा अद्भुत सोहळा पहिला नसल्यामुळे कदाचित त्यांच्या नजरेतून हे आठवं आश्चर्य सुटलं असावं ! भारतातील कुंभमेळ्यापेक्षाही महान भक्ती उत्सव म्हणजेच पंढरीची वारी ! पंढरीची वारी म्हणजेच महाराष्ट्र !**

खरा महाराष्ट्र पहायचा असेल तर तो तुम्हाला दिसेल पंढरीच्या वारीतच ! महाराष्ट्राच्या उज्वल इतिहासात वारकरी सांप्रदायाने जसा आपला अमीट ठसा उमटवला आहे, तेवढ्याच ताकदीने वारीचं हे सुंदर गोंदण महाराष्ट्राच्या भाळी चिरकाल गोंदलं आहे ! संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकोबाराय आणि अन्य वारकरी संतांनी वारी ही आपल्या कुळात अनेक वर्षांपासून चालत आलेली वडिलोपार्जित परंपरा आहे असे प्रतिपादन केले आहे. हेच "आमुच्या जीवनाचे प्रथम आणि अंतिम उद्दिष्ट आहे" असे सांगितले आहे. ज्या दैवताची हे सर्व संत वारी करतात ते आज वारीच्या दिवशी संपूर्ण पंढरपुरांत सगुण रूपाने साकार झालेले असते अशी दृढ भावना वारकरी संतांनी अगदी 13 व्या शतकांपासून व्यक्त केली आहे !

**ऐका पंढरीचें महिमान । राउळें तितुकें प्रमाण ।**
**तेथील तृण आणि पाषाण । तेहि देव जाणावे ॥**

वारी संदर्भातील या अनुभूतीपूर्ण अभंगात संत नामदेव महाराज पंढरीच्या वारीचे वैशिष्ट्य सांगतांना आषाढी वारीच्या दिवशी श्री विठ्ठल-रुक्मिणी यांचे प्रत्यक्ष वा मुख दर्शन नाही झाले तरी चालेल, कारण त्या दिवशी पंढरीतील गवत, दगड, देवूळ आणि सर्व चराचर विठ्ठलमय झालेले असते ! पंढरपूर हे आषाढी वारीला 'सकल तीर्थांचे माहेरघर होते' परिणामी लोक इतर तीर्थांना दर्शनासाठी जातात, परंतु देशातील सर्वच तीर्थे आज दिवशी पंढरपूर तीर्थाचे पूजन करतात ! त्याचबरोबर संत ज्ञानोबाराय आषाढी वारीच्या दिवशी अपरोक्ष पांडुरंग भेटीचे वर्णन करतांना,

**बापरखुमादेविवरु विठ्ठल सुखाचा ।**
**तेणें कायामनेंवाचा वेधियेलें ॥**

सर्वत्र विठ्ठल संचरून जातो आणि संतांचा बोध-अबोध, जीव कि प्राण म्हणून श्री विठ्ठल भक्तांच्या काया-मन-वाचेचा अलौकिक, अविभाज्य अंग होऊन जातो ! संत एकनाथ महाराज तर पंढरीची वारी म्हणजे संतांची दिवाळी असून,

**नित्यता दिवाळी नाहीं तेथें द्वैत ।**
**नित्यता अच्युत तिष्ठतसे ॥**

द्वैताद्वैत संपवून टाकण्याचे उत्तम साधन किंवा माध्यम म्हणजेच वारी ! पंढरीच्या वारीने सर्वांनाच वेड लावल्या कारणाने पंढरी-वारी-वारकरी आणि त्यांचे जगणे वेगळे करणे म्हणजे जणू देहातून श्वास काढून टाकल्यासारखेच होईल !

पंढरीची वारी ही महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण भारतीय लोकांच्या मनी-मानसी का उतरली? ती जगातील तमाम संशोधकांचा संशोधन विषय का बनली? या प्रश्नांचे उत्तर संत तुकोबाराय मोठा सुंदर अभंग लिहून देतात. पंढरीचे वाळवंट आणि तेथे जमलेल्या तमाम बळीवंत वारकऱ्यांमधील श्री विठ्ठल-रुक्मिणीवरील नितांत निष्ठा आणि सामाजिक सलोख्याचे हे सुरम्य उदाहरणच ! वारकऱ्यांसाठी हा प्रसंग म्हणजे,

**खेळ मांडीयेला वाळवंटी घाई ।**
**नाचती वैष्णव भाई रे ॥**
**क्रोध अभिमान गेला पावटणी ।**
**एक एका लागतील पायी रे॥**
**वर्ण अभिमान विसरली याती ।**
**एक एका लोटांगणी जाती ॥**
**निर्मळ चित्ते झाली नवनीते ।**
**पाषाणा पाझर सुटती रे ॥**

या ओळींनी आधुनिक कालखंडातसुद्धा वारी सुकर आणि सर्वसमावेशक झाली. इतर देवी-देवता-दैवतं यांच्या भक्तीसाठी विशेष अट्टहास करावा लागतो, परंतु माझ्या पांडुरंगाला भेटण्यासाठी कोणत्याच विशेष साधनाची गरज नाही ! एक काळ तर संपूर्ण भारत देश वर्णव्यवस्थेने पोखरून निघालेला असतांना तमाम मानव जातीला जाहीरपणे सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमण्याचे ठिकाण म्हणजे पंढरपुरचे हे वाळवंट! त्यामुळेच आज आषाढी एकादशीदिनी पंढरी आणि वाळवंट हे आम्हां तमाम वारकऱ्यांसाठी भूवैकुंठच ! आज पंढरीच्या वाळवंटात आनंद ओसंडून वाहतो आहे ! चंद्रभागेच्या दुथडी भरून वाहणाऱ्या पाण्यात अक्षरशः आनंदच प्रवाही झाला आहे ! हाच तर खऱ्या अर्थाने आनंदाचे डोही आनंद तरंग ! आज आम्हा वारकऱ्यांनी सामाजिक एकतेचा, सलोख्याचा तिथे खेळच मांडला असून "यारे यारे लहान थोर" अशी सिंहगर्जना करत वारकरी जीवनाला चिरकालिक विसावा मिळावा म्हणून "नाचत जाऊ त्याच्या गावा" असे भावविभोर होऊन हरिभजनी दंग झाले आहेत ! दंग झालेल्या या वारकऱ्यांसोबत श्री पांडुरंगसुद्धा पितांबर फिटेपर्यंत भावविभोर होऊन नाचतो आहे ! राग, लोभ, द्वेष, अभिमान, जात, धर्म, लिंग, पंथ हे सर्व भ्रम विसरून तमाम वारकरी "विष्णुमय जग" या आपल्या धर्मनीती आणि तत्वाप्रमाणे एकमेकांच्या पाया पडतो आहे, एकमेकांना आलिंगन देतो आहे ! यामुळेच तर पंढरीची वारी सर्वांनाच नित्य वंद्य ठरली आहे ! वारी म्हणजे अंतर्बाह्य निर्मळ होण्याचा अलौकिक आनंद सोहळा ! सर्वसंग परित्याग किंवा निर्मोही मन म्हणजे काय ? याचे उत्तर म्हणजे पंढरपूरची आजची वारी आणि त्यात मस्त डुंबून गेलेले हे वारकरी ! असा पाषाणाला पाझर फोडणारा आनंद सोहळा पृथ्वीवर अन्य कुठेही नाही ! म्हणूनच वारी हे जगातील पहिले आश्चर्यच !



चला तर मग, आपण या अभंग-अक्षरांच्या आधारे पंढरीला जाऊ ! ज्ञानोबा-तुकोबांसोबत आपणही

चला पंढरीसी जाऊं । रखमादेवीवरा पाहूं ॥1॥
डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ॥2॥
संता महंता होतील भेटी । आनंदे नाचों वाळवंटी ॥3॥
तें तीर्थांचे माहेर । सर्व सुखाचें भांडार ॥4॥
जन्म नाही रे आणीक । तुका म्हणे माझी भाक ॥5॥

आपल्या जीवनाचे सार्थक करून घेऊयात ! संपूर्ण शरीराचा शिन-भाग घालविण्याचे एकमेव सहज-सोपे साधन म्हणजेच पंढरीची वारी ! वारी म्हणजेच बाह्यविश्वातून अंतरंगात प्रवेश ! वारी म्हणजेच संसाराने तंग आणि व्यथित झालेल्या जीवाला अंतर्बाह्य शुद्ध करणारा अद्भुत, अगम्य आणि सुरम्य सोहळा ! चला, आपले जगणेही वारीमय करून सर्वच सुख-दुःखे त्या पांडुरंगाच्या चरणी अर्पण करून चीरानंदी राहण्याचे त्याला अभिवचन देऊ आणि जीवन आनंदी वारी-सोहळा करूयात ! असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने वारी करणे होय ! तेंव्हाच आपण ही वैश्विक-सामाजिक-धार्मिक-आर्थिक विचारांची अलौकिक वारी सहजतेने करू शकतो ! "कोण्याही जीवाचा न घडो मत्सर" या तुकोक्ती प्रमाणे तमाम मानव जात आनंदी होईल आणि सर्वांचीच सर्वकाळ चीरानंदी वारी सुरु असेल ! असे होणे म्हणजे सर्व संत, वारी, वारकरी, पंढरी आणि श्री विठ्ठल-रुक्मिणी यांना अखंड प्रसन्न करणेच होय ! हीच अंतरंगातील खरी आनंदवारी होय ! बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल ! पंढरीनाथ महाराज कि जय !

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भेटण्या विठ्ठला, वीट सोडून ये



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**आषाढी वारी म्हटले की महाराष्ट्रातील भागवतांमध्ये म्हणजे विठ्ठलभक्तांमध्ये चैतन्य संचरते. जून महिन्यात सात किंवा आठ तारखेला मृग बरसून गेला की वैशाख संपून ज्येष्ठाचे वेध लागतात पाठोपाठ चाहूल लागते ती आषाढी वारीची. पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनाला आसुसलेले वारकरी देहाने गावात आणि मनाने पंढरपुरात असतात. कुणी वारकरी आळंदी गाठतो तर त तुकोबाच्या पालखीबरोबर येण्यासाठी कुणी वारकरी देहू गावाकडे कूच करतो.**

शेतीची मशागत करून पेरणी झाली की शेतकऱ्यालाच नव्हे तर तमाम महाराष्ट्रीय आणि भागवत भक्तांना ओढ लागते ती विठूच्या दर्शनाची. पंढरीच्या दर्शनाची आणि चंद्रभागेच्या स्नानाची. तसे पाहता तमाम मनुष्यप्राण्याला कधी ना कधी पंढरीला जाण्याची इच्छा असते.

अनेक व्याप, ताप आणि संताप सांभाळता सांभाळता त्याचा कधी वीट येतो हे कळतच नाही. मग त्या विठू माऊलीच्या दर्शनाची आस प्रबळ होऊन कधी एकदा पंढरीला जातो असे सर्वसामान्य भाविकाला वाटते. पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी प्रत्यक्ष चक्रपाणी उभा तिथे ।। हा अनुभव येण्यासाठी मनात त्या परब्रह्माविषयी प्रेम हवे.

असे असले तरी साहित्यिकांना देखील पंढरपूरच्या पांडुरंगाची ओढ असतेच की, त्याच्या भेटीसाठी त्यांचाही जीव तळमळतो अगदी नास्तिक माणसाला देखील ते सावळे परब्रह्म पाहून आनंदच होतो. संतांनी देखील त्या विठ्ठलाशी अभंग आणि ओव्यांतून म्हणजे कवितेतूनच संवाद साधला. अनेक कवींनी त्या विठ्ठलाचे रूपवर्णन केले आहे. याला गझलकार कसे अपवाद असतील. त्यांनीही आपापल्या परीने त्या परब्रह्माचे वर्णन म्हणा. त्याच्यावरील राग म्हणा आपल्या गझलेतून अथवा काही शेरांतून व्यक्त केला आहे.

हा विठ्ठल इतका कसा निष्ठूर झाला आहे, त्याला जराही कणव येत नाही का, आपले भक्त रक्त आटेपर्यंत पायी चालत पंढरीला येतात परंतु त्यांचे अतोनात कष्ट पाहूनही त्या दयाघनाला उमाळा दाटून येत नाही ही खंत उर्मिलामाई व्यक्त करतात.

ज्येष्ठ गझलकारा आणि गझलगुरू ऊर्मिलामाई बांदिवडेकर यांचा हा शेर ऐकून विठ्ठलाला देखील उमाळा फुटावा, त्या आर्त स्वरात आळवतात,

**किती नाम घ्यावे नि वारीस जावे ।**
**कसा विठ्ठलाला फुटेना उमाळा ।।**

जन्मभरीच्या श्वासाइतके मोजियले हरिनाम. तुझी आळवणी करताना भक्त काही कसर सोडत नाहीत. ते अखंड हरिनामात दंग असतात. पायी वारीदेखील करतात. त्यावेळी त्यांनी आपला संसाराचा मोह दूर ठेवलेला असतो. त्यांची काही दुःखे, वेदना, व्यथा, विवंचना विठ्ठलाने न सांगताच दूर केल्या पाहिजेत. शेवटी भक्त कुठल्या तरी कामनेने, इच्छापूर्तीसाठी अगदी सांगून काही मागत नसला तरी सर्वज्ञ असलेल्या विठ्ठलाला करुणेचे उमाळा का फुटत नाही, अशी चिंता माई व्यक्त करतात.

जिंतूर येथील ज्येष्ठ गझलकार रत्नाकर जोशी यांनी आपण निष्ठावंत भक्त असूनही देवाला दया का येत नाही, असा सवाल समस्त वारकऱ्यांच्या आणि भक्तांच्या वतीने थेट विठ्ठलालाच केला आहे. अरे विठ्ठला तू दीनांचा दयाळू आणि भक्तांचा कनवाळू असा तुझा लौकिक असताना दीन दुःखितांनी टाहो फोडून देखील तुला काहीच का दया येत नाही. अखेर तू पत्थराची मूर्ती आहेस की काय, तुला दुबळ्यांचा कळवळा येत नाही का. जन सामान्यांवर अतोनात अत्याचार होत असताना, अस्मानी दुष्काळ घालत असताना आणि सगळ्या विहिरींचे पाझर आटलेले असताना तुझा दयेचा पाझर देखील आटला की काय, असे परखडपणे ते विठ्ठलाला पुढील शेरात विचारतात, ते म्हणतात,

**चुकवली नाही कधी जन्मात वारी**
**विठ्ठला केंव्हा तुला फुटणार पाझर**

तुला आळवून आमची छाती फुटते, आमचे हृदय विदीर्ण होते. जन्मभरात कधी वारी चुकवली नाही, अपवाद कोविडच्या महामारीचा. परंतु तू आमची किती परीक्षा पाहतोस, कनवाळू हे आपले ब्रीदही तू विसरलास काय, अशी तक्रार करून तुला केव्हा पाझर फुटणार, हे तरी सांग, असे निक्षून विचारतात.

उस्मानाबाद येथील गझलकार भागवत घेवारे हे तर भक्तीरसात डुंबलेले खरेखुरे भागवत आहेत. ते अधिकारवाणीने विठ्ठलाला सांगतात की, हे परमेश्वर

**ते काढ हात आता कमरेवरून खाली**
**दे दोन घास भोळया नामास पांडुरंगा**

किती युगे तू विटेवर कमरेवर हात ठेवून उभा राहणार आहेस. तुझे भक्त दुष्काळाच्या कचाट्यात सापडतात, उपाशी असतात. नामधारक असे भक्ताला संबोधतात, त्या भोळ्या नामाला दोन घास सुखाचे आता तरी दे. त्यासाठी कमरेवर धरून ठेवलेले हात बाजूला कर आणि नाम्याच्या मुखात अन्न जाऊ दे.

संतांनी देखील विठ्ठलाशी भांडण केले आहे. अर्थात ते प्रेमाचे भांडण होते. तो या हृदयाचा त्या हृदयाशी झालेला संवाद असायचा. त्याच्याविषयी ज्ञात असलेले अनुभव आपल्याला येत नाहीत, याचा खेदही त्यातून व्यक्त व्हायचा. अभक्त नव्हे तो भक्त । आणि आपुलकीच्या पोटीच आपण त्या विठ्ठलाला प्रेमानेच भांडतो. त्याच्याशी संवाद साधता साधता वादही घालतो. असाच वाद पंढरपूरचेच एक गझलकार प्रत्यक्ष विठ्ठलाशी घालतात. अर्थात हा वाद तात्त्विक पातळीवरील आहे. विठ्ठल आहे का, तो कसा आहे. संतांनी वर्णन केलेली मूर्ती विटेवर आहेच. परंतु त्याहीपलिकडे ते परतत्त्व असलेले परब्रह्म म्हणजे विठ्ठल. आधी जिज्ञासा असावी लागते. वादे वादे जायते तत्त्वबोधः असे म्हणतात ते कळण्यासाठीतरी सत्य आणि असत्य (कल्पना किंवा मिथ्य) यांच्यात किंचित अंतर असते. कान आणि डोळ्यांमध्ये चार बोटांचे अंतर असते. तेवढेच अंतर सत्य आणि कल्पनेतील असते. खरे तत्त्व कळण्यासाठी ही सत्य आणि कल्पनेतील दरी पार करून जावे लागते. ही दरी मी पार करून गेलो असे वैभव वसंत कुलकर्णी म्हणतात.

**सत्य आणिक कल्पनेमधली दरी ओलांडतो मी..**
**विठ्ठलाशी भांडतो म्हणजे स्वतःशी भांडतो मी !**

सत्य आणि कल्पनेच्या पार जाऊन नेमके सत्य काय आहे हे विचारण्यासाठी ते विठ्ठलाशीच वाद घालतात. भांडतात. म्हणजे ते स्वतःशीच भांडतात. प्रत्येकाच्या हृदयात असलेल्या परमेश्वराशी ते भांडतात. इथे संत तुकोबांच्या उक्तीची आठवण होते. तुका म्हणे होय मनाशी संवाद आपुलाची वाद आपणासि ।। हीच कृती गझलकार कुलकर्णी या शेरातून करताना दिसतात.

जैसा ज्याचा भाव तैसा त्याचा देव हा संतांनी दाखवलेला मार्ग आहे. तुम्ही कल्पना कराल त्या रूपात तुम्हाला देव दिसेल. संतांनी विठ्ठलाला आई म्हटले आहे. ये गं ये गं विठाबाई माझे पंढरीचे आई ।। असे संतांनी विठ्ठलाला माऊली म्हटले आहे. ते त्याला मायबाप असेही संबोधतात. एक गझलकार आत्तम गेंदे म्हणतात,

**दिसते म्हणे जगाला त्या विठ्ठलात आई**
**का मग मलाच दिसतो विठ्ठल तुझ्यात आई**



प्रत्येकजण विठ्ठलाला आई म्हणतो खरा. त्या प्रेममूर्ती विठ्ठलाला सगळे जग आई संबोधते. प्रत्येकाला त्या ममताळू रूपात आईचे रूप दिसते. मीही विठ्ठलाच्या कारुण्यमूर्तीकडे बघतो आणि त्याच रूपात त्याला आळवतो, असे आत्तम गेंदे म्हणतात. जरी साऱ्या जगाला विठ्ठलात आईच दिसते हे खरे असले तरी खरे मातृभक्त असलेले आत्तम गेंदे यांना मात्र आईमध्येच विठ्ठल दिसतो. ते म्हणतात का मग मलाच दिसतो विठ्ठल तुझ्यात आई. विठ्ठलाच्या मूर्तीत मातृरूप विठ्ठल पाहण्यापेक्षा आईमध्येच विठ्ठलाला पाहावे आणि तिचीच मनोभावे सेवा करावी, हे श्रेयस्कर असे ते सांगतात.

अगदी हीच भावना अमोल पाटील गोंडचवर आपल्या शेरात जरा वेगळ्या स्वरूपात मांडतात,

**टाळतो वारीस जाणे हेच कारण**
**माय रखुमा बाप पांडुरंग होतो**

अगदी हीच भावना संत एकनाथांनी व्यक्त केली आहे, एका अभंगात ते म्हणतात,

**बाप आणि आई माझी विठ्ठल रखुमाई**

अर्थात जगाचा पालनहार विठ्ठल परमात्मा असतो हेच सत्य ते सांगतात.

शेतात राबणारा शेतमजूर असो किंवा बांधकामावरील मजुराला आपला देव आणि धर्म काम हेच वाटते. इंग्रजीमध्ये एक म्हण आहेच की, वर्क इज वर्शिप. त्या उक्तीप्रमाणे रोजचे काम हे भक्ताला नाम वाटे. सगळ्या संतांनी देखील आपले विहित नित्य कर्म करताना त्यातच विठ्ठल पाहिला. सावता माळ्यांना कांदा मुळा भाजी हीच अवघी विठाई वाटते. गोरोबाकाक चिखल तुडवताना मुखाने विठ्ठलाचा गजर करतात. ते त्यात इतके गुंग होतात की, आपल्या पायाखाली आपला मुलगाही तुडवला जाऊन मरणपावल्याचे त्यांच्या लक्षात येत नाही, हाच धागा यशवंत मस्के यांनी पकडला आहे, ते या शेरात म्हणतात की,

**सदा दिसतो मला थेंबात घामाच्या**
**विठू सामावला कष्टात का इतका**

अखेर भक्त आपल्या प्रभूचा विठ्ठलाचा धावा करतो. त्याला वाटते आपले दुःख या भक्तीने दूर होईल. आपल्याला संकटातून तोच विठ्ठल तारून नेईल, या विश्वासावरच तो भक्तीत देहभान विसरून रंगतो. तो म्हणतो युगे अठ्ठावीस तू या विटेवर उभा आहेस. आम्ही भक्तही शतकानुशतके (ज्ञानेश्वर माऊली साडेसातशे वर्षांपूर्वीपासून) भक्ती करत आहेत. वारीसाठी दिंड्या पताकांचे भार घेऊन जातात, त्या विठ्ठलाला आर्ततेने साद घालतात, त्याने त्वरेने धावून यावे, एवढीच त्यांची माफक अपेक्षा असते.

तुळजापूरचा तरुण गझलकार धनाजी जाधव म्हणतो, की

**हाक देतो तुला, आज धावून ये,**
**भेटण्या विठ्ठला, वीट सोडून ये !**

ज्येष्ठ गझलकार दिवाकर वैशंपायन त्याला पंचेंद्रियाद्वारे जाणतात.

**शब्द स्पर्श रूप रंग पांडुरंग पांडुरंग।**
**श्वास घासही अभंग पांडुरंग पांडुरंग ॥**

ही भक्ती आपण सर्वांगाने करतो. शब्द, स्पर्श या पंचेद्रियांच्या भावना त्याद्वारे पांडुरंगाचा अनुभव आपल्याला येतो. आपला श्वास अन् घासही अभंग पांडुरंग आहे, असा त्यांचा विश्वास आहे.

युगे अठ्ठावीस हा देव कमरेवर हात ठेवून पुंडलिकांच्या आज्ञेवरून विटेवर उभा आहे. तो ईश्वर आहे, त्याला सर्व शक्य आहे. त्याला सर्व जगाची चिंता आहे, असे म्हणतात, परंतु प्रत्यक्षात जगताना प्रत्येकाला कष्ट आपले आपणच करावे लागतात. हेच खरे. प्रपंच, कुटुंब आणि कुटुंबीय यांच्यासाठी सामान्यांना खस्ता खाव्या लागतात त्या विठ्ठलाला कुठे आहेत. तो तर रखुमाईपासूनही दूर आहे. तो जगाची काळजी घेतो की जगच त्याची काळजी घेते गुजरातमधील दिवाकर चौकेकर यांचा हा प्रश्न आहे.

**सांग विठ्ठला तुझ्यासारखा उभा कसा राहू ?**
**कुटुंब कबिला जबाबदारी तिथे कसा येऊ ?**

वारीसाठी यायचे आहे, परंतु प्रपंच कसा वाऱ्यावर सोडायचा. आपल्या कुटुंबाची, मुला बाळाची जबाबदारी आहे, मग तिथे कसा येऊ ही त्यांची अडचण आहे.

आमचा तरुण गझलकार दिनेश राजपूत देखील पांडुरंगाच्या प्रेमात पडला आहे. महाराष्ट्रभरातून वारकरी पायी चालत चालत पंढरपूरला जातात तिथे प्रत्यक्ष शांतमूर्ती पांडुरंगाचे दर्शन घेऊन धन्य होतात. म्हणून मीही माझा षड्रिपूंनी घेरलेला जन्म टाकून आता वारकरी झालो आहे. वारकरी होण्यासाठी आपल्याला काम क्रोधादि अवगुणांचा त्याग करावा लागतो. मोहातून सुटला तोच नवा जन्म झाला, हाच अनुभव दिनेशला येत आहे.

तो म्हणतो,

**गळा घातली तुळशी माळा, जन्म मी नवा घेतला**
**वारी करता करता मजला, माझा पांडुरंग भेटला**

एकदा वारी केली आणि पांडुरंगाची भेट झाली असे नसते. त्यासाठी जन्मभराची वारी करावी लागते. हरिभक्तीत झोकून द्यावे लागते. अशी वारी करता करता एखादवेळी पांडुरंग भेटेलही असा विश्वास येथे गझलकाराने व्यक्त केला आहे.

ज्येष्ठ गझलकार नामदेव आबने विठ्ठल भक्तीत सर्वधर्मसमभाव जपतात. ते म्हणतात,

**नसे जातिपाती सगे सोयरे हे**
**अशी नांदते एकता पांडुरंगा**

सगळे संत अठरापगड जातीत जन्माला आले. पालखी बरोबर चालत पंढरीची वारी करतात. एकमेका लागतील पायी रे असे जातिभेद विसरून हरिनामाच्या गजरात देहभान हरपून वागतात. एकता जपणारे दैवत पांडुरंग हा अनुभव ते घेतात.

माझाही एक शेर आहे

**नाम घेता जीभ अडते चोचल्यांना सोकलेली**
**वासना जाळून टाकी जीवनाची पांडुरंगा**

एकंदरीत छंद आणि मात्रांच्या हिशोबात गुंग झालेल्या गझलकारांनाही त्या पांडुरंगाचा विसर पडलेल नाही, हेच खरे.. जय हरी विठ्ठल.

# ' Bioscope: 'चार कवी चार दिग्दर्शक एक चित्रपट '

आधुनिक केसरी

**हा मराठी सिनेमा म्हणजे अगदी निराळ्या कथांवरचे अतिशय उत्कृष्ट काम आहे ! 1) कथा : दिल-ए-नादान , कवी : मिर्झा गालिब , दिग्द. गजेंद्र अहिरे, भू. नीना कुलकर्णी, सुहास पळशीकर, 2) कथा : एक होता काऊ, कवी : सौमित्र , दिग्द. : विजू माने , भू. कुशल बद्रिके, स्पृहा जोशी 3) कथा : बैल , कवी : लोकनाथ यशवंत, दिग्द. गिरीश मोहिते, भू. मंगेश देसाई , स्मिता तांबे 4) कथा : मित्रा, कवी : संदीप खरे, दिग्द. रवी जाधव , भू. वीणा जामकर, संदीप खरे.**







**दिल ए नादान**

या व्यावहारिक जगापासून दूर गेलेल्या एका वयोवृद्ध शास्त्रीय गायिकेची आणि तिचा समवयस्क सखासोबती असलेल्या सारंगीवादकाची ही कथा आहे . समाजाला त्यांची गरज आता राहिलेली नाही , नवे गायक व त्यांचे नवे गाणे प्रसिद्ध आणि लोकप्रिय होत आहे . सामान्य माणसांप्रमाणे स्वतःचे सांसारिक जीवन न जगता आपले आयुष्य केवळ ज्या कलेला वाहिले ती कला आता आपल्यासाठीच राहिली आहे , हे स्वीकारणे त्यांना जड जात आहे . दोघे कशीबशी एकमेकांची समजूत घालत , शांत राहण्याचे आटोकाट प्रयत्न करत , दुःखाशी जमवून घेत जगण्याचा हा वेगळा आयाम आपलासा करतात . पडद्यावर संथपणे गालिबची गझल गाताना सहजतेने उलगडत जाते !

**एक होता काऊ**

काळा मुलगा व गोरी मुलगी यांची बालपणापासूनची घट्ट मैत्री, सहवास, एकमेकांची मने ओळखणे व जपणे - मोठे होऊन घरात लग्नाचे विषय सुरू झाल्यावर आलेले हताशपण - काळ्या रंगामुळे कावळ्या अशी हाक मारली जाणे याचे काहीही न वाटणारा स्वप्निल पाकळीचे लग्न ठरल्यावर मात्र निराशेने व दुःखाने अगदी सैरभैर होऊन बोलेनासा होतो , रागावून वागायला लागतो - तिने अनपेक्षितपणे आपले अव्यक्त मन त्याच्यापाशी अचानक उघडे करणे त्याला सुखावून टाकते , मात्र त्याच्या दुःखाशी समरस होण्याची तिची आगळी तऱ्हा त्याला आणि प्रेक्षकांनाही अगदी धक्काच देते , पण ते छोटेसे सुख त्याचे मन भरून टाकते !

**बैल**

शेतकऱ्याचे कष्टाचे जगणे न जाणणारे शहरी जीवन, केवळ पैशाची श्रीमंती मिरवणारे महानगर, शेतीच्या उत्पन्नावर म्हणजे दुसऱ्याच्या जिवावर स्वतः गब्बर होणारे व्यापारी, इतक्या परिश्रमानंतरही पुरेसा पैसा न मिळणारे शेतकरी, शेतीत राबणारा माणूस हा जणू बैलच समजणारा भावनाहीन समाज, मालक (सरकार) बदलले तरी परिस्थिती तशीच, कर्जाचे व्याज वाढतेय पाहून त्याचा अवाजवी भार सोसत राहणारा, पोटासाठी बायकोने शरीर विकणे सहन न होऊन हतबल होत वांझोटी चिडचिड करणारा, बैल विकूनही फारशी स्थिती बदलत नाही पाहून निरुपायाने लहान पोरीसह स्वतःचा जीव घेणारा अगतिक शेतकरी - आपण केवळ बघेच असतो!

**मित्रा**

विजय तेंडुलकरांचे ' मित्राची गोष्ट ' हे नाटक अगदी सूचक व कलात्मक रीतीने चित्रपट-स्वरूपात आणले आहे . वेगळ्या लैंगिकतेची जाणीव मैत्रीतल्या मोकळेपणाला ओलांडून सीमेपलीकडे पोचली , तरीही माणूसपण जपणं कसं जास्त महत्त्वाचं असतं हे ? ठसवणारी ही कथा !

कसदार कथा , जिवंत अभिनय , दमदार दिग्दर्शन , आशयाला खुलवणारे व त्यात एकजीव होणारे संगीत या चारही बाबी या लघुचित्रांच्या जमेच्या बाजू आहेत.

# 'मी नथूराम गोडसे'ची संघर्ष कहाणी...



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**शरद पोंक्षे हे एक उत्कृष्ट अभिनेते आहेत. मराठी आणि हिंदी अशा दोन्ही चित्रपटात त्यांनी कामे केली आहेत. तसेच दूरचित्रवाणीवरील मालिकांमध्ये कामे केली आहेत. त्यांच्या कुंकू, आभाळमाया, उंच माझा झोका, अग्नीहोत्र, वादळवाट, अशा अनेक मालिका गाजल्या आहेत. आणि लोकप्रिय झाल्या आहेत. तसेच त्यांनी "हे राम" या कमल हसन यांच्या हिंदी चित्रपटात नथुराम ची भुमिका केली आहे. शरद पोंक्षे लक्षात राहतात ते त्यांच्या अतिशय गाजलेल्या नाटकामुळे. आणि ते नाटक होते "मी नथूराम गोडसे बोलतोय." आणि "मी आणि नथूराम" पुस्तक म्हणजे "मी नथूराम गोडसे बोलतोय" या नाटकाची संघर्ष कहाणी.**

नाटक. 10 जुलै 1988 ला रंगभूमीवर आले. आणि मार्च 2018 या नाटकाचे प्रयोग पूर्णपणे बंद झालेत. एकूण वीस वर्षाच्या कारकिर्दीत या नाटकाचे "मी नथुराम गोडसे बोलतोय' आणि "हे राम नथुराम" या नावाने असे एकूण 1100 प्रयोग झालेत. पुणे, मुंबई, कणकवली,वेंगुर्ला, रत्नागिरी, नासिक, नागपूर, चंद्रपूर, मिरज, सांगली,लातूर, बडोदा, कोल्हापूर, सोलापूर अशा अनेक ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रात नाटकांचे प्रयोग झालेत. सर्वाधिक प्रयोग पुण्यात झाले.

शरद पोंक्षे म्हणतात मला हे नाटक करताना विविध प्रकारचे अनुभव आलेत. काही चांगले तर काही वाईट दुसरे म्हणजे.मला या नाटकाने काय दिलं? किती समृद्ध केल ? हे सगळं कुठेतरी शब्दबद्ध करावं असे वाटत होते आणि त्या विचारातूनच "मी आणि नथुराम" हे पुस्तक साकारले. या मागची प्रेरणा माझी मैत्रीण अश्विनी एकबोटे ही होती.

"मी नथुराम गोडसे बोलतोय" या नाटकात स्वतःची निवड कशी झाली हे सुद्धा त्यांनी सविस्तरपणे सांगितले आहे. महात्मा गांधीचा खून करणाऱ्या नथुरामची बाजू मांडणार हे नाटक, त्यात नथुराम हिंदुत्ववादी, सावरकर भक्त, अफाट देशप्रेम, आणि त्यांनी त्या भूमिकेला सार्थक कसे केले याविषयी या पुस्तकात त्यांनी सविस्तर लिहिले

आहे. ही भूमिका तंतोतंत जमावी म्हणून पोंक्षेनी "गांधी हत्या आणि मी" 55 कोटीचे बळी,असे ज्या ज्या पुस्तकावर हे नाटक आधारित आहे ती सगळी पुस्तके वाचली, आणि नथुरामची मानसिकता समजून घेऊन त्या भूमिकेशी एकरूप झाले. त्यांचे बंधू गोपाळ गोडसे यांच्याकडून त्याच्या सवयी बोलण्याची पद्धत सर्व जाणून घेतले आणि याचा उपयोग झाला. अर्थातच त्यांच्या या भूमिकेमुळे हे नाटक प्रचंड गाजले. पण एकीकडे महात्मा गांधीचा मारेकरी नथुराम गोडसे आणि त्याचे विचार हे काही लोकांना पचनी पडणार नसल्याने भयंकर हलकल्लोळ माजला आणि जवळपास सातच प्रयोगानंतर हे नाटक बंद करावे लागले. अर्थातच सरकारकडून त्याच्यावर बंदी आणली गेली. कारण हे नाटक एका ऐतिहासिक घटने वरचे नाटक होते. नथुराम प्रेक्षकांना गांधीहत्ये मागची त्याची भूमिका सांगतोय. नथुराम प्रेक्षकांशी संवाद साधतोय आणि त्या संवादातून घडलेले प्रसंग अशी या नाटकाची रचना होती. या नाटकाची तालीम सुरू असतानाच काही धमकीचे फोन यायला सुरुवात झाली. आणि मी आम्हाला सगळ्यांना विचित्र फोन यायचे. नाटकाच्या शुभारंभ नंतर तुमची प्रेत यात्रा काढू वगैरे वगैरे. त्यामुळे एक वेगळेच वातावरण तयार झाले.मानसिक तणाव वाढला.

मग लक्षात आलं की आपण जे नाटक करतोय फार मोठा धोका पत्करला आहे. 1988 ला लिहिलेलं नाटक रंगभूमीवर याला दहा वर्षे लागली. दहा वर्षानंतर सेंसार बोर्ड प्रमाणपत्र मिळाल. डॉक्टर श्रीराम लागू यांनी भूमिका करावी अशी लेखक प्रदीप दळवी यांची इच्छा होती पण भूमिका न पटल्याने, एकांगी असल्याचे सांगत त्यांनी नकार दिला.


10 जुलै 1988 रोजी शिवाजी मंदिर येथे पहिला प्रयोग होता हाउसफुल च्या बोर्डला हार घातलेला होता. खूप बरे वाटले. शरद पोंक्षे म्हणतात हे नाटक काही साध नव्हतं. नथुराम गोडसे वरिल नाटक होत. ज्याला या देशात पन्नास वर्षात न्याय मिळाला नव्हता ज्याच्या बाजूने उघडपणे कोणी बोलू शकत नव्हत, आणि समर्थन करण्याच धाडस कोणी केले नाही. कारण त्याने राष्ट्रपिता महात्मा गांधींना मारले होते. भारताचा इतिहासात महात्मा गांधीचे स्थान अन्नसाधारण. एखादी चुकीची बाजू समोर आणणे हा घोर अपराध होता, आणि त्याला विरोध होणार हे स्वाभाविक होते.

आपल्या देशात एखाद्या व्यक्तीला देवपण दिले जाते आणि त्यानंतर त्यांनी केलेल्या चुकीच्या गोष्टीचही समर्थन केले जाते. त्यातच महात्मा गांधीचा खून करणाऱ्या नथूरामची बाजू मांडणार हे नाटक. त्यात नथूराम हिंदुत्ववादी, सावरकर भक्त अफाट देशप्रेम अशा माणसाची बाजू मांडणार नाटक रंगभूमीच्या इतिहासात प्रथमच येणार होत. ही मोठी धाडसाची गोष्ट होती. पन्नास वर्षे दडलेला इतिहास लोकांसमोर येणार म्हणून अनेक लोक सुखावले होते तसे अनेक धास्तावले ही होते.

पहिला प्रयोग यशस्वीपणे संपला. नाटकाला सुधीर फडके आले होते. ते आत आले त्यांचे डोळ्यात पाणी होते. आशीर्वाद दिला. हात घट्ट धरला आणि म्हणाले माझ्याकडे शब्दच नाहीत आणि किती वेळेस स्तब्ध राहिले.

अचानक एक वयस्कर गृहस्थ आले त्यांनी चप्पल काढली आणि काही न बोलता माझ्या पाया पडले. क्षणभर मला काय होते हेच कळेना. कारण असा अनुभव मी कधीच घेतला नव्हता. पहिले पाच प्रयोग हाउसफुल झाले. नाटकाची जबरदस्त हवा झाली होती. सर्व लोक माझ्याकडे आदराने पाहत होते. सातवा प्रयोग आणि त्यावेळेस अचानक वृत्तपत्रात बातमी आली आणि नथूराम गोडसे नाटकावर बंदी आली होती. त्यावेळी गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांनी महाराष्ट्र सरकारला नाटक पाहून निवेदन द्यायला सांगितले होते. राज्यात शिवसेना भाजप युती राज्य होते. प्रमोद नवलकर सांस्कृतिक मंत्री होते. त्यांनी हे नाटक पाहून सरकारला रिपोर्ट पाठवायचा होता. प्रयोग झालाच नाही पण मुख्यमंत्र्यांना फँक्स पाठवून नाटकावर बंदी घालण्यात आली. नाटक सुरू राहावं त्याचे प्रयोग व्हावे अशी स्व.बाळासाहेब ठाकरे यांची खूप इच्छा होती त्यांनी तसे प्रयत्नही केले पण तरी बंदी आलीच आणि आणि नथूराम नाटक बंदित अडकले. आयुष्यात मोठासंघर्ष सुरू झाला.. दूरदर्शनवर गांधींना गोळ्या घालण्याचा प्रसंग अनेक वेळा दाखवला गेला होता, हिंदी चित्रपट कलाकार आणि निर्माता कमल हसन त्याच वेळी "हे राम" या चित्रपटाची निर्मिती करत होता. तो गांधी हत्येवरच होता .त्यामुळे नथूरामची भूमिका त्यात अपरिहार्य होती , अचानक मला त्याची पत्नी सारिका हिचा फोन आला आणि नथूराम ची भूमिका तुम्ही कराल का ? विचारले. मला आनंद झाला मी नाही म्हणणं शक्यच नव्हते. आणि त्या चित्रपटाचे काम मला मिळाले. विशेष म्हणजे 7000 रुपये दररोजचे असे सहा दिवसाचे 42 हजार रुपयाचा डिमांड ड्राफ्ट दिला मी विचारले तर म्हणाले डिमांड ड्राफ्ट बाउन्स होत नाही चेक मात्र होतो . जाण्यायेण्याचे विमानाचे तिकीट विमानतळा पासून घरापर्यंत जाण्यायेण्याचा खर्च आणि मुंबईत आल्यावर पुन्हा घरी जाण्यासाठी पाचशे रुपये असे सगळे त्यांनी दिले त्याचबरोबर भरपूर प्रसिद्धीही दिली.

2001 मध्ये नाटक कोर्टातून सुटले आणि त्याला परवानगी मिळाली. परवानगी मिळाल्यानंतर नाटकाचे तीन महिन्याच्या आत पहिला प्रयोग व्हायला हवा तरच त्याच्या अधिकार निर्मात्या कडे राहतात म्हणजे आता तीन महिन्यात त्याचा प्रयोग करावा लागणार होता. 17 जुलै 1998 रोजी बंद पडलेले नाटक 16 मार्च 2002 ला




सुरू झाले आणि दीनानाथ मंगेशकरला हाउसफुल प्रयोग झाला .हे अकरा मार्च 2018 पर्यंत चालले आणि तब्बल 1100 प्रयोग झाले. साडेआठशे पर्यंत मात्र हे नाटक हे राम नथुराम या नावाने आले 16 मार्च 2012 प्रवेश सुरू झाल्यानंतर पहिल्यांदा आम्ही दोऱ्यावर जाणार, पण त्याच्या आदल्या दिवशी मुलुंडला कालिदास ला प्रयोग होता. आमच्या नाटकाची बस जाळली होती . तिची राख झाली होती. गांधींच्या भक्तांनी एक नाटक बंद पडण्याचा घाट घातला होता. बस जाळणाऱ्याला पोलिसांनी पकडले तो काँग्रेसचा कार्यकर्ता होता. त्याने अशाच प्रकारे गडकरीचे प्रयोगात घुसखोरी करून प्रयोग बंद पाडण्याचा प्रयत्न केला होता.प्रयोग हाउसफुल होता. आमचे जरी नाटकाचे सामान बरेचसे जळून गेले होते तरी आहे त्या परिस्थितीला त्याच प्रयोगाला नाटक केले. संपल्यानंतर दोन जन्मांध प्रेक्षक आले होते. नाटक संपल्यानंतर ते आत मध्ये आले आणि मला म्हणाले आम्ही जन्मांध आहोत .नाटक काय असतं हे आम्हाला माहीत नाही .नेपथ्य कपडे कसे असतात हे आम्ही कधी पाहिले नाही. त्यामुळे आम्ही नाटक ऐकतो आम्ही तुम्हाला ऐकून शंभर टक्के तृप्त झालो.

पुण्याच्या भरत नाट्य मंदिरात एका स्त्रीने नाटक संपल्यावर येऊन भावना व्यक्त केल्या माझ्या पाया पडली रडत होती आणि माझ्या हातात एक पाकीट ठेवले नंतर मी ते पाकीट बघितले तर त्यात रक्कम न लिहिलेला सही करून दिलेला चेक होता हे प्रेम मला मिळाले तो चेक मला एखाद्या ऑस्कर पुरस्कार वाटला. तो चेक मी लॅमिनेशन करून आठवण म्हणून ठेवला.अशा या आठवणी सोबतच

कणकवलीला, चंद्रपूरला, नागपूरला, तसेच लातूरला,पंढरपूरला प्रयोग करताना अनेक वाईट अनुभवही आले.

मुंबईत शिवाजी मंदिरला माधुरी दीक्षित नाटक बघायला आली होती पण तिने फोटो काढणार नाही सुरुवातीला म्हटले, परंतु नाटक बघितल्यानंतर तिला न राहून ती सचिन पिळगावकर बरोबर मला भेटायला आली. आणि आम्ही फोटो काढला. शिवाजी मंदिरला बटाटा वडा छान मिळतो तो खाण्याचा आग्रह केला तो खाल्ला. आणि मला म्हणाली खूप सुंदर नाटक करतात.अप्रतिम. असे खूप छान अनुभव आलेत. वामन तावडे गांधीवादी असूनही नाटकाला आवर्जून आलेत .अनेक वेळा निदर्शने करणारी कार्यकर्ते सुद्धा नाटक बघून माझ्या भूमिकेची वाहवा करायची.. पक्षासाठी काही गोष्टी करायला लागतात असे म्हणायचे.

या नाटकात सुरुवातीपासून ते नाटक प्रयोग संपेपर्यंत आलेले चांगले वाईट अनुभव तसेच सगळ्यांना झालेला मनस्ताप, निर्मात्याने केलेला मनमानी कारभार, आर्थिक कोंडी,तसेच मानधन वाढवण्यासाठी दिलेला नकार, असे सर्वच गोष्टी यात आले आहेत. त्यासाठी मी आणि नथूराम हे पुस्तक वाचायला हवे.

जिने मला हे पुस्तक लिहिण्यासाठी उद्युक्त केले आणि माझ्या हाती पेन आणि डायरी दिली ती माझी मैत्रीण अश्विनी एकबोटे आज हे पुस्तक बघायला नाही हे दुःख ते व्यक्त करतात.

विक्रम गोखले पुस्तकाविषयी मनोगतात म्हणतात.. माझ्या मते मोहनदास दोन गोष्टीसाठी कौतुकास पात्र आहेत एक म्हणजे दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश भारतीय साठी त्यांनी दिलेला प्रामाणिक लढा, आणि दुसरे म्हणजे भारतातल्या गरीब अडाणी अशिक्षित जनतेस ब्रिटिश सत्तेविरुद्ध विरोध करण्याची मानसिक शक्ति. त्यांनी स्वतःसाठी काही केलं नाही ते राष्ट्रीय संत म्हणून उभे राहिले परंतु ज्या क्षणी हे सगळं बाजूला ठेवून ते राजकारणात उतरले त्या क्षणापासून ते हटवादी नेता म्हणून सुप्रसिद्ध झाले. खरंतर कुप्रसिद्धच ! तसेच नथुराम गोडसे यांच्या बद्दल ते म्हणतात त्यांनी स्वतःसाठी काहीच केलं नाही, मागितले नाही, गांधी- गोडसे यांच्यात वैरभाव नव्हताच. दोघांनी आपापल्या विचाराप्रमाणे आपली आयुष्य आखली. दोघांनी प्राण अर्पण केले ते स्वतःच्या वैयक्तिक स्वार्था करता नाहीत .दोघांनीही, विशेषतः गोडसे यांनी देशातील कोट्यावधी हिंदूंचं वाटोळ होणार हे हेरलं. त्याचवेळी त्यांची विधीलिखित ठरली. वधा नंतर गांधी एकदम महात्मा झाले आणि नथुराम दहशतवादी ठरले. शिवाय ते ब्राह्मण त्यामुळे ब्राह्मण समाजाविरूद्ध मत तयार झालं ते अद्यापही बदलत नाही. माझ्या मते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे मो.क. गांधींपेक्षा श्रेष्ठ होते. आहेत .त्यासाठी आपल्या देशाचा राजकीय इतिहास तपासाला पाहिजे. वाचायला हवे. शरदचे हे पुस्तक जरूर वाचा.

शब्दामृत प्रकाशन चे पार्थ बाविस्कर यांनी पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तकाला सुनील धोपावकर यांचे मुखपृष्ठ आहे. आता या पुस्तकांसोबत "मी नथुराम गोडसे बोलतोय" नाटकाची सीडी पण उपलब्ध आहे .पुस्तकात आपल्याला नाटक आणि रंगभूमीवर नाटक आल्यावरचे अनुभव, कडू-गोड आठवणी वाचायला मिळतील.

**पुस्तक : मीआणि नथूराम, लेखक : शरद पौंक्षे, शब्दामृत प्रकाशन, संभाजीनगर, संपर्क : 9970077255**

# धमाल गोष्टींचा खजिना : 'रोज नवी गोष्ट हवी'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मुलांना रोज नवीन कोणती गोष्ट सांगायची? हा प्रश्न पालकांना हमखास पडतो. पण काळजी करु नका. व्यास क्रिएशन्स घेऊन आले आहेत बच्चे कंपनीसाठी धमाल गोष्टींचं पुस्तक. लेखिका, बालसाहित्यिक डॉ. सुमन नवलकर लिखित 'रोज नवी गोष्ट हवी' हा बालकथासंग्रह. या बालकथासंग्रहात एकूण ५० बालकथांचा समावेश आहे. साधी सरळ रचना, सहजसोपी भाषाशैली, कथांचं संक्षिप्त स्वरूप आणि त्यातील रेखाचित्रे यामुळे पुस्तक वाचनीय तर झाले आहेच पण आकृतिबन्ध , आतील रचना यामुळे पुस्तक आकर्षक वाटतं.**

माणूस हा सामाजिक प्राणी आहे. पूर्वीपासून तो समूहाने राहत आलेला आहे. व्यक्त होण्याच्या माध्यमातून बोलणं - ऐकणं ही प्रक्रिया घडू लागली. आपल्या भावभावना, वेदना तो व्यक्त करू लागला. या प्रक्रियेतून कथाकथन हा प्रकार विकसित होऊ लागला. आपल्याला माहीत असलेली गोष्ट किंवा प्रसंग, घटना इतरांना सांगणं यामुळे कथन प्रकार पुढे आला. यातून आख्यायिका, पौराणिक कथा, दंतकथा, देवदेवतांच्या कथा, परिकथा, पंचतंत्र, राजा-राणी आणि राक्षसाची गोष्ट, विक्रम - वेताळ अशा अनेक कथा पिढ्यानपिढ्या प्रचलित झाल्या.

बालपण म्हणजे सुखद अनुभव असतो. मनसोक्त खेळणं - बागडणं, खोडया करणं आणि खाऊवर ताव मारणं हाच मुलांचा रोजचा दिनक्रम. त्यात गोष्टी ऐकणं आणि ऐकता ऐकता झोपी जाणं हे दृश्य हमखास दिसायचं. कुटुंबातील आजी-आजोबा आपल्या नातवंडांना गोष्टी सांगत असत. यामुळे व्हायचं काय ? तर मुलांना मनोरंजक गोष्टी ऐकायला मिळायच्या आणि आजी - आजोबा आणि नातवंड यांच्या नात्यातील प्रेमळ धागा आणखी घट्ट व्हायचा. पूर्वी जेव्हा तंत्रज्ञान नव्हते, मोबाइल, इंटरनेट नव्हते त्या काळातील मुलांचं बालपण गोष्टींनी पुरेपूर सजलेलं असायचं..पूर्वीच्या पीढीने तो अनुभव घेतलेला आहे.

हल्लीचं युग हे मोबाइल आणि इंटरनेटने व्यापलेलं आहे. हल्लीची लहान मुलं सहजपणे मोबाइल हाताळतात. फेसबुक, व्हाट्सएप्प, यूट्यूब सराईतपणे वापरतात. यूटूबवर अनेक गोष्टी वीडियो स्वरुपात अँनिमेशन रूपाने उपलब्ध असल्यामुळे मुले ते मोबाइलवर पाहतात. विभक्त कुटुंबपद्धतीमुळे मुलांना आजी -आजोबांचा सहवास लाभत नाही आणि त्यात आई-वडील दोघेही नोकरीनिमित्ताने बाहेर असल्याने मुलांना वेळ देणे कठीण होऊन बसतं. बरे मुले इतकी हुशार की त्यांना आधी ऐकलेल्या गोष्टी नको असतात. उदा. ससा आणि कासवाची गोष्ट, आजीबाई आणि भोपळयाची गोष्ट, चिमणी-कावळा, शूर उंदिरमामा, राजा-राणी, सिंड्रेला इत्यादी.

मुलांची बौद्धिक क्षमता, वैचारिक पातळी, आकलनशक्ती आणि आवड- निवड या सगळ्या बाबींचा सखोल अभ्यास करून डॉ. नवलकर यांनी या बालकथा लिहिल्या आहेत. मुलांच्या भावविश्वात ज्या ज्या गोष्टी येतात , त्या गोष्टींचा सुयोग्य वापर करून त्यांनी कथा फुलवल्या आहेत.

या बालकथांच्या माध्यमातून मुलांना नैतिक मुल्यांची ओळख करून दिली आहे. दया, क्षमा,परोपकार, भूतदया, करुणा, प्रेम, मदत करणे , चूक झाल्यास ती मान्य करणे अशा पद्धतीचे मूल्यशिक्षणाचे संस्कार या बालकथासंग्रहाद्वारे घडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणती गोष्ट योग्य कोणती अयोग्य , याची जाणीव आणि पारदर्शकता या कथांतून मुलांना मिळेल. आपल्या मुलांनी चांगली व्यक्ती म्हणून समाजात वावरायला हवे, असे प्रत्येक पालकांना वाटते. यासाठी मुलांवर लहानपणापासूनच नीतिमुल्यांचं संस्कार घडवणं आवश्यक असतं. याची सुरुवात होते घरापासून. रोजच्या अभ्यासासोबत अशी मौलिक शिकवण देणारे पुस्तक मुलांच्या हाती दिले पाहिजे.मनोरंजनात्मक पद्धतीने कथांच्या माध्यमातून बोधपर शिकवण देण्याची आणि मुलांच्या मनावर नैतिक मुल्य बिंबवण्याची ही कल्पना पुस्तकाच्या रुपात छान उतरली आहे.

'आजीची युक्ती', 'मोबाइल मेनिया' , 'कुशल कंदीलवाला', ' हावरेपणाचं फळ', 'डुलणारं घर' , 'शूर भागूबाई', 'पिंटुचा अलार्म' , 'कळ्ळाप' , 'वाईटातून चांगलं', 'मी हरवलो आणि ' , 'मोडकी खुर्ची' , 'कुश आणि कुशंका' ...... ही कथा शीर्षके वाचून मनात उत्सुकता निर्माण झाली असेलच .. तर बालदोस्तांनो आणि त्यांच्या पालकांनो 'रोज नवी गोष्ट हवी' हा बालकथासंग्रह लवकर आपल्या घरी आणा. हल्ली मुलं मोबाइलवर जास्त जास्त वेळ घालवताना दिसून येतात. त्यांना वाचनाकडे वळवण्यासाठी, वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी हा बालकथासंग्रह नक्की मुलांच्या हातात द्या. मुलांची मानसिकता , निरागसता, त्यांच्यातील संवेदनशील भाव जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न या बालकथासंग्रहातून केला आहे.

**(बालकथासंग्रह : रोज नवी गोष्ट हवी, लेखक : डॉ. सुमन नवलकर, व्यास क्रिएशन्स.)**



## पिंजरा

रस चाखून फळांचा,
उंच उडायाचे जरा ।
सारे राहिले मनात,
आला नशिबी पिंजरा ।।

झाला बंदिवान असा,
गण गोत ही तुटले ।
पंख असुन स्वतःचे,
तुझे उडणे सुटले ।।

आली गुलामी नशीबी,
तुझे अंतरले रान ।
बघ माझ्या कडे जरा,
अरे मी ही बंदिवान ।।

इच्छा उडायाची तरी,
झेप नाही घेता येत ।
सासु सासरे पतीच्या,
रोज नजर कैदेत ।।

हिरवे मखमली गवत,
वाटे त्यावरी निजावे ।
रोज रोज पावसात,
तना मनाने भिजावे ।।


कल्पनेची तग मग,
मला पावसात नेते ।
त्याला न्याहाळीत कधी,
धारा हातावर घेते ।।

झालो पराधीन असे,
नियतीने केला घात ।
दिसे मोकळी जरी मी,
काय फरक दोघात ।।

कधी तरी तुझ्या माझ्या,
दोर सुटावा पायीचा ।
धाकातून मुक्त व्हावा,
जन्म बाईचा बाईचा ।।



अशोक मिरगे
संपर्क क्र. 9421278312.




## बकरी-ईद...!

जुलैच्या महिन्यामध्ये
बकरी- ईदचा सण,
बोकुड आणी बकरे
करतात कुरबान.

सगळे रंगीबेरंगी
कपडे घालून फिरे,
एकमेकांची हर्षाने
घेई गळाभेट सारे.

ईदगाहात ईदची
नमाज ही पढतात,
लहान थोर बुजुर्ग
सारे शुभेच्छा देतात.

दिवसभर मित्रांची
जिव्हाळ्याने भेट होई,
संध्याकाळी सुग्रास
जेवण्याचा बेत राही

कुरबानी झाल्यावर
सारी ईच्छा पूर्ण होते,
दुवा कबुल होऊन
घरी बरकत येते.

दरवर्षाला ईदीचा
सण पावळ्यात येते,
मोठ्या भक्तीभावाने ही
बकरी-ईद साजरी होते...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## मन्हा देव



रुपवान मन्हा देव ।
त्यानं नाव रे सुंदर ।।
प्राणप्रिय मन्हा हरी ।
अठ्ठावीस युगं उभा विटवर ।।धृ।।

तुलसीमाळ गळी अन ।
बुक्का काळा कपाळी ।।
सावळा मन्हा श्रीहरी ।
तेज खुले त्यानं भाळी ।।1।।

नाव त्यानं घेता ।
व्हई षडरिपूसना विनाश ।।
रूप पाहता विठुनं ।
तुटे अन्यायसना पाश ।।2।।

देव मन्हा आवडे माले ।
त्यानं रूप रे सुंदर ।।
नाथ अनाथसना हरी ।
त्याना कंबरवरती कर ।।3।।

पंढरपूरां घर त्यानं ।
माय चंद्रभागाना काठवर ।।
मंदिरमा मां तठला शे ।
मन्हा घनश्याम सुंदर ।।4।।

देव वेडा मन्हा वना ।
आठे पुंडलिक हट्टापायी ।।
वीट फेकी भक्तनी ।
संगे त्याना रखुमाई ।।5।।

आवडे त्याले दहीकाला ।
आवडे साखर भाकर ।।
नंद यशोदाना पोऱ्या ।
व्हयना पंढरीना चोर ।।6।।

काव्य लिहिता सावळ्यावर ।
जडे म्हणे मनीषनं मन ।।
नाव घेता पांडुरंग ।
ओथंबती मन्हा मनरुपी घन ।।7।।


कवि:मनिष आहिरे
नाशिक, मो. 7588069679

## विठू दर्शनाची ओढ



पित्या समेत
निघाली लेक
विठू दर्शनाची
ओढ आस एक
बसुनि बाहुंवर
दिसे पताका शोभून
वाट पंढरीची
मन आले उफाळून
पंढरीची वारी
ही आस्ताच भारी
लाडकी लेक
शोभुनि खांद्यावरी
भागवत धर्म
देई महान शिकवण
वृद्ध तरूणांसम
धाव घेई बालपण

-सौ. सुनिता रोझेकर मुंबई




## पावसाच्या सरी



पावसाच्या सरी
आल्या धरतीवरी
चिंब चिंब सृष्टी
मनी आनंद भारी

नभात गरजे
ढगांचे नगारे
विजांचा कल्लोळ
अंगावर शहारे

टप् टप् पडती
गार गार गारा
सोबतीला त्यांच्या
खटयाळ वारा

पिसारा फुलवित
मोर नाचे थुई थुई
लहान मुलांना
बघण्याची घाई

निसर्गाने टाकली
चोहीकडे दृष्टी
हिरवा शालू नेसूनी
नटली सृष्टी

- रवींद्र व्ही. चालीकवार, महागाव,
जि.यवतमाळ, मो.9011559106

## माझ्या मनातील गूज

कळेल कधी
माझ्या मनातील गुज
सांगते तुज
गुपित...

अबोल प्रीत
समजून घेशील आता
नको बाता
सारख्याच...

विरह वेदना
नको देऊस मजला
सांगते तुजला
प्रेमिका...

सलतोय काटा
रक्तबंबाळ कितीहोते
आघात करते
मनावर....

तुझी माझी
साथ आपली पूर्वजन्मीची
इच्छा मनीची
असते....

सीमा मंगरूळे तवटे वडूज
सातारा

## पर्यावरणासाठीच...

उजाड निसर्ग
पानं झडताना
धुराचे लोट
वर भिडताना
गुदमरून श्वास
प्राण उडताना
प्लॅस्टिक बॅगेत
कचरा सडताना
रक्ताचा दाब
वर चढताना

शहरं वाढवत
जंगलं तोडताना
घरट्याला जागा
पक्षी रडताना
संकरित जाती
पुढे ओढताना
सडक्या नाल्या
नदीत सोडताना
नक्कीच रडशील
जग बुडताना

बलराज संघई, मो. 9420015108

# बहिष्काराचे शस्त्र



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**नुपूर शर्मा प्रकरणाचा वाद संपण्याची चिन्ह दिसत नाही आहे कोणीतरी फेसबुक वर नुपूर शर्माचे समर्थन करतो आणि मग त्याला त्याचे शीर शरीरापासून वेगळे करण्यात येईल, म्हणजेच त्याला ठार मारण्यात येईल अशा पद्धतीच्या धमक्या मिळतात. याला काय म्हणावे? हा जिहादी उन्माद आहे.**

1920 मध्ये जगभरामध्ये खिलाफत चळवळ अयशस्वी झालेली होती. तरीही केरळमध्ये तेथील मुल्ला मौलवींनी सर्वसामान्य निरक्षर जनतेची, खिलाफत यशस्वी झालेली आहे, आता आमचेच राज्य आलेले आहे, अशा पद्धतीची भलावण केली व त्याचा परिणाम सर्वसामान्य मुस्लिमांच्या डोक्यात उन्माद जागृत झाला व केरळमध्ये दंगे भडकले. नेहमीप्रमाणे बेसावध हिंदू समाज या दंग्यांचे लक्ष होता.हजारो लोकांना धर्मांतरित करण्यात आले व शेकडो लोकांना यमसदनी पाठविण्यात आले.

जग कुठे चाललेले आहे? विज्ञान कुठे चाललेले आहे? याची काहीही तमा न बाळगता संपूर्ण जगभरामध्ये कट्टरवादयांचा हैदोस सुरू असतो. अफगाणिस्तान मध्ये असो वा पाकिस्तान मध्ये जिहादी कट्टरवाद्यांचे मानवतेला कलंकित करण्याचे उद्योग सुरू असतात. संपूर्ण जगच या कट्टरवाद्यांचा बळी ठरलेले आहे. भारतामध्ये सुद्धा नुपूर शर्माने एका टीव्ही वाहिनीवर प्रेषितांबद्दल एक विधान केले व त्यावरच हाय तोबा सुरू झाली. संपूर्ण देशाचे वातावरण विनाकारण कलुषित करण्याचा प्रयत्न काही लोक करीत आहेत. त्यानिमित्ताने अनेक शहरांमध्ये जाळपोळ व दंगे सुद्धा झालेले आहेत. एवढे होऊन सुद्धा दंगेखोरांच्या घरावर बुलडोजर चालला तर देशातील सेक्युलर वादी लोकांना ताप येतो ते गळे काढून रडायला लागतात. व या देशांमध्ये असहिष्णुता निर्माण झालेली आहे असे त्यांना वाटते. परंतु कन्हैयालाल यांची उदयपूर मध्ये झालेली निर्घृण हत्या असेल किंवा अमरावती मध्ये झालेली उमेश कोल्हे यांची हत्या, या घटनांवर मात्र सेक्युलर वादी मौन पाळून असतात. हिंदु ज्या वेळेला जिहादी कट्टरवाद्यांचे बळी ठरतात त्यावेळेला सेक्युलर वादी बिळामध्ये लपून बसलेले असतात. त्यांनी जिहादींचा हैदोस दिसू नये म्हणून डोळ्यावर हात ठेवलेले असतात. ऐकू येऊ नये म्हणून कानावर हात ठेवलेले असतात व आम्ही काही बोलणार नाही म्हणून तोंड झाकलेले असते. उद्या कन्हैयालाल च्या मारेकऱ्यांना फाशी जरी झाली तरी सुद्धा त्यांना शहीद ठरविले जाईल व त्यांच्या जनाज्या मध्ये हजारो लोक सामील होतील. ही या देशातील कट्टरवादी मानसिकता आहे. सर्वसामान्य सुशिक्षित मुस्लिम समाजाने तरी अशा पद्धतीच्या घटनांचा निषेध करायला काही हरकत नाही. कोणी काही बोलले, कोणी काही लिहिले, कोणी समाज माध्यमांवर काही पोस्ट टाकल्या म्हणून तडा जाण्या इतका धर्म तकलादू आहे का? याचा विचार सर्वसामान्य जनतेने




करण्याची आवश्यकता आहे. जर कोणाच्या भावना दुखावल्या जात असतील तर त्यांनी कायदेशीर लढाई लढायला हवी. परंतु अशा पद्धतीने जिहादी उन्माद देशामध्ये भडकविणे हे चांगले लक्षण नाही.

कन्हैयालाल आणि उमेश यांच्या हत्येमुळे लाखो हिंदू पुन्हा एकदा एकत्र आले हे लक्षात घेतले पाहिजे. हिंदू समाजाने अशा पद्धतीच्या घटना या प्रायोगिक तत्त्वावर केल्या जात आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. आम्ही शांततेचे कितीही पाठ करीत राहिलो तरीही जोपर्यंत जिहादी आमच्या आजूबाजूला आहेत तोपर्यंत शांतता निर्माण होणार नाही. त्यामुळे जिहादी कट्टरवादी मानसिकतेच्या लोकांचा सामाजिक ,आर्थिक बहिष्कार करणे हेच शांततेसाठी आवश्यक आहे. यासाठी समाजाने एकत्रित येणे कायदेशीर व सामाजिक लढाई लढणे हे दोन्ही पण खूप आवश्यक आहे.

म्यानमार मध्ये अशाच पद्धतीचा जिहादी उन्माद सुरू होता. तेथील शांतता प्रिय बौद्ध जनतेला जीवन जगणे कठीण झालेले होते. अशा परिस्थितीमध्ये असीन विराथू या बौद्धभिख्खु ने बौद्ध जनतेला संघटित करणे सुरू केले.969 नावाचे आंदोलन सुरू करण्यात आले.शांतता प्रिय बौद्ध भिक्खूंचे डोळे उघडण्याचे कार्य त्यांनी केले. ते बौद्ध जनतेला उद्देशून म्हणायचे की तुम्ही प्रेम आणि करुणेने भरलेले असूनही तुम्ही पागल कुत्र्यांच्या बाजूला झोपू शकत नाही. थोडक्यात काय तुमचे मन शांततेने कितीही भरलेले असले, तुम्ही जगावर कितीही प्रेम करीत असला तरीही तुमचे शीर धडा वेगळे करण्यासाठी टपलेले जिहादी आतंकवादी यांच्यावर तुमच्या शांततेचा, प्रेमाचा व करूणेचा काहीही परिणाम होणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

असीन विराथू यांनी बौद्ध जनतेला जो संदेश दिलेला आहे त्यात ते म्हणतात की मुस्लिम व बौद्ध यांच्या विवाह होण्या स संपूर्ण प्रतिबंध घातला गेला पाहिजे व मुस्लिम स्वामित्वाच्या दुकानांशी वा प्रतिष्ठानांशी कोणीही संबंध ठेवू नये.म्हणजेच मुस्लिम स्वामित्वाच्या दुकानांशी अथवा प्रतिष्ठानांशी कोणत्याही प्रकारचे व्यापारी संबंध ठेवू नये असे असीन विराधू यांनी म्यानमारच्या जनतेला सांगितलेले आहे.

भारतातही लव्ह जिहाद ही मोठी समस्या आहे. त्यामुळे असीन विराथु यांचे हे एक विधान भारतातही लागू होण्यास हरकत नसावी. व्यापारा संदर्भातील दुसऱ्या विधानांचा विचार ज्याचा त्यांनी करणे आवश्यक आहे.

हिंदू समाज आपल्या मुलांना डॉक्टर व इंजिनिअर बनविण्याच्या मागे लागलेला आहे.तो मुलांचे करिअर घडविण्यावर लक्ष केंद्रित करणारा समाज आहे .परंतु अशा समाजाच्या शेजारी जर जिहादी उन्मादी रहात असेल तर शांतता,स्थैर्य, समृद्धी या गोष्टी कशा निर्माण होऊ शकतील? याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे. येणाऱ्या काळातील मोठा धोका हा जगासमोर आतंकवादाच्या रूपानेच उभा आहे. प्रत्येक देश कट्टरवादी आतंकवादाच्या समस्यांचा सामना करीत आहे. अशा परिस्थितीत भविष्यातील भारत सुरक्षित भारत, शांतता युक्त भारत घडविण्यासाठी समाजाने देशात घडणाऱ्या घटनांचे योग्य विवेचन केले पाहिजे. त्याचा योग्य तो विचार केला पाहिजे. व त्यावर एकत्रित येऊन कृती सुद्धा केली पाहिजे हे करणे खूप आवश्यक आहे.

कन्हैयालाल व उमेश यांचे बलिदान व्यर्थ होऊ नये याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. काश्मिरामध्ये ज्या पद्धतीने टार्गेट किलिंग चालते त्याच पद्धतीचे हे टार्गेट किलिंगच आहे. ज्यावेळेस कन्हैयालाल किंवा उमेश यांच्या पाठीमागे संपूर्ण देश उभा राहील त्यावेळेस सर्वसामान्य मुस्लिम समाजाच्या समोर सुद्धा आपण कोणाच्या बाजूने उभे राहायचे याचा विचार करण्याची वेळ येईल. हत्यारे नेहमीच सन्मानित व पुरस्कृत होत राहिले तर सर्वसामान्य मुस्लिम समाजाला सुद्धा टिकेचा व लोकांच्या बहिष्कारा चा सामना करावा लागू शकतो हे लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे. कट्टरवाद्यां शी व्यापार करणे त्यांना श्रीमंत बनविणे म्हणजे कट्टर वादाला खतपाणी घालण्यासारखेच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. नेहमीच "मला काय त्याचे" या मानसिकतेमध्ये राहणे धोकादायक ठरू शकते. कधीतरी आजूबाजूच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून ती समजून घेण्याची आवश्यकता आहे. कट्टरवादी व जिहादी मानसिकतेचा बहिष्कार सर्वांनी मिळून करण्याची आवश्यकता आहे. बहिष्कारच्या शस्त्राला इंग्रज घाबरले ,मोठमोठे देश सुद्धा घाबरतात, तर कट्टरवादी का घाबरणार नाही, तेही घाबरतील त्यामुळे सामाजिक व आर्थिक बहिष्काराचे शस्त्र उपसण्याची आवश्यकता आहे.

# उद्धव ठाकरेंची मानसिकता आणि पक्षातील उठाव

आधुनिक केसरी

**उद्धव ठाकरे यांनी अखेर आपला पराभव मान्य केला आहे. ते म्हणाले जे नवीन चिन्ह मिळेल ते लवकर जनतेपर्यंत पोचवायची तयारी करा. ठाणे, नवी मुंबई येथील नगरसेवक घाऊक मात्रेने शिंदे गटात गेले आहेत. औरंगाबादचे तयारीत आहेत. पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये ताकदच नाही. या सर्व धामधुमीत मुंबईतील कांही मुसलमानांचे आणि युपी बिहारमधील मुंबईत उपजिविकेसाठी आलेले लोक म्हणतात आम्हाला ठाकरेंच्या हिंदुत्वाची किंवा एकंदरच शिवसेनेची बिलकुल भिती वाटत नाही. हे लोक फक्त तोंडाने हिंदू कट्टरता बोलतात. पण सर्वात सोप्या पध्दतीने मॅनेजेबल असतात. चार तुकडे फेकले मतदानाच्या शब्दांचे की आम्हाला हात लावत नाहीत. म्हणून तर गेल्या पंधरा वीस वर्षात मुंबईतील मराठी टक्का घटत आहे आणि उपनगरात शिफ्ट होत आहे.**

आमदार गेले 55 पैकी चक्क 40. खासदार बॅगा भरत आहेत. 14 पैकी 10 आणि राज्यसभेतील 3 पैकी 2 शिंदे गटात जायला उत्सुक आहेत. खरं तर संजय राऊत यांचेवर त्या चारही महिला आमदारांनी एफआयआर दाखल करून कोर्ट केस करायला पाहिजे. पर स्त्री माते समान" या संस्कारावर विश्वास असणारी हिंदू संस्कृती अशी पायदळी तुडवणे म्हणजे आपली लायकी आणि हीन विचारसरणीचे प्रदर्शन करणे आहे. वेश्या म्हणणे आणि कामठीपुऱ्यात बसवायला पाहिजे असे म्हणणे हा या चारच महिला आमदारांचाच नव्हे तर राजकारणात सक्रिय असणाऱ्या तमाम महिलांचा, आमदार, खासदार, नगरसेविका, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचा अपमान आहे. या चौघींनीही संजय राऊत यांचेवर अब्रुनुकसानिचा दावा ठोकायला हवा. राजकीय पक्ष भेद विसरून राजकारणातील तमाम महिला कार्यकर्त्यांनी भर चौकात घेरून जोडे मारायला पाहीजेत पण भारतीय समाज पडला सहिष्णु, सहनशील, विनयशील आणि नम्र, त्यामुळे उगाच गवगवा नको म्हणून स्त्री वर्ग सहन करत शांत राहतो. त्यामुळे आशा वाचाळविरांचे फावते. कारण संजय राऊत या उठाव केलेल्या आमदारांना डुक्कर, रेडे, गटारातले, नालीतले किडे, एका बापाचे असाल तर, तुमचे शव येतील मुंबईत आणि रास्त शवागारात जातील पोस्टमार्टेमला, अशी विधाने करून या वफादार आमदारांना हिणवून, पक्षप्रमुखाप्रती आणि पक्षाप्रती एकनिष्ठता दाखवून ही त्यांचा उपमर्द करण्यात संजय राऊत आणि नाबालिग आदित्य ठाकरे यांनी खुपच उत्साह दाखवला होता व दाखवत आहेत.

निवडणुकीत पुन्हा निवडून येऊन दाखवा, असे आव्हान देत आहेत. सर्व एकनाथ शिंदे ग्रुपमधील आमदार सातत्याने सांगत आहेत की आमची पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबाबत काहीच तक्रार नाही. आम्ही फक्त कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस यांची संगत नको एवढेच म्हणत आहेत. हिंदुत्वाचा अजेंडा राबवायचा आहे. शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह उध्दव सेनेसोबत राहू शकते.

कारण हे कायद्यानुसार असे होऊ शकते. विधिमंडळ पक्ष




वेगळा आणि राजकीय मुख्य पक्ष वेगळा. त्यामुळे कदाचित धनुष्यबाण उध्दव सेनेकडेच राहील ही. तसा दावा नंतर उध्दव ठाकरे यांनी ही कायदे तज्ञांशी सल्लामसलत करून केला आहे आणि पराभुत मनोवृत्तीतून थोडे सावरले आहेत. पण जर नऊ, दहा आणि अकरा या तीन दिवसात, सर्वोच्च न्यायालयाने शिंदे गटाला स्वतंत्र मान्यता देण्याची शक्यता दिसली किंवा कांही कायदे तज्ञांनी यावर आपापली मते मांडली, मीडियाने चर्चा घडवली तर मात्र राज्यभर शिवसेनेत बंडाळी माजेल, आणि उध्दवसेना अडचणीत येऊ शकते. पण आता उध्दव ठाकरे बऱ्यापैकी सावरत आहेत. त्यांनी शिलकी 14 आमदार, खासदार थांबवण्याचे प्रयत्न चालू केले आहेत असे दिसते. तरीही राहूल शेवाळे, भावना गवळी - सुर्वे आणि श्रीकांत शिंदे हे 14 खासदारांचा गट तयार करणे चालूच ठेऊन आहेत. सर्व प्रथम उध्दवजींनी संजय राऊत, विनायक राऊत यांना एका ठराविक सेफ अंतरावर ठेवावे. आदित्य ठाकरे यांना शांत बसवावे. हे जर घडले तर अजूनही जुळवाजुळव होऊन, समेट घडू शकतो. त्यासाठी उध्दवजींना पुढाकार घेऊन शिंदे गटाशी स्वतः होऊन बोलावे लागेल.

कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस यांचेपासून दूर होण्याची तयारी ठेवावी लागेल. अर्थात भाजपशी जुळवून घेणे थोडे जडच जाईल. राजन विचारे आणि इतर खासदार सोबत सोडतील. मुंबई महानगर पालिकेच्या नगरसेवकांनीही वैचारिक देवाणघेवाण चालू केलेली आहे. तिथे जर 85/90 पैकी सत्तर नगरसेवक सरकले तर मात्र नारायण राणे म्हणत आहेत तशी शिवसेना पुन्हा उभारी नाही घेऊ शकणार. मुंबई हल्ली तर मग कांही खरे नाही. संजय राऊत विरोधातील पत्राचाळ (म्हाडाची जमीन) 1034 कोटीचा घोटाळा, किरीट सोमय्या यांचे पत्नीवर भ्रष्टाचाराचा खोटा आरोप केल्या मुळे अब्रुनुकसानिचा दावा दाखल आहे. त्या केसमध्ये दुसऱ्यांदा वारंट निघाले आहे. जेंव्हा ते कोणत्याही केस मध्ये पूर्ण अडकतील तेंव्हा साहेब त्यांना वाऱ्यावर सोडतील. काहीही मदत करणार नाहीत, उलट कोण संजय राऊत? असा पावित्रा घेतील. सुरेश प्रभू या अभ्यासु, मेहनती, आणि ईमानदार, सज्जन माणसाचे नाव जर उपराष्ट्रपती पदासाठी ठरले तर मला आनंदच होईल. तरीही माझ्या मते सुरेश प्रभू यांना मंत्रीमंडळात घ्यावे. नदी जोड प्रकल्प त्यांचे ताब्यात द्यावा आणि मुख्तार अब्बास नक्वी यांनाच उपराष्ट्रपतीपदी निवडून आणावे, असे माझे मत आहे.

पीपीएम, पुणे

# स्वयंपाक घरातील खजिना

आधुनिक केसरी

**प्रत्येक स्रीला कमी या जास्त वेळ स्वयंपाक घरात जातोच. कधीकधी कंटाळा यतो नको वाटतो स्वयंपाक चिडचिड होते. तेव्हा स्वतःला ही वेळ देणे जरूरी असते नाही का? तसे जेवन बनविने खुप मेहनतीचे युक्तीचे जोखमीचे ध्यास मन लावून करायचं काम आहे ते संगळे असेल तर जेवन पूर्ण ब्रम्ह बनते हो की नाही... जेवन चविष्ट रूचकर असेल तर संगळे आंनदाने उत्साहानं खातात. पण गृहिणीचे तन मन मरगळलेले असेलतर.. तेच जेवन बेचव बे स्वाद होते. चलातर मग मैत्रीणी नो आपण आज बगुयात स्वयंपाक घरातून काही आपल्या चेहऱ्यावर व मनाला पालवी व रंगत आणणाऱ्या उपयुक्त टिप्स..**

भगोन्याच्या तळाशी राहिलेली साय. थोडे बेसन लावून चेहऱ्याला लावा सुकल्यावर चेहरा धुवा.. हा बेस्ट मास्क आसेल चेहऱ्याचा रंग उजळण्यासाठी.. नाहीतर नुसती साय ही लावलीतर मुलायम मुलायम होतात गाल अन् ओठही ...टमाट्याशिवाय तर मला स्वयंपाकच अधुरा वाटतो टमाटर ची फोड घ्या त्यावर थोडी साखर घाला ती हाताच्या कोणीवर चोळा हा बेस्ट उपाय कोणीवरील काळेपण दुर करण्यासाठी.. आता लिंबूचा छिलका तर चुकून हि फेकून देऊ नका यवढे महाग लिबूचा पैसा तर वसुल झाला पाहिजे नाही का? छिलक्याची पावडर बनवून किंवा असाच छिलका हातापायावर चोळलातर.. डेड स्कीन निघून जाईल.. आता बघू भाज्याचा राजा रूबाबदार बटाटा.. हा तर यवढा उपयोगी जसा वेश तसा देश म्हणल्याप्रमाणे.. संगळ्या भाज्यात पेरला जातो तसा हा आपल्या प्रत्येक ओठा पासून नखापर्यंत उपयोगी यतो साली नूसती साल जर चोळली तर अंगावरील मळ निघून जातो..

डोळ्याखाली डाग जातात.. काकाडीची फोड डोळ्याखाली ठेवा. कधी बर्फाचा टुकडा चेहऱ्यावर चोळा आंनदी होईल त्वचा. हळदी, मेंथी, साखर, मीठ हेही खुप उपयोगी असतात. आपल्या त्वचेसाठी. नेहमीच ह्या साऱ्यांचा वापर केलातर ब्युटी पार्लर विसरून जाल.. अन् आंबे ते अंबे अन् वरून कोईचेही पैसे.. नैसर्गिक उपायामुळे चेहरा ही आनंदी राहिल मनही आनंदी करणार हा मग हे उपाय तुम्ही मी तर करतेच तुम्ही करा आपले स्वयंपाकघर. आपल्या त्वचेची घ्या मग काळजी कळवा जरूर कसे वाटले हे उपाय.



सुरजकुमारी गोस्वामी
संपर्क क्र. 7013265607

# उणिवांची जाणीव - पुस्तक परीक्षण



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655


आधुनिक केसरी

**"उणिवांची जाणीव" ह्या शीर्षकाखाली विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांनी लिहिलेल्या जीवनाकडे सकारात्मकरित्या बघायला नवा दुष्टीकोन देणारे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरेच गांभीर्याने विचार करतो का? आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून, आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे.**

आज आपल्या देशामध्ये प्रत्येक व्यक्ती मोबाईलवर किंवा प्रत्यक्ष मित्र मैत्रिणींशी अनेक विषयावर चर्चा करतो, गप्पा मारतो आणि सतत गर्दीमध्ये माणसांच्या गराड्यातच असतो. परंतू अनेक व्यक्ती एकांतात राहून स्वतःशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत नाहीत. जी व्यक्ती एकांतात राहते आणि एकांतप्रिय असते तीच व्यक्ती स्वतःची संवाद साधू शकते. अशाच व्यक्तींना "उणिवांची जाणीव" होऊ शकते आणि त्या उणीवांवर मात कशी करावी, याचा उपायही त्या व्यक्तीला मिळू शकतो. परंतू आज प्रत्येक व्यक्ती थोडेसे यश मिळाले कि अहंकाराने, गर्वाने वागायला लागते. त्यामुळे मिळालेल्या यशाचा आनंद, यशाचा उपयोग शांतपणे घेण्याऐवजी तो माझ्याकडेच आहे; ते इतरांना दाखविण्यात गुंग होतात. त्यामुळे जीवनात मिळणारा खरा आनंद तो बाहेर शोधायला लागतो.

"आत्मानंद" आणि "परमानंद" काय आहे, तो कसा असतो, हे आपणास कळण्यासाठी "उणिवांची जाणीव" हे पुस्तक वाचावे लागेल. विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी आजपर्यंत अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या पुस्तकांपैकी हे एक अतिशय महत्वाचे पुस्तक आहे. हे पुस्तक एका दमात वाचून काढले आणि बाजूला ठेवले, असे होऊच शकत नाही. आपल्या आयुष्यभरासाठी उपयोगी पडणारी वैचारिक शिदोरी "उणिवांची जाणीव" या पुस्तकात आपणास मिळणार आहे. विद्यावाचस्पती विद्यानंद हे एक विचारवंत लेखक आहेत. त्यांची कौटुंबिक परिस्थिती अतिशय सुसंपन्न आणि उत्तम आहे, त्यांना साधनांची कुठलीही कमतरता नाही; परंतू आपल्या देशाचे, समाजाचे आपण काही तरी देणे लागतो, ह्या विचारांतूनच त्यांनी अनेक पुस्तके लिहिण्याचा संकल्प केला आहे.

एखाद्या वेळेस जेवणाची पंगत चुकली तरी चालेल, पण संगत चुकली तर संपूर्ण आयुष्याचे गणित बिघडते; म्हणून आयुष्यामध्ये प्रथम पंगत आणि संगत याचा विचार डोक्यामध्ये




पक्का पाहिजे; तरच निर्धार केलेले कार्य आपण पूर्ण करू शकतो. विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी त्यांच्या मनन आणि चिंतनातून अतिशय उपयुक्त असे हे पुस्तक लिहिले आणि त्या पुस्तकाला "उणिवांची जाणीव" असे समर्पक आणि योग्य असे शीर्षक दिले. त्यांच्या मंथनातून आणि चिंतनातून हे पुस्तक साकारले आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या पुस्तकाची आपल्या महाराष्ट्रालाच नव्हे, तर संपूर्ण भारत देशाला गरज आहे. विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांनी स्वतः समाजसेवेचे व्रत हाती घेवून राष्ट्रहिताची अनेक कामे वैज्ञानिक दृष्टीकोन समोर ठेवून केली आहेत. जगातील सध्याच्या परिस्थितीत एकमेकांना समजून, एकमेकांना मदत करून समोरच्या माणसाच्या उणिवांचा बाजार न मांडता त्यांच्या उणीवांवर टीका न करता सदरहू व्यक्तीस समजून घेवून त्यास आपणांस काय मदत करता येईल का, ह्याची जाणीव विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांनी करून दिली आहे. सदरहू पुस्तक प्राथमिक शाळेतील मुलांपासून ते शिक्षक, प्राध्यापक, पीएच. डी. करणारे संशोधक, समाजसेवा करणारे तरुण आणि राष्ट्रहिताचे कार्य करणाऱ्या प्रत्येक तरुण-तरुणींना तसेच स्वतःचा विकास व्हावा असे वाटणाऱ्या सर्वांसाठी हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे.

विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांच्या विचारात राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्र उभारणीसाठी आपणास काय करता येईल, आपल्या काय उणिवा आहेत याची जाणीव करून देणारे हे एकमेव पुस्तक आहे. सोलापूर येथील प्रेरणभूमी प्रकाशन आणि पुण्यातील घेरा पानवडी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने "उणिवांची जाणीव" ह्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले आहे. "उणिवांची जाणीव" ह्या शीर्षकाखाली विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांनी लिहिलेल्या पुस्तकात अनेक विषयांना छोट्या छोट्या उदाहरणाद्वारे दैनंदिन जीवनातील विविध विषयांना स्पर्श केला असून त्यांचा स्वतःचा मानसशास्त्र आणि आध्यात्मातील अभ्यास आणि त्यांतील त्यांचे स्थान स्पष्ट होते. मुळातच विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांचा गेल्या २० वर्षांचा आध्यात्मामधील प्रदीर्घ अनुभव, प्रत्यक्ष लेखन, शिक्षण क्षेत्रातील ३५ वर्षांचे मोठे योगदान, विविध २८ विद्याशाखांचा गाढा अभ्यास आणि सखोल शिक्षण, लेखनातील अचूकता, विषय आणि आशयाची नेमकेपणाने केलेली मांडणी ह्या सर्वच बाबींमुळे आजवर दुर्लक्षित राहिलेला विषय आणि पुस्तकातील आशय ह्यांचे महत्व वाढेल अशी खात्री वाटते. पुस्तकाचे मुखपृष्ठ, रचना, आतील पानांची मांडणी, एकूणच सजावट तसेच छपाई अतिशय विलोभनीय झाली आहे. मर्यादित पृष्ठसंख्येत मजुकर असल्यामुळे पुस्तक अधिकच आकर्षक झाले आहे.

पुस्तकाचे नाव : **उणिवांची जाणीव,** लेखक : **विद्यावाचस्पती विद्यानंद**
प्रकाशक : **प्रेरणाभूमी प्रकाशन,** सोलापूर व घेरा पानवडी फौंडेशन, पुणे

# विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक झाल्याशिवाय खरा महिमा कळत नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**डोळयांचं पारणं आणि मनाची तृप्ती पुर्ण होण्यासाठी याच जन्मी याच देही, याच डोळा पाहावी पंढरी आणि स्नान करावे चंद्रभागे तीरी....! हिच अपेक्षा उराशी बाळगून विठ्ठलाच्या नामाची गोडी दर्शनाची उमेद घेऊन वारकरी निःसंकोचपणे घर सोडतो. आणि पंढरपूर ची वाट धरतो. सर्व समस्या अडचणी विठ्ठलाच्या चरणी अपर्ण करून देहभान विसरून प्रवास चालू असतो.**

याचा प्रत्यय-अनुभुती रस्त्याने व प्रवासात प्रवासा दरम्यान आणि अगदी पंढरपूर मध्ये पोहचल्यावर हा भक्तिचा मेळा आणि विशाल जलप्रवाह असणारी भव्य-दिव्य असी चंद्रभागा व चंद्रभागेच्या तीरावर उभा असणारे भगवान पांडुरंग किती विलक्षण योगायोग आणि एकादाचे पांडुरंगाच्या चरणी लीन झाल्यानंतर मन बुद्धी आणि शरिरात जी सकारात्मक उर्जा संचारते त्याची एकदा अनुभूती घेतल्यानंतर वारंवार विठ्ठलाच्या चरणी लीन होण्याचा मोह कोणालाही अवरणार नाही. हे अगदी मी घेतलेल्या अनुभवाने मला जाणवले. सुरूवातीला मलाही हा प्रश्न पडत असे एवढं सगळं ऊन-वारा पाऊस असताना वारी मध्ये पायी चालणारी ही सगळी मंडळी त्यात जास्तीत जास्त वयोवृद्ध महिला-पुरुष आणि काही प्रमाणात तरूणही. ही सगळी माणसं थकत कशी नसतील किंवा यांना कंटाळा-आळस येत नसेल का.....?

परंतु प्रत्यक्षात विठ्ठलाच्या चरणी लीन होण्याचा योग आला आणि माझ्या प्रश्नाचं उत्तर मला कृतीतून मिळालं. एवढी सगळी सकारात्मक उर्जा मिळाल्यानंतर ऊन, वारा, पाऊस, पायी चालण याच काय वाटणार. आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर मध्ये लाखोंच्या संख्येने जनसमुदाय उसळला आहे. राज्यभरातून लाखोंच्या संख्येने वारकारी गेल्या अनेक दिवसांपासून दरकोस दर मुक्काम करत अखेर पंढरपूर नगरीत



पोहचले. वास्तविक त्रयस्थ म्हणून विचार केला तर याच आपल्याला फार काही वाटणार नाही. परंतु या अगोदर जर आपण पंढरपूर येथे जाऊन विठ्ठलाच्या चरणी लिन होण्याचा साक्षात अनुभव घेतला असेल तर मग मात्र आपल्याला सुद्धा या वारीमध्ये सहभागी होऊन विठ्ठलाच्या चरणी पुन्हा-पुन्हा लीन होण्याचा मोह आवरणार नाही हे वाजवी आणि अनुभव सत्य आहे. ऐरवी दोन-अडीच तास रांगेत उभा राहुन विठ्ठलाच्या दर्शनासाठी जी रंगत असते ती काही औरच असते. आषाढी एकादिशी दरम्यानच्या काळात ही दर्शन रांग आणि दर्शनासाठी लगाणारा कालावधी याचा विचार केला तर पंधरा-वीस तास तर कधी-कधी चोवीस तास लागतात. तरीही एकही वारकरी तुसुभर सुद्धा विचिलित होत नाही. एवढं सामर्थ्य किंवा एवढी सकारात्मक उर्जा त्या ठिकाणी निर्माण होते. आणि साक्षात विठ्ठलाच्या चरणी लीन झाल्यानंतर तर एवढी सकारात्मक उर्जा संचारते. ज्याची आपण कल्पनाच करू शकत नाहीत. आणि मग खरं गुपित समजत की एवढ्या मोठ्या प्रमाणात वयोवृद्ध महिला-पुरुष एवढ्या मोठ्या प्रमाणात वारी मध्ये यामुळे सहभागी होतात.

वास्तविक अध्यात्म हे तारूण्य अवस्थेत अनुभुती घेण्याचा विषय आहे. परंतु सहजा-सहजी आपल्याकडे या वयात फार कमी लोक अत्यंत अल्पप्रमाणात या सगळ्या बाबी मध्ये उत्साही असतात. परंतु भक्ती आणि शक्ती तसेच सकारात्मक उर्जा ही अगदी लहान वयापासून प्रत्येकाच्या मनात संचारली पाहिजे. आणि जितक्या लवकर होईल तितक्या लवकर पांडुरंगाच्या चरणी नतमस्तक होण्याचा साक्षात अनुभव घेण्याचा योग आणता येण हे ही परमभाग्य आहे. आणि आज तर आषाढी एकादशी काय महिमा वर्णन करावा.....! निशब्द अवस्था आहे. जळी-स्थळी, काष्टी-पाषाणी, सगळीकडे पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठीचा हा सुवर्ण दिवस. त्यानिमित्ताने संबंध महाराष्ट्रातील वारकऱ्यांच्या आराध्य दैवत पांडुरंग विठ्ठलाच्या चरणी कोटी-कोटी प्रणाम !

# चालली नूतन शाळेची दिंडी चालली

आधुनिक केसरी

**दिंडी चालली नूतन शाळेची
वाट चालती पंढरीची
भक्तीरसात भिजून गेली
बालचमूंची वारी निघाली..
याची देही याची ड़ोळा
पाहूनी लोचना...**

आज नूतन प्राथमिक शाळेमध्ये भक्तीचा सुंदर सोहळा पहावयास मिळाला. मुख्याध्यापिका कणसे व शिक्षक यांच्या नियोजनानूसार लहान गट मोठा गट ते इ.१ली ते ७वी पर्यंतच्या जवळ जवळ सर्वच मुलांनी अगदी उत्स्फूर्तपणे या दिंडी सोहळ्यात भाग घेतला होता. पांडुरंग आणि रुक्मीणी घ्या वेषात आलेले बालचमु अगदी प्रत्यक्षात विठ्ठल रखुमाई च भासत होते. अगदी नूतन शाळेमध्ये जणु काही पंढरीच अवतरल्याचा भास होत होता.

**हातात टाळ मृदंग
मुखी बोल विठ्ठल, विठ्ठल
नामाचा गजर
अवघे गरजे पंढरपूर..**



सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994

शाळेपासून निघालेली दिंडी विठ्ठल मंदिरपाशी येऊन थांबली टाळ मृदंग आणि मुखात नाम विठ्ठल घेऊन निघालेली दिंडी विठ्ठलाचे दर्शन घेऊन परत माघारी फिरली. नूतन प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकस्टाफही खूप उत्साहाने दिंडीत सामील झाला होता. दिंडी शाळेत आल्यानंतर शिक्षकांच्या मदतीने छान गोल रिंगण करून पालखी मधे ठेवून विठ्ठलाचे भजन म्हटले मुलामुलींनी छान फुगड्या घातल्या उत्साही शिक्षकही फुगड्या खेळण्यात मागे राहिले नाहीत. मुख्याध्यापक, शिक्षक, मावशी अगदी आनंदाने आणि भक्तीभावाने सामील झाले. अशा रितीने नूतन प्राथमिक शाळेचा आषाढी पालखी सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.

**दिंडीचा हा सोहळा
नूतन शाळेत घेतला
पालकांचे सहकार्य
मिळे संस्थेचा पाठींबा
भक्तीचा हा सोहळा**

छान पार पडला...




## लय भारी सुगरण



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

# जांभूळजॅम



आधुनिक केसरी

फळांमधून आपल्या शरीराला आवश्यक असणारी बहुतेक सर्व प्रकारची जीवनसत्त्वे, क्षार, प्रथिने, खनिज, आम्ल इत्यादी घटक मिळण्यास मदत होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे फळांमध्ये ८५ ते ९५ टक्के पाणी असते. त्यामुळे फळे पौष्टिक आहाराला पूरकच असतात. फळांमध्ये मोठ्या प्रमाणात 'तंतुमय' म्हणजे चोथायुक्त पदार्थ असतात. (गुगल तात्यांच्या खजिन्यातली माहिती) हि फळ जर घरची बाग, मळ्यातली असतील तर बहारचं ! काल आमच्या अहोंनी मळ्यातून टोपलीभर जांभळं आणली... घरात सगळ्यांना आवडतात... खुप खाल्ली मग छोट्या नातीसाठी जॅम करून पाहूया असं वाटलं...

जॅम-जेली यांचं छोट्यांनाच काय पण मोठ्यांना पण वेड असतं. मुलं काही फळ खायचा कंटाळा करतात. जसं की फणस, अननस, पपई, जांभूळ ह्या आंबट-गोड फळांपासून बनविलेले ' जॅम' जेवढे टेस्टी तेवढेच हेल्दीही. हि फळे न खाणाऱ्या मुलांना जॅम दिला, म्हणजे जॅम मिळाला म्हणून मुलं खुश आणि फळं त्यांच्या पोटात गेली म्हणून आई खूश! पाहा मग ही जांभूळ जॅमची रेसिपी खास तुमच्या छोट्यांसाठी...

मे महिन्याच्या शेवटी व जून, जुलै महिन्यात जांभळाची फळे भरपूर प्रमाणात येतात. जांभूळ हे औषधी गुणधर्म असलेले फळ आहे. जांभळा मध्ये लोह, कॅल्शियम, फॉस्फरस व क जीवनसत्व याचे प्रमाणही अधिक असते. (गुगल तात्यांच्या खजिन्यातली माहिती)

**जांभळाचा जॅम.**

**साहित्य :** दहा ते पंधरा जांभूळ, एक वाटी साखर, चिमुटभर सायट्रिक ॲसिड.

कृती : सर्वप्रथम जांभळं स्वच्छ धुवून घ्या. मग एका पातेल्यात पाणी गरम करण्यासाठी ठेवा पाणी गरम झाल्यावर चाळणीवर जांभळं वाफवायला ठेवा. छान वाफली म्हणजे त्यातलं बी वेगळं होतं. मग थंड झाल्यावर बीया वेगळ्या करायच्या आणि गर वेगळा काढायचा. साधारण एवढ्या जांभळाचा वाटीभर गर निघतो. मग तो गर मिक्सर मधून बारीक फिरवून घ्यावा. मग मिडीयम गॅसवर जाड बुडाच्या पातेल्यात तो फिरवलेला गर काढून त्यात तेवढीच वाटीभर साखर घालून तो शिजवत ठेवा. चमच्याने सतत ढवळत राहावे. बुडबुडे आले की त्यात चिमूटभर सायट्रिक ॲसिड घाला. मग घट्टसर होईपर्यंत शिजवावे. त्या मिश्रणाला जॅम सारखी कन्सिस्टन्सी आणी एल तयार झाला. तयार मिश्रण कोमट असतानाच काचेच्या बरणीमध्ये भरून ठेवा. थंड झाल्यानंतर जांभळाचा टेस्टी आणि हेल्दी जॅम पराठा किंवा ब्रेडला लावून सर्व्ह करा. करून बघा. नक्कीच आवडेल.

तुकारामनीती
भाग 16

# तुका म्हणे शूर रणीं । गांढें मनी बुरबुरी ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**संत तुकाराम ! एक अद्भुत शब्दानुभवाचे समृद्ध भांडार ! तुकोबा म्हणजे मराठी मातीतून धुमारे घेतलेलं चालतं-बोलतं शब्दब्रह्म ! त्यांचा गाथा म्हणजे मराठी सारस्वताला त्रिकाल मार्गदर्शन करणारा वाटाड्याच ! तुकोबांच्या निवडक अभंगांचे 'तुकाराम नीती' या सदरांतर्गत चिंतन अथवा विवेचन करतांना त्यांचे बोधपर विविध पैलू सहजतेने दृष्टीसमोर आणून तुकोबा हे नित्य नित्य पथदर्शी होतांना व्यासंगी वाचकांसह स्वतःला समोरचा धूसर झालेला मार्ग स्पष्ट दिसतो आहे ! मला वाटते हेच तुकोबांच्या अभंगांचे सार्वकालिक श्रेष्ठत्व आहे ! संत किंवा समाजसुधारक काय करत असतात ? याचे उत्तर तुकोबाराय देतांना लिहितात,**

**सहज बोलणे हितोपदेश । करुनी सायास शिकविती ॥**

हेच वैशिष्ठ्य तुकोबांच्या अभंगांना तंतोतंत लागू होते. सहज बोलतांना आणि त्यावर सुद्धा नाही लक्षांत आले तर मुद्दाम शिकविण्याचा जे प्रयत्न करतात. तेच सर्वकाळ श्रेष्ठ गुरु किंवा मार्गदर्शक ठरत असतात ! तुकोबांचा गाथा म्हणजे गोड रसाने ओतप्रोत भरलेल्या उसासारखा आहे.

**इक्षोरग्रात्क्रमशः पर्वणि पर्वणि यथारसविशेषः |**
**तद्वत्सज्जनमैत्री विपरीतानां च विपरीता ||**

हा संस्कृत श्लोक तुकोबांच्या अभंगांशी तंतोतंत जुळतो. ज्याप्रमाणे आपण उस जसजसा टोकाकडून खातखात बुडाकडे जातो तसतसा तो आणखी गोड लागतो. त्याप्रमाणे संत तुकारामांच्या गाथ्यात आपण जसजसे खोलवर जात राहू तसतशी अधिक गोडी लागते. तुकोबांचा गाथा म्हणजे उसापेक्षाही अद्‌भुत रसायन ! उस तरी शेंड्याकडे कमी आणि मुळाकडे जास्त गोड असतो, परंतु संत तुकारामांची गाथा म्हणजे बुड ते शेंडा पूर्णतः अनुभूतीपूर्ण उपदेशाने भरलेला अमृतकुंभच आहे ! शब्द, अनुभूती आणि उपदेश यामध्ये तुकोबा कुठेच मागे राहत नाहीत. उपदेश करतांना ते कोणत्याही प्रकारची भीड-भाड ठेवत नाहीत. माणसाने कसे बोलावे याचा विचार अनेक संत-विचारवंतांनी आपल्या लेखणीद्वारे बहुश्रुत केला आहे. माणसाने कोकिळेसारखे गोड आणि लाघवी बोलावे. आपल्या बोलण्यातून सातत्याने दुसऱ्याचे हित कसे साधले जाईल ( ? ) याचा सर्वोपरी विचार करावा. गोड आणि हिताचं बोलणारी माणसं दुर्मिळ झाली असली तरी अनेक वचने आपणास नित्य जागृत करत असतात.

**कॉऽतिभारः समर्थानां किं दूरं व्यवसायिनाम् ।**
**को विदेशस्तु विदुषां कः परः प्रियवादिनाम् ॥**

प्रस्तूत संस्कृत श्लोक म्हणजे उच्च शिक्षित माणूस आणि प्रिय बोलणारा माणूस याचे सुंदर उदाहरण आहे ! ज्याप्रमाणे उच्च शिक्षित माणूस आपल्या शिक्षणाच्या आधारे जगात कुठेही वास्तव्य करू शकतो, अगदी त्याच न्यायाने गोड किंवा प्रिय बोलणारी व्यक्ती कुणालाही परकी वाटत नाही. त्याच अनुषंगाने संत तुकोबाराय माणसाने कसे बोलावे आणि कसे बोलू नये याचे सैद्धांतिक विवेचन करून उपदेश करतांना दिसतात.


**बोलावें तें धर्मा मिळे । बरे डोळे उघडूनि ॥1॥**
**काशासाठीं खावें शेण । जेणें जन थुंकीं तें ॥2॥**
**दुजें ऐसें काय बळी । जें या जाळी अग्नीसी ॥3॥**
**तुका म्हणे शूर रणीं । गांढें मनी बुरबुरी ॥4॥ (शा.अ.गाथा अ.क्र. 319)**

माणसाने बोलत असतांना आपल्या धर्मानुसार म्हणजे मानवी गुणधर्मानुसार बोलावे. बोलत असतांना आपलं मन प्रांजळपणे दुसऱ्यासमोर प्रकट करावं. ते प्रकट करत असतांना कोणताही आडपडदा असता कामा नये. आजकाल तोंडावर एक आणि पाठीमागे दुसरंच बोलणाऱ्या व्यक्ती समाजात भोवताल वावरतांना दिसतात. अशा लोकांना तूकोबराय उपदेश करतांना "काशासाठीं खावें शेण । जेणें जन थुंकीं तें" असे जळजळीत वचन लिहून जागृती करतांना दिसतात. माणसाला दुसरी कोणतीच वस्तू किंवा अग्नी जाळू शकत नसून आपण खोटं किंवा निंदा, चुगलीयुक्त बोलणच माणसाला जाळू शकते. माणसाने "बोलू ऐसे बोले, जेणे बोले विठ्ठल डोले" असे बोलावे. याच अभंगाच्या उत्तरार्धात तुकोबाराय "तुका म्हणे शूर रणीं । गांढें मनी बुरबुरी" असे वचन लिहून पाठीमागे कुरबुर करणाऱ्या लोकांना "गांढे' अशी खालच्या स्तराची भाषा वापरतात. ज्याप्रमाणे शूर माणूस रणांगणावर शोभून दिसतो त्याचप्रमाणे खरे बोलणारा माणूसच सर्वांना प्रिय होत असतो. त्यासाठी सत्य बोलणारा, रोखठोक बोलणाऱ्या माणसांना नक्की त्रास होतो, अशी माणसं समाजाला आवडत नसतात, मात्र ते सर्वांच्या हिताचाच उपदेश करत असतात याचा अभिमान आपण बाळगला पाहिजे.

नेहमी सत्य आणि मधुर बोलणारा माणूस म्हणजे लगडून फुले -फळे लागलेल्या वृक्षासारखेच असतात.

**नमन्ति फलिनो वृक्षाः नमन्ति गुणिनो जनाः।**
**शुष्ककाष्टश्च मूर्खाश्च न नमन्ति कदाचन।।**

म्हणजेच ज्याप्रमाणे फळांनी लगडलेला वृक्ष त्याच्या फांद्यासहित खाली झुकतो, त्याप्रमाणे गुणवान लोक नम्रतेने वागतात, आणि



दुसरीकडे मात्र कोरडे लाकूड वाकत नाही आणि मूर्ख लोक कधीच नम्रपणे किंवा गोड बोलून वागत नाहीत. त्यासाठी सर्वकाळ माणसांनी गोड बोलूनच वापले व्यवहार संपन्न केले पाहिजेत. गोड बोलण्याने झाडं सुद्धा फुलतात, तुटलेली माणसं आणि नातीसुद्धा पुन्हा जुळून येतात ! गोड बोलणे हेच सर्व रोगांवरील उत्तम आणि गुणकारी औषध आहे ! त्याच अनुषंगाने राजा भृतहरी एक सुंदर श्लोक लिहून जातात.

**भवन्ति नम्रास्तरवः फलागमैर्नवाम्बुभिर्दूरविलम्बिनो घनाः॥**
**अनुद्धताः सत्पुरुषाः समृद्धिभिः स्वभाव एवैष परोपकारिणाम्॥**

म्हणजेच कोणत्याही झाडाला फळे लागत नाहीत. ज्याप्रमाणे फळे लागल्यामुळे झाडे, पाण्याने भरल्यामुळे काळे ढग खाली येतात त्याचप्रमाणे ज्ञान, सत्ता, समृद्धी आल्यानंतरसुद्धा चांगले लोक उद्धट न होता नम्र राहतात, कारण परोपकार हा त्यांचा स्वभाव-गुण असतो. हेच सद्‌गुण समाजात वर्तन करणाऱ्या माणसांनी नेहमी आत्मसात करणे गरजेचे आहे.

तुकाराम नीती हे सदर लिहिण्याचे उद्दिष्ट म्हणजे स्वार्थ आणि परमार्थ साधण्याचा एक अल्पसा प्रयत्न आहे. विविध अभंगातून तुकारामांनी मानवी जीवन सुकर होण्यासाठी जी सोपी सोपी तत्वे प्रतिपादन केली आहेत तिच वचने आणि विचार सर्वश्रुत करणे हा प्रांजळ प्रयत्न सुरु आहे. हे लिहित असतांना, माझी तमाम वाचकांना नम्र विनंती आहे की; संत तुकारामांना कोणत्याही चौकटीत बंदिस्त करू नका.

तुकाराम हे एक समाजसुधारण्याचे स्वतंत्र रसायन असून त्यांच्या अभंगातून सतत समाजाच्या सर्वांगीण हिताचेच उपदेश वाचायला मिळत असतात. तुकाराम नीती लिहितांना मी महाराष्ट्र शासनाने संपादित केलेली तुकाराम गाथा संदर्भासाठी सोबत घेतली असून, अभंग क्रमांक एक पासून मी निवडून अभंगाचे विश्लेषण करतो आहे. आत्तापर्यंत 319 अभंगांचे बारकाईने वाचन आणि विवेचन झाले असून त्यापैकी वर्तमानात माणसांना जीवन आणि नीती सांगणारे हे 16 अभंग मी आपल्यासोबत चर्चिले आहेत. यानंतर येणारा जो अभंग असेल त्याचे साधक-बाधक आणि समाजाच्या विविधांगाने विवेचन करण्याचा माझा प्रयत्न राहील. तुकाराम नीती हे सदर महाराष्ट्रातील लोकप्रिय वर्तमानपत्र आधुनिक केसरी या वर्तमानपत्राचे संपादक, मित्र श्रीमान प्रा.डॉ.प्रभुजी गोरे सर नियमितपणे दर रविवारी प्रकाशित करतात, तेंव्हा या तुकोबांच्या शब्द यज्ञाचे खरे श्रेय त्यांनाच जाते. तेंव्हा चला, तुकोबांच्या या अभंगावर आपण चिंतन करूयात आणि जीवनात तुकाराम नीती उतरवण्याचा अल्पसा प्रयत्न करूयात ! जय तुकोबाराय !

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**



## सावळदबारा येथे जय कालिंका देवी शिक्षण संस्था यांच्या वतीने वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे शनिवार रोजी शिवाजी विद्यालयात जय कालिंका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा व कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा यांच्या संयुक्त सहभागातून आज वृक्षारोपण कार्यक्रमहाती घेण्यात आला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष भाऊराव कोलते व सचिव रत्नाबाई कोलते व संचालक मंडळ यांनी सर्वप्रथम वृक्षारोपण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. वर्ग पाचवी ते बारावी व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सुद्धा वृक्षारोपण केले. यावेळेस प्राचार्य कोलते नारायणराव यांनी विद्यार्थ्यांना मानवी आयुष्यात वृक्षाचे महत्त्व काय आहे. त्याचे जतन व संगोपन करणे ही केवळ गरज नसून जीवन जगण्यासाठी आपले कर्तव्य आहे याची जाणीव प्रत्येक विद्यार्थ्याला व शिक्षकांना आज करून दिली. एक झाड एक मुल ही योजना यावर्षी संस्थेमार्फत राबविण्यात येईल व संस्थेच्या प्रत्येक शाळेत व परिसरात वृक्षारोपण करण्यात येईल. संस्थेच्या सर्व शाळांमार्फत विद्यार्थ्यांना वृक्ष मोफत दिल्या जाईल व त्या वृक्षाची संपूर्ण जबाबदारी ही त्या विद्यार्थ्यांची राहील असे संस्थाध्यक्ष भाऊराव कोलते यांनी सांगितले.

यावेळेस शाळेतील प्रत्येक शिक्षकाने व प्राचार्य आणि विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. अतिथी पाहुणे म्हणून आचार्य नाना तायडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. गुलमोहर सप्तपर्णी अशोका सिसम कडूनिंब निलगिरी सुबाभूळ अशा शोभवंत झाडांची आज शालेय परिसरात व संस्थेच्या इमारतीसमोर वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते), पंजाबराव शेळके, योगेश थोटे, विकास पाटील, विजयसिंग राजपूत, भास्कर खामार, पोपटराव सोनवणे, ज्ञानेश्वर राठोड, गणेश मोहने, दीपक सपाटे, युवा शेळके, सतीश गावंडे, संजय जोशी, सुदाम राठोड, भूषण देसले, गणेश सत्रे, श्रीकृष्ण सोनवणे, भास्कर ससाने, जयराम गोती, अजय रबडे, सिसोदे सर, अजबराव चव्हाण, श्याम जाधव, संदीप कोलते, शिक्षक व शिक्षकेतर सर्व कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती शाळेचे प्राध्यापक जीवन कोलते सावळदबारा यांनी बोलताना सांगितले.

## व्ही.एल.सी व्हॉलीबॉल अकॅडमीच्या खेळाडूंची उत्कृष्ट कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नेहमीप्रमाणे व्ही.एल.सी. व्हॉलीबॉल ॲकॅडमी अकॅडमीचे खेळाडू राज्यस्तरावर व राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केली. जवळपास 20 हून अधिक राज्यस्तरावर तर तीन राष्ट्रीय स्तरावर खेळाडूंनी प्रतिनिधित्व केले.

सर्व खेळाडूना प्रशिक्षक व व्हीएलसी व्हॉलीबॉल एकेडमी व संभाजीनगर स्पोर्ट फाउंडेशन चे अध्यक्ष व सचिव लोकेश ठाकरे तसेच अभिषेक गणोरकर यांनी मार्गदर्शन केले. अधिक व अधिक व्हॉलीबॉल खेळाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी हे सर्वजण औरंगाबाद जिल्ह्यात काम करत आहेत. औरंगाबाद जिल्ह्याचे नाव महाराष्ट्राच्या पहिल्या तीन जिल्ह्यात औरंगाबाद जिल्हा आणण्यासाठी लोकेश ठाकरे व अभिषेक गणोरकर काम करीत आहे. सर्व खेळाडूंना संभाजीनगर स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने शुभेछा देण्यात आल्या.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद



महाराष्ट्रात तर्पण च्या माध्यमातून अनाथ मुलांच्या पूनर्वसनासाठी काम करणारे, वारकरी परंपरेचे पाईक आणि सुरुवातीच्या काळात पत्रकारीता करत सामाजिक, राजकीय क्षेत्रात स्वकृत्वाने प्रभाव निर्माण करणारे मा.श्रीकांत भारतीय यांची विधानपरिषदेवर निवड झाल्याबद्दल भेट घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व संपादक संतोष मानुरकर यांनी अभिनंदन केले.

# जिल्ह्यातून एकूण चार हजार तीनशे हेक्टरचा प्रकल्प

## मूल्य साखळी विकास कार्यक्रमासाठी धाराशिव जिल्ह्यातील 43 गावांची निवड..!

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने नवनवीन जातींचे बियाणे पेरणी करून उत्पादन वाढवण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने एकात्मिक सोयाबीन व गळीत धान्य उत्पादन वाढ आणि मूल्य साखळी विकास कार्यक्रम हाती घेतला आहे. त्या अंतर्गत जिल्ह्यातील सात तालुक्यामधील सोयाबीन पिकासाठी 43 गावांची निवड केली आहे.

या गावातील शेतकऱ्यांना हेक्टरी साडेसहा हजार रुपये अनुदान मिळणार आहे. जिल्ह्यातील महसूल मंडळातील गावांची सोयाबीन उत्पादन कमी आहे. या गावातील शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी राज्य शासनाकडून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

**हेक्टरी साडेसहा हजार रुपये अनुदान**



या अंतर्गत शेतकऱ्यांना हेक्टरी साडेसहा हजार रुपयांच्या अनुदान दिले जाणार आहे यात शेतकऱ्यांना सोयाबीन बियाणे त्यासाठी औषधे कीटकनाशके याचा समावेश असणार आहे. शेती शाळा, प्रशिक्षण शिबिरातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन देण्याचे कृषी अधिकाऱ्याकडून बोलले जात आहे.

**अशी होणार गावाची निवड**

जिल्ह्यातील ज्या महसूल मंडळातील गावांची सोयाबीन उत्पादन क्षमता कमी आहे अशा गावांची निवड केली जाते, यातून उत्पन्न वाढण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. पहिल्या वर्षी ज्या लाभार्थ्यांची निवड होईल तेच लाभार्थी तीन वर्षे राहणार आहेत.

### शेतकऱ्यांची निवड

**या योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज मागविले होते त्यानंतर लॉटरी पद्धतीने शेतकऱ्याची निवड केली आहे. एकात्मिक सोयाबीन व गळीत धान्य वाढ उत्पादन वाढ मूल्य साखळी योजनेसाठी शेतकऱ्यांनी बीबीएफ पेरणी करणे किंवा टोकन पद्धत वापरणे आवश्यक आहे.**

**महेश तीर्थकर,**
**जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी उस्मानाबाद**

# देवशयनी आषाढी एकादशी निमित्त शाळांनी काढला दिंडी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकिन व लोहगाव तसेच कृष्णापुर भागातील किलबिल प्राथमिक शाळा व लोहगाव भागातील कै.व्ही.डी.पाटील इंग्रजी शाळा व ज्युनिअर कॉलेज यांच्या वतीने देवशयनी आषाढी एकादशी निमित्त प्रभात फेरी काढून विविध संदेश देण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थी यांनी विठ्ठल रखुमाई च्या आकर्षक वेशभूषा करुन तसेच विविध संताच्या वेशभूषा परिधान करुन सम्पूर्ण गावातुन चिमूकले बालगोपाल यांनी विठ्ठल नामाचा जप करीत परिसर दणाणून टाकला. . विठ्ठल नामाच्या जपाबरोबरच विद्यार्थी यांनी विविध जनजागृति करताना वृक्षरोपण व शाळाबाह्य मुलांना शाळेत दाखल करावे असा संदेश देण्यात आला. या दिंडित सर्व पालक व गावकरी यांनी देखील सहभाग नोंदवून मोलाचे सहकार्य केले.

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा भाग असणारी आषाढी एकादशी सोहळा रविवारी आहे. यदिवशी



महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील भाविक विठ्ठल नामाचा गजर करीत पंढरपुरला पायी जातात व चंद्रभागेंत स्नान करुन विठ्ठलाचे दर्शन घेतात. हा दिवस महाराष्ट्रात अत्यंत महत्वाचा मानला जातो. वारीला जाणारे वारकरी हे समुदायातून म्हणजेच एकाग्रतेचे प्रतिक म्हणून सहभागी होतात. तसेच पंढरपुर पायी जान्याची परंपरा ही फार जूनी असून भक्ताची श्रद्धा या वारीशी जूळलेली आहे. खऱ्या अर्थाने पंढरपुर वारीची परंपरा समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी वारीला सुरुवात झाली यात विविध जातीपातीचे लोक सहभागी होतात.

यावेळी लोभापासून विभक्त असलेला घटक म्हणजेच वारकरी, यासह पायी दिंडीतून जनजागृतीद्वारे विद्यार्थी मनावर संप्रदायीक बाबी प्रतिबिंबित करण्याचे कार्य दिंडी सोहळ्यातून किलबिल शाळेने व कै.व्ही डी पाटील शाळेने राबविले. यावेळी मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद व शालेय वाहनाचे चालक मालक उपस्थित होते.

तसेच या स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर बघण्यासाठी उपस्थित होते.



# मक्रणपूर येथे गटविकास अधिकारी यांनी विविध समस्यांची केली पाहणी

## मक्रणपूर गाव घेणार दत्तक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मक्रणपुर गावात सरपंच बाई सतत गैर हजर राहतात, घरकुल यादी रद्द करून मर्जीतले लोकांना लाभ देण्याचा घाट घालन्याचा प्रयत्न, उपसरपंच ग्रामपंचायत चालवतात, ऑनलाईन सेवा बंद आहे, संगणक परीचालक जागेवर नसतात, सांड पाण्याची व्यवस्था नाही, भुमिगत गटाराचे चेंबर फुटल्याने दुरगंधी, रस्त्यावर चिकल, वापरण्याचे पाणी अवेळी सोडणे, ग्रामविकास अधिकारी गावात राजकारण करता इत्यादी समस्यासाठी जनशक्ती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अनिल शेळके व जिल्हाउपअध्यक्ष उदय गवळी यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात आंदोलन करण्यात आले.

यावेळी गटविकास अधिकारी सी.एम. ढोकणे मी मक्रणपुर गावात प्रत्यक्ष येऊ पाहणी करेल व ते शब्द दिल्या प्रमाणे गावात पाहणी केली त्यांना ही अस्वत वाटल अशी खंत ही व्यक्त केली.

यावेळी ग्रामविकास अधिकारी पगारे यांच्यावर भडकले ही व मी स्वतः मक्रणपुर गाव दत्तक घेतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पावण स्पर्श या गावाला झाले असुन हल्ली या गावाची अवस्था पाहुन अस्वस्थ वाटत आहे असे त्यांच्याशी बोलतांनी म्हणाले म्हणुनच मी मक्रणपुर हे गाव मी दत्तक घेतो अशीही ग्वाही दिली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पावण स्पर्श या मक्रणपुर गावाला झाले असुन हल्ली या गावाची परीस्थीती खुपच दैनिय दिसुन येत आहे या गावाला सुशिक्षीत नागरीकांची गरज आहे एकत्र येऊन गावाचा विकास करावा लागेल म्हणुनच मि हे गाव दत्तक घेतो अशी ग्वाही देतो व असे लेखी पत्र ही देतो.**

**सी. एम. ढोकणे**
**गटविकास अधिकारी**

# युनायटेड नेशन्स पब्लिक सर्व्हिस डे निमित्त खाकी वर्दीचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** युनायटेड नेशन्स पब्लिक सर्व्हिस डे निमित्ताने "समुदायातील सार्वजनिक सेवेचे मूल्य आणि सद्गुण" आणि लोकशाही आणि यशस्वी शासन सक्षम नागरी सुविधेचा सन्मान म्हणून हा दिवस ओळखला जातो आणि साजराही केला जातो. २५ जून रोजीचे औचित्य साधून यंदा खाकी वर्दीचा सन्मान करण्यात आलेला आहे. पोलीस दल दिवसरात्र सर्वसामान्यांच्या सेवेसाठी ऊन, वारा, पाऊस, थंडी याची तम न बाळगता कार्यरत राहतात. त्या सगळ्या पोलीस कर्मचाऱ्यांचे आभार आणि त्यांच्या कार्याचा गौरव युनायटेड नेशन्स पब्लिक सर्व्हिस डे निमित्ताने करण्यात आला. सर्वसामान्यांचे रक्षण करणाऱ्या पोलीस दलाला मदत, सहकार्य आणि त्यांचे आरोग्य अबाधित राहावे म्हणून तामिळनाडूच्या अर्बन प्लेटरद्वारे एक शुद्ध आणि शाश्वत नारळाच्या पाण्याचे वाटप करण्यात आलेले आहे. एक स्वादिष्ट, ताजेतवाने आणि पौष्टिक नारळाचे पाणी जे वर्षभर चवीत सुसंगत असते, अर्बन प्लेटरचे नारळाचे पाणी शाकाहारी, ग्लूटेन-मुक्त आणि पूर्णपणे नॉन-जीएमओ आहे. व्हिटॅमिन सी सह फोर्टिफाइड, शून्य-कचरा धोरणासह, 100% सौर उर्जेच्या सुविधेवर बनवलेले आहे. उन्हाळ्यात कठोर परिश्रम करून वाहतुकीचा ताण सांभाळून वाहतुकीच्या रहदारीचे नियोजन करणाऱ्या वाहतूक पोलिसांना देखील अर्बन प्लेटरचे नवीन लाँच केलेले नारळ पाणी देण्याची गरज आहे. तसेच संयुक्त राष्ट्रांनी साजऱ्या केलेल्या सार्वजनिक सेवा दिनाच्या निमित्ताने वाहतूक पोलिसांना अर्बन प्लेटर कोकोनट वॉटर देण्याची इच्छा आणि गरज असल्याची प्रतिक्रिया अर्बन प्लेटरचे संस्थापक चिराग केनिया यांनी व्यक्त केली.



# नगरपालिका, नगरपंचायत निवडणुका पुढे ढकला

## माजी ऊर्जामंत्री आमदार चंद्रशेखर बावनकुळे; सोमवारी राज्य निवडणूक आयोगाला भेटणार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्य सरकारसोबत चर्चा न करता ऐन पावसाळ्यात नगरपालिका, नगरपंचायत निवडणूक घेण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय चुकीचा आहे. पावसाळ्यात प्रशासकीय यंत्रणा निवडणुकीच्या कामात लागल्यास खरीप हंगाम, पूरपरिस्थितीकडे दुर्लक्ष होईल. त्यामुळे या निवडणुका सप्टेंबरनंतर घेण्यात याव्यात अशी मागणी निवडणूक आयोगाकडे सोमवारी करण्यात येणार असल्याचे माजी उर्जा व पालकमंत्री आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सांगितले.

नगरपालिका, नगरपंचायत निवडणुका पुढे ढकलाव्या, या मागणीसह सोमवारी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांच्या नेतृत्वात निवडणूक आयोगाला शिष्टमंडळ भेटणार असल्याचे माजीमंत्री आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. सर्व ९२ नगरपालिका व ४ नगर पंचायतचे सर्वपक्षीय प्रतिनिधी



यावेळी उपस्थित राहणार आहेत. शंभर टक्के मतदानाची संधी उपलब्ध करून देणे निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. निवडणूक आयोगाने या निवडणुका घेतल्या तर केवळ २० टक्के नागरिकांनाच मतदान करता येईल. अशा परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलाव्या, या मागणीसाठी राज्य निवडणूक आयोगाला भेटणार आहे. सप्टेंबरपर्यंत संपूर्ण प्रशासनाला पूरपरिस्थिती, अतिवृष्टी, खरीप हंगामाच्या कामात व्यस्त रहावे लागते. राज्य सरकारशी चर्चा करून निवडणूक आयोगाने निर्णय घ्यायला हवा होता. परंतु निवडणूक आयोगाने हेकेखोरपणा केला, असा आरोप आमदार बावनकुळे यांनी केला. राज्य निवडणूक आयोगाचा हा निर्णय राज्यातील एकाही पक्ष, लोकप्रतिनिधी व जनतेला मान्य नाही. त्यामुळे सर्वपक्षीय नेते निवडणूक आयोगाला निवडणूक पुढे ढकलाव्या, अशी मागणी करतील, असा विश्वास आहे.

ओबीसी आरक्षणाबाबत बोलण्याचा पटोलेंना अधिकारच नाही अडीच वर्षे महाविकास आघाडी सरकारने झोपा काढल्या. सुप्रीम कोर्टाने चारदा सरकारला डाटा तयार करण्यास सांगितले. परंतु मविआमधील नेते, मंत्री मोर्चे काढत बसले, असा टोला आमदार बावनकुळे यांनी लगावला. दोन दिवस झाले आमचे सरकार आले. दोन दिवसांत नाना पटोले ओबीसी आरक्षणाबाबत आमच्यावर आरोप करतात. प्रदेश काँग्रेसअध्यक्ष नाना पटोले रेटून खोट बोलत आहेत. ओबीसी आरक्षणाचा खून महाविकास आघाडी सरकारने केला. त्यामुळे नाना पटोले यांना बोलायचा अधिकार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तत्काळ ओबीसी आरक्षण मिळवून देतील, असा विश्वास व्यक्त करीत नाना पटोले उलट्या बोंबा मारत जनतेची दिशाभूल करीत असल्याचा आरोप आमदार बावनकुळे यांनी केला.

**वीज दरवाढ हे महाविकास आघाडी सरकारचे पाप**

महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे वीज दरवाढ झाली. जानेवारी ते जूनपर्यंत कोळश्याचे, हायड्रो प्रकल्पाचे नियोजन करावे लागते, ते केले नाही. उन्हाळ्यात महागडी वीज खरेदी करावी लागली. याचीही चौकशी करण्याची गरज आमदार बावनकुळे यांनी व्यक्त केली. जानेवारी ते जून महिन्यापर्यंत दुर्लक्ष केल्यामुळे आता जनतेवर जुलैपासून पुढील चार-पाच महिने वीज दरवाढीचा भार पडणार आहे. प्रति युनिट ८० पैसे ते सव्वा रुपयापर्यंत दरवाढ हे महाविकास आघाडी सरकारचे पाप आहे, असेही आमदार बावनकुळे म्हणाले. पेट्रोलचे दर कमी करण्याचा सरकार प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.



# भोकर तालुक्यात पावसाची जोरदार हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पावसाळ्याच्या प्रारंभी वरूणराजाने हूलकावणी दिल्याने बळीराजाची झोप उडाली. दूबारपेरणी करावी लागणार याची धडकी ऊरात भरली असताना मागील दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. पाऊस अधिकच मेहेरबान झाल्याने शेतीला तलावाचे स्वरूप प्राप्त झाल्याने हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. नदीनाल्यांना पूर आल्याने काही गावात पाणी शिरले आहे. वीज पडून एका बालिकेचा मूत्यू झाला आहे.

पावसाळ्याच्या प्रारंभी कमी-अधिक प्रमाणात पाऊस झाल्याने खरिपाच्या पेरण्या खोळंबल्या होत्या. दूबारपेरणी करावी लागणार याची सल मनात बोचत असताना वरूणराजा प्रसन्न झाला आणि मागील दोन दिवसांपासून तालुक्यात पावसाची रिपरिप सुरू झाल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. नदीनाले दूथडी भरून वाहत असल्याने शेतीला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. अचानक पाऊस दत्त म्हणून हजर झाला आणि कोवळी पिके पाण्याखाली गेली. हजारो हेक्टर जमीन खरडून गेल्याने खरिप हंगामाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तालुक्यातील दिवशी, सायाळ, डौर लगळूद, रावणगाव, रेणापूर गावात पूराचे पाणी शिरले आहे. भूरभूशी येथे वीज पडून एका बालीकेचा मूत्यू झाला आहे. सखल भागात पाणी साचले आहे. महसूल आणि कृषी विभागानी तात्काळ नूकसानग्रस्त गावांना भेटी देऊन शेतीचे पंचनामे करून हातबल झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी वरिष्ठांकडे अहवाल सादर करावा अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

**शेतीला आले तळ्याचे स्वरूप**

तालुक्यात नूकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. नदीनाल्यांना पूर आल्याने शेतीला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. हजारो हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. वीज पडून बालीका दगावली आहे. या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी तहसीलदार राजेश लांडगे आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्येक्ष पाहणी दौरा सुरू केला आहे. अहवाल प्राप्त झाल्यावरच पूढिल कार्यवाही करण्यात येईल. तालुक्यात (एकूण २७३.३) मिलीमीटर पाऊस झाला असुन सर्वाधिक पाऊस हा कीनी मंडळात झाला अशी माहिती तहसीलदार राजेश लांडगे यांनी दिली आहे.

# देव्हारी येथे "थोडेसे माय बापासाठी"या योजने अंतर्गत जेष्ठ नागरिकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान

आधुनिक केसरी न्यूज




**सोयगाव :** तालुक्यातील देव्हारी ग्रामपंचायत ग्रामसंसद च्या वतीने दि.७/७/२२ रोजी कक्ष स्थापन करण्यात आला. वतीने देव्हारी येथील वयोवृद्ध यांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून त्यांना त्या कक्षात खुच्र्यावरती बसवून उपसरपंच उत्तम चव्हाण व ग्रामविकास अधिकारी एस.जी. काळे यांच्या हस्ते त्या पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

"थोडेसे माय बापासाठी" या योजनेअंतर्गत गावातील वयोवृद्ध जेष्ठ नागरिकांनी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहे. पावसाळ्यात विविध आजार मोठ्या प्रमाणावर पसरत असतात, याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी एस.जी.काळे यांनी जेष्ठ नागरिक, वयोवृद्ध विविध आजारावर मार्गदर्शन केले. तुम्हाला जे काही अडचणी असल्यास आम्हाला कळविणे असे बोलत होते. आज जरी तुमच्यासाठी स्पेशल कक्ष नाही तरी तुमच्या स्पेशल कक्ष स्थापन करणार आणि त्याठिकाणी खुच्र्या, सतंरजी, तबला, पेटी, अशा प्रकारे उपाययोजना ग्रामपंचायतच्या माध्यमातून पूर्ण करु सरपंच समीखाँ तडवी बैठकीत सांगितले साहित्य तुमच्यासाठी साहित्य कक्षात ठेवण्यात येणार आहे. यावेळी आलेल्या जेष्ठ नागरिक यांच्या हस्ते विविध प्रकारचे वृक्ष लागवड यावेळी करण्यात आली. जेष्ठ नागरिक यांचा सन्मान झाल्याने व वृक्ष केल्याने त्यांचा आनंद गगनात मावेना.

अशा प्रकारे ग्रामपंचायत देव्हारीच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन जेष्ठ नागरिकांचा सन्मान व त्यांच्या हस्ते वृक्ष झाली. बैठकीत जेष्ठ नागरिक कक्ष स्थापन करणे, जेष्ठ नागरिक सर्वेक्षण करणे, जेष्ठ नागरिक सन्मान व समस्या सोडविणे, वृक्ष लागवड करणे, पंचायत राज अभियान राबविणे, वारसहक्क नोंदी घेणे व पती-पत्नी नावे मुलांना नमुना आठ संयुक्तीकरण करणे, स्वतंत्र्चा अमृत महोत्सव साजरा करणे, जेष्ठ नागरिक करिता तसेच मुले व स्त्रियासाठी आरोग्य शिबीर आयोजन इत्यादी उपक्रमाचा समावेश आहे, असे याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी एस.जी.काळे यांनी बैठकीत सांगितले. यावेळी सरपंच समीखाँ तडवी, उपसरपंच उत्तम चव्हाण, माजी सरपंच मिराबाई चव्हाण, ग्रामविकास अधिकारी एस.जी.काळे, सर्व ग्रामपंचायत सदस्य आदींसह जेष्ठनागरिक व मान्यवर उपस्थित होते.



# कु.साक्षी दानवे हिचे जवाहर नवोदय परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज

जालना : ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळवून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने केंद्र सरकारने जवाहर नवोदय विद्यालय सुरू केली आहे. या परीक्षेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना जिल्ह्यातील नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी ते बारावीपर्यंत मोफत शिक्षण दिले जाते.

यावर्षी जवाहर नवोदय विद्यालयातर्फे एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत राजूर येथील कुमारी साक्षी रावसाहेब दानवे या विद्यार्थिनीने घवघवीत यश मिळवून नवोदय विद्यालय परीक्षेत पात्र ठरली आहे. पुढील शिक्षणासाठी परतुर तालुक्यातील आंबा येथे इयत्ता सहावीपासून शासनामार्फत निशुल्क शिक्षण मिळणार आहे. त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या यशाबद्दल राजूरकरांनी शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन गौरविण्यात आले व पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिवाजी बांदल, प्रा. बाळासाहेब बोराडे, डॉ. ईश्वर जटाळे, विनोद पांडे, वल्लभ गाढे, गजानन लहाने, विष्णू गवळी, शंकर काळे, सोनाजी चिंचोले आदींनी साक्षी दानवेचे कौतुक केले.



# नव्या पिढीने महापुरुषांचा इतिहास वाचावा : राज्यपाल

## पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा 77 वा वर्धापन दिन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या महापुरुषांचा नव्या पिढीने इतिहास वाचण्याची गरज व्यक्त करुन देशभरात डॉ. आंबेडकर यांनी स्थापित केलेल्या विविध संस्था जीवित ठेवून त्या टिकविण्याची जबाबदारी प्रत्येक शासनाची आहे. राज्यातील महापुरुषांचा इतिहास लाभलेल्या संस्था टिकविण्यासाठी राज्य सरकारही संस्थांना सहकार्य करेल, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट येथील दीक्षांत सभागृहात राज्यपाल कोश्यारी यांच्या उपस्थितीत पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा 77 व्या अमृत महोत्सवी वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आला होतो, यावेळी कोश्यारी बोलत होते. या सोहळ्याला कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, विधान परिषदेचे सदस्य प्रवीण दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले की, देशात अनेक महापुरुष निर्माण झाले आहेत. या महापुरुषांचा इतिहास, विचार समाजात रुजविण्यासाठी अनेक संस्था कार्य करीत आहेत. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी स्थापित केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा समावेश आहे. अशा संस्थांच्या माध्यमातून मुलांना महापुरुषांचा इतिहास, त्यांचे विचार आणि जीवन जगण्यासाठी



प्रेरित करण्याची गरज असून या नव्या पिढीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वामी विवेकानंद अशा अनेक महापुरुषांचा इतिहास वाचावा. जेणेकरुन देशभरात नवी ताकद निर्माण होऊन देश पुढे जाईल. पीपल्स एज्युकेशन सोसायटी निश्चितच आपल्या कार्यातून देश निर्माण कार्य करेल आणि यापुढेही संस्था टिकून ठेवली जाईल. संस्थेपुढे येणाऱ्या समस्या राज्य सरकार आणि संस्था एकमेकांच्या सहकार्याने सोडविल्या जातील. आगामी काळात पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर चालणारी आदर्श संस्था निर्माण करण्याच्या भावनेने काम केले जाईल, असा विश्वास कोश्यारी यांनी व्यक्त केला.

**बालकांना मराठी शिकवा**

मराठी वृत्तपत्रांमध्ये राज्यातील मराठी शाळा बंद होत असल्याच्या बातम्या वाचनात येत आहेत. महाराष्ट्रात राहतोय तर मराठी बोललेच पाहिजे. माझा अभ्यास कमी असला तरीही मी मराठी बोलण्याचा प्रयत्न करतो. मात्र आजच्या बालकांना त्यांच्या पालकांनी मराठी शिकवावी, असा आग्रह सुद्धा राज्यपालांनी यावेळी आवर्जून केला.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, संविधान रचयते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वंचित बहुजन घटकांच्या शिक्षणासाठी 1945 मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या सोसायटीच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन घडविले जात आहेत. संस्थेचे कामकाजही चांगल्या रितीने सुरु आहे. राज्यात नवे सरकार स्थापन झाले आहे. या सरकारमध्ये सामाजिक न्याय विभागाला सक्षम नेतृत्व मिळेल अशी आशा व्यक्त करुन राज्य सरकारच्या माध्यमातून बहुजनांना न्याय देण्याचे काम होईल. तसेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे रुपांतर विद्यापीठात व्हावे अशी मागणीही होत आहे, असे आठवले यांनी सांगितले.

प्रविण दरेकर म्हणाले, पीपल्स एज्युकेशन सोसायटीला मागील काळात 12 कोटींचा निधी मिळवून दिला. राज्यात नवे सरकार स्थापन झाले आहे. त्यामुळे राज्य सरकारकडे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करेल. तसेच राज्य शासनाकडून वेळोवेळी मदत केली जाईल.

यावेळी राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच माजी विद्यार्थ्यांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी घेतले संत गजानन महाराजांचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलडाणा :** राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज शेगाव येथील संत गजानन महाराज मंदिरास भेट देऊन समाधीचे दर्शन घेतले. त्यांच्यासमवेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. कोश्यारी यांनी दुपारी चार वाजता मंदिरास भेट दिली.

पोलिसांच्या मानवंदनेनंतर त्यांनी मंदिरातील गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले.

त्यानंतर त्यांनी राममंदिर, तसेच महाराजांच्या गादीचे दर्शन घेतले. तत्पूर्वी संस्थानच्या वतीने राज्यपाल श्री. कोश्यारी यांचे मंत्रोच्चारात औक्षण करण्यात आले. तसेच संस्थानचे विश्वस्त निळकंठ पाटील यांनी राज्यपाल यांचा सत्कार केला. तसेच राज्यपाल यांना श्री गजानन महाराजांची मूर्ती भेट देण्यात आली.

यावेळी आमदार डॉ. संजय कुटे, आकाश पुंडकर, श्वेता महाले, संजय गायकवाड, जिल्हाधिकारी एस. रामामुर्ती, जिल्हा पोलिस अधीक्षक अरविंद चावरिया, संस्थानचे विश्वस्त निळकंठ पाटील आदी उपस्थित होते. शेगाव येथील कार्यक्रमानंतर श्री. कोश्यारी यांनी अकोल्याकडे प्रयाण केले.



# चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनची दमदार कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गजाबाई गोपीचंद पवार यांनी फिर्याद दिली की, अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे दरवाजाचे कडीकोयडा तोडुन घरात आत प्रवेश करुन फिर्यादीच्या मालकीचा मायक्रोमॅक्स कंपनीचा मोबाईल तसेच देवघरातील चांदीचे देव, तांब्याचे कळस, घंटा व रोख रक्कम असे एकुण ६१०० रु किंमतीचे वस्तु व रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरटयांनी फिर्यादीच्या संमतीशिवाय आर्थिक लाभासाठी घरफोडी चोरी करुन नेले आहेत त्यावरुन चाळीसगाव रोड पो.स्टे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

नमुद गुन्हयाचा तपास करीत असतांना गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने मिळालेल्या माहितीवरुन नमुद गुन्हा हा सरफराज अन्सारी याने केलेला आहे. त्याअनुषंगाने सपोनि पाटील यांनी पोउनि विनोद पवारसह शोध पथकातील कर्मचारी यांना सदर ईसमांबाबत माहीती देवून त्यास ताब्यात घेवून पुढील तपास करण्याबाबत आदेशित केले. त्यावरुन पथकांने त्यास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्यांने त्याचे नाव सरफराज अहमद ईलियास अहमद अन्सारी वय २७ वर्ष रा. ऐंशी फुटी रोड तिरंगा चौक धुळे असे सांगितले. त्याचेकडेस सदर गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्यांने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली तसेच त्याने गुन्हयातील चोरीस गेलेला वरील वर्णनाचा ६१०० रु किंचा त्यात मायक्रोमॅक्स कंपनीचा मोबाईल तसेच देवघरातील चांदीचे देव, तांब्याचे कळस, घंटा व रोख रक्कम तसेच गुन्हा करतेवेळी वापरलेली ४५,००० रु किंची स्प्लेंडर कंपनीची मोटारसायकल विना नंबरप्लेट असलेली असा एकुण ५१,१०० रु किंचा मुद्देमाल हस्तगत केला असुन सरफराज अहमद ईलियास अहमद अन्सारी वय २७ वर्ष रा. ऐंशी फुटी रोड तिरंगा चौक धुळे यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असुन सदर आरोपीतास न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दिनांक १०/०७/२०२२ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना ५४ भुरा पाटील हे करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक प्रविणकुमार पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी धुळे शहर विभाग धुळे ईश्वर कातकडे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सपोनि संदिप पाटील, पोउनि विनोद पवार, संदीप काळे, ज्ञानदेव काळे, पंकज चव्हाण, भुरा पाटील, एस.जी. कढरे, अविनाश पाटील, हेमंत पवार, स्वप्नील सोनवणे, चेतन झोलेकर, इंद्रजित वैराट, प्रशांत पाटील व चालक कुलदिप महाजन अशांनी केली आहे.

# डॉ.बा.आं.म. विद्यापीठाच्या 'कौशल्य विकास केंद्रासाठी' 25 एकर शासकीय जमीन विद्यापीठाला हस्तांतर : डॉ.नरेंद्र काळे

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने अंबाजोगाई या येथे कौशल्य विकास केंद्र उभा करण्यास मंजुरी दिली होती. या कौशल्य विकास केंद्रासाठी 25 एकर शासकीय जमीनीची आवश्यकता होती. त्या करीता विद्यापीठाने जिल्हा प्रशासनाकडे आवश्यक जमीनीची मागणी केली होती. जिल्हाधिकारी बीड यांच्या दि.17/06/2022 च्या आदेश क्र. 2014 महसुल-1 क.भा.ज.प्र.क्र. 149 नुसार दि.05/07/2022 रोजी मोजे अंबाजोगाई, ता.अंबाजोगाई जि.बीड येथील शासकीय जमीन स.न.17/अ/5 वाडी विभाजनानंतर मौजे काळवटी तांडा नवीन सर्वे नं. 1/अ/5 मधील शासकीय जमीनीचे क्षेत्र 10 हेक्टर (25 एकर) जमीनीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या कडे कौशल्य विकास केंद्रासाठी ताबा मिळाला आहे. अंबाजोगाई परिसराच्या शैक्षणिक विकासासाठी ही एक महत्वाची घटना आहे. व्यवस्थापन परीषदेचा सदस्य व अंबाजोगाई चा नागरिक म्हणून याचा मला आनंद झाला असल्याची भावना यावेळी डॉ.काळे यांनी व्यक्त केली.

पुढील काळात हे कौशल्य विकास केंद्र लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे व त्या माध्यमातुन या परिसरातील विद्यार्थ्यांना कौशल्याधारीत व व्यवसायाभिमुख दर्जेदार शिक्षण मिळावे, या करिता मी प्रयत्न करेन. या केंद्राचा बीड जिल्ह्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांना फायदा होईल, असेही डॉ.सचिन काळे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

डॉ.काळे आपले मनःपूर्वक-सहहृदयी आभार :

अंबाजोगाईकर

विद्यार्थी दशेपासुनच चळवळीची नाळ असणारा हा उमदा तरुण सातत्याने समाज, समाजातील तळागाळापर्यंत जाऊन गरजवंतांसाठी मदत करत कायम आपल्या अंबाजोगाईच्या वैभवात कशाची भर टाकता येईल यावरच भर देऊन आपले लक्ष्य-उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अहोरात्र धावतोय याचीही यानिमित्ताने नोंद घेणे गरजेचे आहे.

डॉ.सेलच्या माध्यमातून डॉक्टरांच्या अडचणी-समस्या तर स्वीकृत नगरसेवक असताना अंबाजोगाई न.प.अंतर्गत येणाऱ्या शहरभरातील अत्यावश्यक आणि संवेदनशील विषयात हिरारीने सहभाग घेऊन त्या विषयात तोडगा निघेपर्यंत न थांबणारे डॉ.सचिन (नरेंद्र) काळे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य तर उल्लेखनीयच!

ज्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी गहन स्वरूपाची अडचण आहे अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या NGO मार्फत ते बऱ्यापैकी मदत करतात. आजपर्यंत कितीतरी गोरगरीब विद्यार्थ्यांना हातभार लावत डॉ.काळे हे शैक्षणिक दाते ही ठरले आहेत. शिवाय विद्यापीठ क्षेत्रातीलही त्यांचे कामकाज नोंदीव आहे. असे हे सार्वभौम युवा नेतृत्व आमच्या अंबानगरीत उदयास आले याचा आम्हाला सार्थ अभिमान असुन ते उद्याच्या काळातील ऐक अलौकिक सामाजिक-राजकीय नेतृत्व म्हणून उदयास येणार असल्याची आम्हां अंबाजोगाईकरांना खात्री असल्याचा विश्वास काहींनी आमच्या माध्यमातून बोलून दाखवला. आपण हे केंद्र अंबाजोगाई येथे आणण्यासाठी केलेले प्रयत्न आणि त्यात मिळवलेल्या यशाबद्दल आम्ही अंबाजोगाईकर आपले मनापासून आभारी असल्याच्यही प्रतिक्रिया अनेकांनी दिल्या असून ऐक अंबाजोगाईकर म्हणून डॉ.नरेंद्र काळे यांच्या कार्याचा जेवढा गर्व आम्हाला आहे. तेवढाच गर्व येणाऱ्या काळात काळे पर्व पाहताना संपूर्ण अंबाजोगाई शहरातील-तालुक्यातील प्रत्येक व्यक्तीमत्वाला वाटल्याशिवाय राहणार नाही असे ही मत अनेकांनी व्यक्त केले.

# अजीतकुमार कुरुप यांना यंदाचा स्नेहसंवर्धन पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** आंतरभारती, अंबाजोगाईच्या वतीने दर वर्षी दिला जाणारा स्नेहसंवर्धन पुरस्कार यंदा मूळ केरळचे राहणारे उषा टायर वर्क्सचे अजीतकुमार शिवकुमार कुरुप यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार १५ ऑगस्ट २०२२ रोजी सन्मानपूर्वक प्रदान केला जाणार आहे. आंतरभारतीचे राष्ट्रीय सचिव अमर हबीब व मराठवाडा साहित्य परिषदेच्या स्थानिक शाखेचे अध्यक्ष दगडू लोमटे हे या समारंभाचे प्रमुख अतिथी असणार आहेत.

परिचय- अजीतकुमार यांचे वडील शिवकुमार कुरूप हे १९८४ साली त्यांचे भाचे उन्नीकृष्णन नायर यांच्या समवेत केरळ राज्यातील पथ्थनम तिट्ठ या जिल्ह्यातील पंडलम गावातून अंबाजोगाईला आले व पंचायत समिती समोर किरायाच्या जागेत त्यांनी पंक्चर काढणे, टायर रिवायडिंग करणे याचा छोटेखानी व्यवसाय सुरु केला. नंतर त्यांनी जुन्या पेट्रोल पंपा जवळ आपला व्यवसाय नेला. काही वर्षात त्यांनी मोरेवाडी येथे बीड हाय-वे लगत जमिन विकत घेतली व तेथेच स्वतःचा व्यवसाय स्थिर केला. या दरम्यान त्यांचा मुलगा अजीतकुमार याने पदवीचे शिक्षण पूर्ण केले व वडिलांना व्यवसायात हातभार लावण्यासाठी १९९७ साली तो अंबाजोगाईला आला. पण अगदी ३ वर्षात सन २००० साली त्यांचे वडील शिवकुमार कुरूप यांचे अल्पशा आजराने निधन झाले व त्यानंतर अजीतकुमार यांनी स्वतःच्या खांद्यावर व्यवसायाची जबाबदारी घेतली व तेव्हापासून आजपर्यंत ते अंबाजोगाईमधे आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ आहेत. त्यांचे अंबाजोगाईत अनेकांशी मैत्रीचे संबंध आहेत.

९ वा पुरस्कार - आंतरभारती अंबाजोगाईने २०१४ साली प्राचार्य डॉ. बी. आय. खडकभावी यांना पुरस्कार देऊन स्नेहसंवर्धन पुरस्काराची सुरुवात केली. त्या नंतर शशिकांत रुपडा (मनीष स्वीट), शंकर मेहता (मेवाड हॉटेल), प्राचार्य एम. बी. शेट्टी (तंत्र महाविद्यालय), आनंद अंकम (श्रीनिवास हेअर सलून), सुशीला शेट्टी (उडपी हॉटेल), शेख शमीम (सिमेंट वस्तूंचे निर्माते), राजू जांगीड (सुतार काम) यांना सन्मानित करण्यात आले आहे.

आंतरभारती अंबाजोगाईचे अध्यक्ष दत्ता वालेकर, सचिव वैजनाथ शेंगुळे, कोषाध्यक्ष राजाभाऊ पिंपळगावकर, कार्यक्रमाचे संयोजक अनिकेत डिघोळकर, संतोष मोहिते, ज्योती शिंदे, शरद लंगे व अन्य सहकारी कार्यक्रमाची तयारी करीत आहेत.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# संतप्त नातेवाईकांचा ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे ठिय्या

## रोहित्राची विद्युत वीज जोडणी करताना चार कामगार ठार प्रकरण; पाच जणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यातील हिवरखेड़ा नांदगिरवाड़ी भागात ह्रदय हलवणारी घटना शुक्रवार दुपारी घडली आहे. शेतात कृषि पंपासाठी नवीन ट्रांसफार्मर जोड़णी करत असताना विद्युत तारांचा विज प्रवाह झटपट आल्याने चार कामगारांचा विद्युत तारांना चिटकुन जागीच मृत्यु झाल्याची ह्रदयद्रावक घटना घडली आहे. यात सर्व कामगार नावडी तालुका कन्नड येथील आहे. तसेच मृत व्यक्तींना वेळेवर ॲम्बुलन्स न मिळाल्याने त्यांना खासगी वाहनामध्ये ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या ठिकाणी संतप्त नातेवाईक ग्रामस्थांनी गुत्तेदार, शेतकरी, विद्युत अभियंता यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावे व त्यांना तात्काळ अटक करावी अशी मागणी करून ठिय्या मांडला होता. शुक्रवार रोजी सकाळ पासुन रिमझिम पाऊंसाची सरी सुरु होती. शेतकरी वर्ग शेती कामत गुतलेले होते. त्यातच हिवरखेड़ा नांदगिरवाडी या गावापासून सुमारे एक-दीड किलोमीटर अंतरावर बानोबि रबिब पठाण यांचे शेत आहे या शेतात पोल व वीज जोडणीचे काम औरंगाबाद येथील अनुकुल कंपनीला दिले होते. कंपनीने हे काम एका खाजगी कंपनीतील गुतेदाराला दिल्यानंतर त्याने कामावर नावडी येथील 4 मजुरांना लावल्या. बानो बी पठाण यांच्या शेतालगत मकसूद पठान यांचा पपईचा बाग आहे. परिसरात वन्य प्राणि शेतातील पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान करीत असल्याने त्यांनी रानडुकरांचा उपद्रव टाळण्यासाठी शेताच्या कुंपणावर विद्युतप्रवाह सोडण्याची माहिती मिळत आहे. त्याचवेळी विजेच्या तारा ओढत ओढत पपाईच्या बागाजवळ आले असता, विद्युत तारा कुंपनावरवरील विद्युत प्रवाहाला स्पर्श झाल्याबरोबर दरम्यान शॉक लागल्याने चार मजुरांचा जागीच मृत्यू झाला. तसेच पाऊस सुरु असल्याने त्या ठिकाणी कोणीही लक्ष दिले नाही. मात्र काहीच वेळाने ही घटना परिसरातील लोकांनी बघितली. घटना कळताच पोलिस उपविभागीय अधिकारी मुकुंद अघाव, ग्रामीण पोलीस निरीक्षक संग्राम भालेराव, महावितरण कार्यकारी अभियंता सुरेश दौड़, उपकार्यकारी अभियंता नितीन गायकवाड, कनिष्ठ अभियंता नाथा जाधव, बीट जमादार सतीश खोसरे, संजय आठवडे, त्यासोबत नावड़ी गावातील सामाजिक कार्यकरते नागरिक यांनी घटनास्थळी पाहणी केली.

संतप्त नातेवाईकांचा ग्रामीण रुग्णालयासमोर ठिय्या दरम्यान या ठिकाणी रुग्णवाहिका न मिळाल्याने मृतदेह एका खासगी वाहनातून कन्नड ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी आणण्यात आले. या ठिकाणी संतप्त नातेवाईक ग्रामस्थांनी गुत्तेदार, शेतकरी, विद्युत अभियंता यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावे व त्यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी करून ठिय्या मांडला होता तसेच दोषीवर कारवाई केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा घेतल्याने या ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शेवटी पोलिसांनी व काही सामाजिक कार्यकर्त्यांनी नातेवाईकांची समजूत काढली व पोलिसांनी कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

**या 5 जणांवर पोलिसांनी केले सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल**

या प्रकरणी तक्रारदार बाळकृष्ण कारभार थेटे यांच्या फिर्यादीवरून ठेकेदार कंपनी अनुकूल पावर कंपनी  सुपरवायझर मुकुंद भास्कर सोबने, शाखा अभियंता चिकलठाण नाथा जाधव, शेतकरी मकसूद पठाण, हिवरखेडा वायरमन हिवाळे यांच्याविरुद्ध कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील कारवाई पोलीस निरीक्षक संग्राम भालेराव करत आहे.

**घरातील कमवता गेल्याने कामगारांचे कुटुंबच झाले निराधार...**

ह्रदयाला झटका बसल्याची घटना घडल्याने घरातील कमवता व्यक्ती गेल्याने कामगाराचे कुटुंब निराधार झाल्याचे चित्र पहावयास मिळते. मृत जगदीश मुरकुंड यांच्या पश्चात दोन लहान मुले, पत्नी, आई, वडील, भाऊ असा परिवार आहे. भारत वरकड यांच्या पश्चात तीन मुले, पत्नी, आई-वडील असा परिवार आहे. अर्जुन मगर हा अविवाहित आहे. त्यांच्या वडिलांचे निधन झालेले आहे. त्यांच्या पश्चात आई, भाऊ असा परिवार आहे. गणेश थेटे यांच्या पश्चात दोन लहान मुले, पत्नी, आई-वडील असा परिवार आहे. गणेश हा घरातला ऐकूलता एक होता. त्याच्या निधनाने हे कुटुंब निराधार झाले आहे तसेच गणेश यांच्या पत्नी यांनी माहिती दिली आहे की गणेश यांना खरेतर शुक्रवार रोजी कामाला जायचे नव्हते कारण त्यांना एका खासगी बँकेत कर्ज प्रकरण करायचे होते ते शुक्रवारी कामाला जाणार नव्हते असे पती-पत्नी ठरले होते. मी जरा कन्नडवरून जाऊन येतो असे पत्नीला सांगून गणेश कन्नड आला त्याला जगदीश मुरकुंडे, अर्जुन मगर आणि भरत वडकर हे कन्नडला भेटले. फक्त बारा वाजेपर्यंत काम आहे. तेवढे करून तो वाटलं तर निघून जाय असे मित्र मंडळ यांची सगंमत झाली, म्हणून गणेश कामावर गेला तो घरी परत आलाच नाही पण जेव्हा ही घटना त्यांच्या पत्नीला कळाली तेव्हा ती सांगत होती की हे कामावर गेलेच नाही. आम्हाला बँकेत जायचे आहे, त्यांनी मला साडी देखील बदलाची सांगितलेली आहे. मी साडी घातलेली आहे आणि त्यांच्या येण्याची वाट बघत आहे, अश्या अंगाला काटा येईल रडत रडत सांगितले. हातावर संसार असलेल्या संसाराचा गाडा चालवण्यासाठी पोटाची खळगी भरण्यासाठी नावडी येथील गणेश थेटे, भरत वरकड, गणेश मुरकुंडे, अर्जुन मगर हे चारीजण गेल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे. सात ते आठ वर्षापासून विद्युत महामंडळाच्या या योजनेतुन काम ठेकेदारामार्फत काम करत होते. ही घटना घडल्याने नावडी गावात शोककळा पसरली होती. तसेच संबंधित व्यक्तीच्या कुटुंबाला शासनाकडून तत्काळ मदत जाहीर करावे, अशी मागणी होत आहे.

**ज्या एजन्सीला संबंधित काम देण्यात आले होते. त्या एजन्सीने मजुरांच्या सुरक्षेतीच्या दृष्टीने इतर साहित्य का दिले नाही. काम सुरू असताना फील्डवरील विद्युत बंदचे परमिशन काढावे लागते, ते परमिट घेतले होते का? या ठिकाणी विद्युत प्रवाह कसा आला?, संबंधित काम पावसाळ्यात सुरू केले असून प्रश्न निर्माण झाले आहेत? तसेच मृतदेह घटना स्थळापासून आणण्यासाठी ग्रामीण रुग्णालयात ॲम्बुलन्स का उपलब्ध होत नव्हती. संकटप्रसंगी ॲम्बुलन्स मिळत नाही. इतर दिवस, दिवसभर ग्रामीणमध्ये उभे राहतात. मात्र वेळेवर काम येत नाही अशा वेळेवर कोणी अधिकारी-कर्मचारी मदत करण्यास पुढे का येत नाही? घड़लेली घटना दयानीय आहे. दोषीवर कड़क कार्यवाही करून मृत व्यक्तींच्या कुटुंबाला शासनाकडून तत्काळ मदत जाहीर करावे.**

**अनिल शेळके पाटील**
**जनशक्ती शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष**



# निसर्ग मित्र समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नगाव विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र शासन छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार प्राप्त निसर्ग मित्र समिती धुळे व गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय नगांव ता.जि. धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने नगाव विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. सर्व वृक्षसंवर्धनाचा प्राध्यापकांचा संकल्प करण्यात आली. यावेळी निसर्ग मित्र समिती धुळे जिल्हा जिल्हाध्यक्ष तथा सेनिउप शिक्षणाधिकारी डी.बी. पाटील, संस्थापक प्रेमकुमार अहिरे, राज्य संघटक प्रभाकर सूर्यवंशी, जिल्हा सचिव विश्वास पगार, धुळे शहर अध्यक्ष प्रा. एच.ए. पाटील, धुळे तालुका संघटक ईश्वर बैसाणे, सामाजिक कार्यकर्ते सुनिल बैसाणे, निसर्ग अहिरे, व विद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षिक वर्ग कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन निसर्ग मित्र समिती चे राज्य महासचिव संतोषराव आबा पाटील तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.आर. पाटील यांनी केले. यावेळी लागवड केलेल्या सर्व वृक्षांची जोपासना करण्यासाठी सर्व शिक्षक- प्राध्यापकांनी संकल्प केला असून पुढील वर्षी सदर वृक्षांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक निसर्ग मित्र समिती धुळे तालुका उपाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. एस.आर. पाटील यांनी पत्रकान्वये दिली आहे.

# भूरभुशी येथे वीज पडून बालिकेचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात मागील दोन दिवसांपासून संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. शनिवारी सकाळी साडे अकरा वाजता सुमारास भूरभूशी (ता.भोकर) येथे वीज पडून एका बालिकेचा मृत्यू झाला असून आई गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. पावसाळ्याच्या पहिल्याच चरणात वरूणराजाने हुलकावणी दिली आहे. पुनर्वसु नक्षत्रात मात्र पावसाची संततधार सुरू झाल्याने नदिनले दुथडीभरून वाहत आहेत. मागील दोन दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू झाल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. शनिवारी भूरभूशी येथे चंद्राबाई नारायण गम्मलवाड आणि तिची मुलगी आडेलाबाई नारायण गम्मलवाड (वय १३) हे दोघी सकाळी जनावरे चारण्यासाठी शेतात गेले असता साडेअकरा वाजताच्या सुमारास वीज पडून आडेलाबाई या मुलीचा जागीच मृत्यू झाला असून आई चंद्राबाई ही गंभीर जखमी झाली आहे. या घटनेची माहिती तहसीलदार राजेश लांडगे यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहे. संबधीत महसूल कर्मचाऱ्यांना पंचनामा करून अहवाल सादर करण्याची सूचना केली आहे. घटनेचा सविस्तर अहवाल मिळाल्यानंतर मयताच्या कुटूंबियांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात येईल, अशी माहिती तहसीलदार राजेश लांडगे यांनी दिली आहे.


# पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी

आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत

पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४

श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910


# इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या नांदेड जिल्हा अध्यक्षपदी पटेल जैनोद्दीन यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सेराज अहमद कुरेशी यांच्या निर्देशानुसार व त्यांच्या सहमतीने मराठवाडा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांनी नांदेड येथील संपादक महाराष्ट्र न्यूज नेटवर्क तथा भारत न्यूज चॅनलचे स्टेट चीफ पटेल जैनोद्दीन शेख यांची नांदेड महाराष्ट्र जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

जैनोद्दीन शेख यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनमध्ये ग्रामीण व शहरातील पत्रकारांना जोडून पत्रकारांचे आडी अडचनी थांबविण्यासाठी संघर्ष करावे. पटेल जैनोद्दीन यांनी सांगितले की पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन सदैव तत्पर आहे. पटेल जैनोद्दीन शेख यांच्या नियुक्तीबद्दल मोहम्मद परवेज़, गिरिराज सिंह, सलमान अहमद, ॲड. सनोबर अली कुरेशी, रंजीत सम्राट (बिहार प्रदेश अध्यक्ष), मो. सुल्तान अख्तर, नसीम रब्बानी, के.एम. राज, हाशिम रिजवी, राजकुमार यादव, विजय मद्देशिया, पंकज झा, अवनीश त्रिपाठी, राजन राम त्रिपाठी, विजय मोदनवाल, अश्फाक आरिफ खान (जबलपुर), फारूख शेख (जिल्हा अध्यक्ष इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन जळगांव), देवेंद्र भोंडे (इम्पैक्ट 24 न्यूज), गणेश शिंदे (दैनिक पुण्यनगरी), शेख रहीम (दैनिक पुण्यनगरी), शेख मुश्ताक (परतूर तालुका अध्यक्ष इंडियन जर्नलिसस्ट असोसिएशन), उत्तम जाधव (दैनिक लोकमत), व्यंकटेश सूर्यवंशी, शकील अहमद (परभणी जिल्हा अध्यक्ष इंडियन जर्नलिसस्ट असोसिएशन), सैय्यद मिन्हाजउद्दीन (बीड जिल्हा अध्यक्ष इंडियन जर्नलिसस्ट असोसिएशन) आदी पत्रकारांनी त्यांचे अभिनंदन केले.